**संपादक**
अभय कांता*
तुकाराम जाधव
प्रज्ञा दया पवार
विजय कुंजीर

**कार्यकारी संपादक**
देवेंद्र इंगळे । विवेक घोटाळे

**संपादक मंडळ**
सुरेंद्र जोंधळे । वंदना सोनाळकर । सय्यद रशिद जिलानी
विद्युत भागवत । अनिल जायभाये
विवेक चौधरी । अंजली मुळे

**व्यवस्थापकीय संपादक**
मल्हार पाटील

**संपर्क पत्ता :**
द्वारा 'द युनिक ॲकॅडमी',
चौथा मजला, गुरूकृपा कॉम्प्लेक्स,
११७९/४, शिवाजीनगर,
ज्ञानेश्वर पादुका चौक, पुणे ४११००५.
संपादकीय विभाग : ८८०५८९१९४४
वितरण विभाग : ८००७१४५४२४
ईमेल : pwatsaru@yahoo.com
वेबसाईट : www.pvatsaru.com

**मुंबई-ठाणे कार्यालय :**
द्वारा द युनिक ॲकॅडमी, कार्नेशन, तलाव पाळी, हॉटेल आमंत्रणशेजारी, ठाणे (प.) दूरध्वनी : ०२२-६५२८५२३५

● वर्गणीचे दर : वार्षिक : ३५० रु., त्रैवार्षिक : ९०० रु., दशवार्षिक : २५०० रु. वरील पत्त्यावर मनिऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

हे पाक्षिक मालक, मुद्रक व प्रकाशक अभय गुलाबचंद कांता यांनी नर्मदा ऑफसेट, २१३, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून २६/४, आनंदपार्क, स.नं.१३/४/५, विठ्ठलनगर, आनंदनगर, पुणे ४११०५१ येथे प्रसिद्ध केले.

*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.

मुखपृष्ठ मांडणी
**मेहबूब शेख**

अक्षरजुळणी
**रवींद्र जगताप**

मुद्रितशोधन
**गणेश मेरगू**

प रि व र्त ना चा
वाटसरू

वर्ष १५ वे / अंक १९ वा
किं. १५ रु. / १६ ते २९ फेब्रुवारी २०१६

ISSN: 2250-3145

# अ नु क्र म


## युनिक वेचे
सार्वजनिक विद्यापीठाचा मृत्यू
**सतीश देशपांडे** ५
अरुणाचल प्रदेश : 'सत्तेसाठी वाट्टेल ते' मोदींची नवी नीती
**राजीव धवन** ७

## सम-सामायिक
शेवटी 'न्याया'ने तिला नमविलेच!
**सुधाकर गायकवाड** १३
जनमत २०१६ : प्रादेशिक पक्ष विरुद्ध राष्ट्रीय पक्ष?
**केतनकुमार पाटील** १८

## मनुचा मासा
अ.भा.वि.(द्रु)प.
**जयदेव डोळे** २२

## विशेष मुलाखत
पुरुषभान निर्माण करणे ही स्त्रीमुक्ती चळवळीची जबाबदारी
**मुलाखतकार : प्रवीण घोडेस्वार** २६

## विशेष लेख
दलित स्त्रीकविता : समकालीन संदर्भ
**छाया कोरेगावकर** २९
भाषासंशोधन : जाणीव आणि दिशा
**विलास बुवा** ३४

## आठवण
मूल्यात्मकतेचा मानदंड
**अजित मगदूम** ३७

## दखलपात्र
'जय भीम-जय भारत' नाटकाला सेन्सॉरचे आक्षेप का?
**सुबोध मोरे** ३९

## कविता
**पवन खेबुडकर** ४२
**अरुणचंद्र गवळी** ४३
**निदा फाजली** (अनु. लोकनाथ यशवंत) ४५

## शेजारची कला
ज़ैनुल आबेदिन
**सुधाकर यादव** ४७

## चित्रपट
बाजीराव मस्तानी : जात-पितृसत्तेने लादलेले मृत्युपर्व
**इनायत परदेशी** ५१

## पुस्तक परिचय
कोलमडून गेलेल्या सामान्य माणसाच्या 'जगण्याची गाथा'
**रफीक सूरज** ५६
कडी-वरकडी
**बलभीमराज गोरे** ५८
डॉ. आंबेडकरांची क्रांती विरुद्ध संघाची प्रतिक्रांती
**एकनाथ ढोकळे** ६२


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# सार्वजनिक विद्यापीठाचा मृत्यू



सतीश देशपांडे

एखाद्या धुमकेतूप्रमाणे रोहित वेमुला निघून गेला, नेहमीचे परिचित अडसर बाजूला करत अनेकांना गलबलवून गेला, असं कसं झालं? कदाचित पूर्वजांकडून आपल्या वारशाने आलेली धुमकेतूंबद्दलची धास्ती त्याला कारणीभूत असावी. धुमकेतू हा दारावर येऊन ठेपलेल्या अरिष्टाचे दुश्चिन्ह असतो. आभाळाला जाळत गेलेल्या त्या एका आत्म्यासाठी आपण रडत असतो, पण खरं तर त्यापाठोपाठ येऊ घातलेल्या अधिक मोठ्या अनर्थाबद्दलची कुशंका आपण व्यक्त करत असतो. ज्या संस्थेत, भारतातील सार्वजनिक विद्यापीठात, रोहितने आत्महत्या केली, ती संस्थाही आज आत्महत्येच्या प्रयत्नात आहे. रोहितच्या जाण्यानं समोर आलेलं हे मोठं अरिष्ट आहे.

कसं आणि का घडतंय हे सांगण्याआधी ते महत्त्वाचं तरी आहे का, हे विचारणं योग्य ठरेल. तसंही, एचएमटी घड्याळांची, मॉडर्न ब्रेडची, तारयंत्रणेची आठवण आज कुणाला येते का? समजा सार्वजनिक विद्यापीठंही संपली तरी कुणाला काय फरक पडणार आहे? दुर्दैवाची गोष्ट अशी की, कधी नव्हे इतकी सार्वजनिक विद्यापीठं आज महत्त्वाची झाली आहेत. सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमपत्रिकेचं भविष्य जिथे घडतं ती कळीची जागा म्हणजे विद्यापीठ आणि या कार्यक्रमपत्रिकेचं काय होणार यावरच भारतीय लोकशाही प्रजासत्ताकाला उज्ज्वल भविष्य असणार की नाही हे ठरत असतं.

हे जर फारच अतिरंजित वाटत असेल तर पुढील गोष्टींचा विचार करा : नवउदारमतवादी भारतामध्ये विषमता प्रचंड प्रमाणात वाढली आहे. लोकसंख्येच्या एक टक्का असलेल्या सधन वर्गाच्या हाती राष्ट्राची अर्ध्याहून अधिक संपत्ती आहे. तर अतिगरीब पन्नास टक्के असलेल्या वर्गाकडे पाच टक्क्याहून कमी संपत्ती आहे. या विषमतेला जातीचा एक तगडा असा

ईमेल : sdeshpande7@gmail.com

आयाम आहे – अब्जावधी डॉलर्सची मालकी असणाऱ्या ५५ जणांमध्ये, ज्याचा आपण कौतुकाने उल्लेख करत असतो, एकही कनिष्ठ जातीय नाही, आणि गरिबांमध्ये, मग गरिबीची व्याख्या तुम्ही कशीही का करेनात, याच कनिष्ठ जातींचे प्रमाणाबाहेर प्राबल्य आहे. पूर्वी लोकप्रिय असलेला झिरप सिद्धान्त आज त्याच्या भक्तांच्या भाषेतूनही गायब झाला आहे. मग ही सातत्याने वाढत असलेली विषमता मिटणार कशी? जमिनीचे फेरवाटप अथवा संपत्तीवरील सुयोग्य करव्यवस्थेच्या अनुपस्थितीत गरिबांनी प्रगतीची आशा ठेवावी अशी भारतात एकच गोष्ट शिल्लक आहे आणि ती म्हणजे उच्चशिक्षणाची सार्वजनिक यंत्रणा.

चांगली बातमी अशी की, उच्चशिक्षणाची औपचारिक संधी आज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. १९९१ पासून २०१३-१४ पर्यंत उच्चशिक्षणातील एकूण नावनोंदणी ही साडेसहा पटीने (४९ लाखपासून ३२३ लाख) वाढली आहे, विद्यापीठांची संख्या चौपट (१८४ ते ७२३) झाली आहे, आणि १८ ते २३ या वयोगटातील एकूण नावनोंदणीचे प्रमाण ही जवळपास तिप्पट (८.१ टक्क्यावरून २३.९ टक्क्यापर्यंत) झाले आहे. वाईट बातमी अशी की, बहुतेक सगळा विस्तार हा खाजगी महाविद्यालयांमध्ये झालेला आहे. एकूण पटसंख्येच्या ६५ टक्के नावनोंदणी या खाजगी महाविद्यालयात होते आणि उच्चशिक्षणातील एकूण संस्थांपैकी ७५ टक्के संस्था खाजगी आहेत. खाजगी शिक्षणक्षेत्राला भ्रष्टाचाराने पोखरून काढले आहे, खंडणीवजा फिया आणि खोट्या, नाममात्र संस्था! याच कारणामुळे गेल्या आठवड्यात तमिळनाडूमध्ये तीन तरुणींनी आत्महत्या केली. भ्रष्टाचाराची ही जाळी राजकीय बांधबंदिस्तीमध्येच वाढत असतात – नेता बनू पाहणाऱ्या प्रत्येकाकडे स्वतःच्या मालकीचे एखाददुसरे महाविद्यालय असते. आपल्या संसदसदस्यांच्या व्यावसायिक ओळखीमध्ये शिक्षणतज्ज्ञ ही सर्रास आढळणारी ओळख अकारण आलेली नाही. लोककल्याणाला एकदा रजा दिली की खाजगी शिक्षण हे प्रचंड विषमता वाढवणारे ठरते कारण इथे तुम्हाला निवड फक्त शुद्ध फसवणूक किंवा प्रचंड महाग शिक्षण या दोन पर्यायांमधूनच करायची असते.

खरी वाईट बातमी ही की, आपल्या आकांक्षांचं ओझं आज अटळपणे एका अशा संस्थेवर – सार्वजनिक विद्यापीठांवर आहे ज्या वेगाने स्व-नाशाकडे चालल्या आहेत. हा पेचप्रसंग तीन प्रमुख कारणांमुळे उद्‌भवला आहे : एक, आवाज उठवू शकणारा अभिजन वर्ग आज त्यापासून दूर गेलेला आहे, कारण त्याला पहिल्या जगातील शिक्षणशुल्क परवडू लागले आहे. साहजिकच भारतातल्या संस्थांबाबत त्याला फिकीर राहिलेली नाही. दोन, भारतातील उच्चशिक्षणाच्या फायदेशीर क्षेत्रामध्ये जागतिक आणि स्थानिक खाजगी घटकांचे कावेबाजपणे उतरणे, जे कदाचित प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे शासकीय संस्थांचा ऱ्हास हावा यासाठी प्रयत्नही करत असतील. तीन, शासकीय शिक्षण यंत्रणा खिळखिळी होण्याला अकादमिक आणि राजकारणी हे दोघेही एकत्रितपणे जबाबदार असून तात्पुरती उपाययोजना, असंगतता आणि सरळ सरळ निष्काळजीपणा ही वैशिष्ट्ये शिक्षणधोरणात सर्रास आढळू लागली आहेत. सत्तेत असलेल्या राजवटीची हरएक लहर सांभाळण्यासाठी झुकायला सदैव तयार असलेले शिक्षण प्रशासक स्वायत्ततेच्या नावाखाली निरंकुश एकाधिकारशाहीने निर्णय घेत राहतात. या साऱ्याचा एकत्रित परिणाम असा होतो की सार्वजनिक विद्यापीठाचा दर्जा घसरत जातो, एकेकाळी आत्मविश्वासपूर्ण, मोकळे आणि उदारमतवादी वातावरण ही विद्यापीठांची ओळख होती, आता असुरक्षितता, संकुचितता आणि पुराणमतवाद ही नवी ओळख झालेली आहे.

भारतातील उच्चशिक्षणाच्या १५५ वर्षांच्या प्रदीर्घ इतिहासात आजवर वगळल्या गेलेल्या समूहांच्या सम ावेशनाचे एक सर्वाधिक अवघड आव्हान या व्यापक पेचप्रसंगाबरोबरच उभे राहिलेले दिसते. आरक्षणाचा तसेच आर्थिक आणि लोकसंख्यात्मक बदलांचा एकत्रित परिणाम असा झालेला आहे की तुलनेने अधिक एकजिनसी गटांमधून (बव्हंशी उच्च आणि प्रभुत्वशाली जाती) येणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा आजचा विद्यार्थीवर्ग हा विभिन्न समाजगटांमधून अधिक संख्येने येतो आहे. जात-वर्गीय विषमता ही सामाजिक आणि शैक्षणिक भांडवलाची अत्यंत विषम देणगी जरी सोबत घेऊन येत असली तरी खाजगी शिक्षणाप्रमाणे या विषमतेमधून विभिन्न संस्थांची उतरंड उभी राहत नाही. ९३ व्या घटनादुरुस्तीसारख्या

**(पान १२ वर)**

# अरुणाचल प्रदेश : 'सत्तेसाठी वाट्टेल ते' मोदींची नवी नीती

राजीव धवन

विद्यमान सरकारं उलथवून सत्ता मिळवण्याच्या नरेंद्र मोदींच्या प्रयत्नातूनच अरुणाचल प्रदेशातील राजकीय पेचप्रसंग साकारला आहे. दिल्ली, बिहारमध्ये निवडणुकीत लागोपाठ पराभवाचा सामना केल्यानंतर आता अन्य मार्गाने विजय मिळवण्याची मोदी-अमित शहा यांची ही नवी नीती दिसते. ६० सदस्यांच्या सभागृहात सत्ताधारी काँग्रेसचे ४७ सदस्य असताना त्यातील चौदाजणांना फोडून त्यांच्याद्वारे इटानगरमध्ये राजवट बदलण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. राज्यघटनेच्या दहाव्या अनुसूचीला अनुसरून सभापतींनी त्या पक्षांतर करणाऱ्या १४ आमदारांची आमदारकी रद्द केली आणि भाजपसमोर पेचप्रसंग उभा राहिला. काँग्रेसचे संख्याबळ घटून ३३ झालेले असले तरी उर्वरित ४६ जणांच्या सभागृहामध्ये बहुमत टिकवता आले होतेच.

पक्षांतर ही गोष्ट विपरीतपणाची तर आहेच घटनाबाह्यदेखील आहे आणि सभापतींचा त्यांची आमदारकी रद्द करण्याचा निर्णय अगदी योग्य होता. दोन अधिवेशनांमधील अंतर सहा महिन्यांहून अधिक असू नये असा नियम असल्याने आणि २१ जानेवारी रोजी ही मुदत संपत असल्याने मुख्यमंत्री नाबम तुकी यांच्या सल्ल्याप्रमाणे राज्यपालांनी १४ जानेवारी रोजी अधिवेशन आयोजित केल्याचे घोषित केले. यानंतर वास्तविक पेचप्रसंग सुटायला हवा होता, पण राज्यपालच पुन्हा आडवे आले.

राज्यपाल जे. पी. राजखोवा हे भाजपच्या हितासाठी काम करत होते. ९ डिसेंबर रोजी त्यांनी अधिवेशनाची १६ डिसेंबर अशी नवी तारीख घोषित केली आणि विधानसभेची सदस्यसंख्या पूर्वीप्रमाणेच म्हणजे ६० असून (पक्षांतर केलेल्या आणि सभापतींनी पक्षसदस्यत्व रद्द केलेल्या चौदाजणांचाही त्यात समावेश होता.) सभापतींची हकालपट्टी हा कार्यक्रमपत्रिकेतील पहिला मुद्दा असल्याचे घोषित केले. अरुणाचल

ईमेल : rdhavan@gmail.com

प्रदेशाच्या लोकशाही राजकारणामध्ये राज्यपालांनी केलेला हा राजकीय हस्तक्षेप अनाठायी आणि राज्यघटनेला धुडकावून लावणारा होता. राज्यपालांच्या या कृतीने मुख्यमंत्र्यांना धक्काच बसला. कोणतेही बेकायदेशीर कृत्य होऊ नये यासाठी विधानसभा इमारतीभोवती सभापतींनी गृहमंत्र्यांकडे पोलीस संरक्षण बसवण्याची विनंती केली. काँग्रेसमधील फुटीर आमदार, भाजप आणि अन्य अपक्ष आमदार यांनी १६-१७ डिसेंबर रोजी एका समाज सभागृहामध्ये पक्षांतरासाठी हकालपट्टी केलेल्या उपसभापतींच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन घेतले. हे अधिवेशन बेकायदेशीर होते ही गोष्ट स्पष्टच आहे. त्यामुळे या अधिवेशनात संमत केलेला पुढील ठराव पर्यायी सरकार ताबडतोब नेमले जावे हाही बेकायदेशीर आहे.

एक अपात्र ठरवलेला उपसभापती स्वतःचे आणि अन्य सदस्यांचे अपात्र ठरवणे कसे फिरवू शकतो? हा अधिकार खुद्द सभापतीलादेखील नाही!

कपील सिबल यांनी तातडीने गौहाटी उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती हृषिकेश रॉय यांनी हे सगळे वादग्रस्त निर्णय स्थगित केले. पण दुसरे न्यायमूर्ती शर्मा यांनी एक असमाधानकारक सुनावणी करून ही स्थगिती उठवली आणि उच्च न्यायालयातील काँग्रेसने दाखल केलेल्या सर्व याचिका फेटाळून टाकल्या. मुख्यमंत्री टुकी आणि सभापती नाबम राबिया यांनी यानंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने खटल्याची सुनावणी केली. राजकारण जर कायद्याप्रमाणे व्हायचे असेल तर जोवर सर्वोच्च न्यायालय निकाल देत नाही तोवर त्या कथित अधिवेशनात झालेले सर्व निर्णय स्थगित राहणे आवश्यक होते, कारण न्यायालयासमोर त्या अधिवेशनाच्या कायदेशीरपणालाच तसेच राज्यपालांच्या सर्व निर्णयांनाच आव्हान दिले गेले होते.

**दुसरी बडतर्फी**

इथे मी थोडे विषयांतर करतो. सर्वोच्च न्यायालयामध्ये अरुणाचल प्रदेश सरकारची बाजू मी मांडत होतो. याला कुणीही आक्षेप घेतलेला नव्हता. राज्यपालांचा निर्णय आणि ९ डिसेंबर रोजी त्यांनी दिलेली सूचना, १६-१७ डिसेंबर रोजी समाज मंदिरात झालेले अधिवेशन किंवा तिथे संमत केलेले ठराव यातले काहीच सर्वोच्च न्यायालयाला पटले नसल्याचे मला जाणवले. २६ जानेवारी रोजी राष्ट्रपती राजवट घोषित करून त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाला ताळे ठोकले गेले आणि तेथील सर्व कागदपत्रे, कॉम्प्युटरच्या हार्ड डिस्क जप्त केली गेली. याच्या विरोधात मी सर्वोच्च न्यायालयात एक तक्रार दाखल केली. न्यायालयाने काही प्रमाणात का होईना पण या चुकांना लगाम घातला. सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींमुळे या चुकांच्या बाजूने ठासून बोलणाऱ्या ॲटर्नी जनरल यांचा चेहरा आता काळाठिक्कर पडला होता. तरीही, १ फेब्रुवारी रोजी प्रशासकाकडून एका पत्राची प्रत माझ्याकडे आली. त्यात पुढीलप्रमाणे म्हटलेले होते,

डॉ. राजीव धवन, वरिष्ठ वकील यांनी सर्वोच्च न्यायालयातील विशेष याचिका क्रमांक (सी)१२५९/२०१६ आणि विशेष याचिका क्रमांक (सी) १२६०/२०१६ यामध्ये अरुणाचल प्रदेश सरकारच्या वतीने बाजू मांडू नये यासाठी विनंती करण्यात आलेली आहे. राज्य सरकारशी संबंधित कोणत्याही केसमध्ये त्यांनी बाजू मांडू नये असेही त्यांना विनवण्यात आले आहे. हा निर्णय सक्षम अधिकाऱ्यांच्या संमतीने घेण्यात आला आहे.

साध्या भाषेत सांगायचे तर वरिष्ठ वकील धवन यांना बडतर्फ करण्यात आले होते. अशीलाकडून एका वरिष्ठ वकिलाची अशा रीतीने हकालपट्टी होऊ शकते? याचे उत्तर नाही हेच आहे! मी राष्ट्रपती राजवट लागू होण्याआधीच्या केसमध्ये वकील होतो. राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतरच्या प्रकरणात माझ्याकडे काँग्रेसच्या प्रतोदाचे आणि आणीबाणीच्या विरोधातील पर्यायी ब्रीफ होते. त्यामुळे मी कुठेच विरोधभावी कृती करत नव्हतो. ही दोन प्रकरणे वेगवेगळी होती. राष्ट्रपती राजवटीच्या केसमध्ये राज्य सरकारच्या बाजू मांडण्यापासून मला राज्यपाल किंवा अगदी राष्ट्रपतींनादेखील थांबवता आले असते. पण राष्ट्रपती राजवटीच्या आधीच्या केसमध्ये राज्याने उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात जी भूमिका मांडली होती तीच माझीही भूमिका होती. मग राज्यपालांना कशाची भीती वाटली? माझी? सिबल आणि नरिमन तर आधीच केसमध्ये आलेले होते. अर्थात, माझी भीती वाटली असं म्हणून मी माझी पाठ थोपटून घेऊ

शकतोच! स्पष्टपणे सांगायचं तर हे पत्र म्हणजे क्षुद्रपणा, आगाऊपणा, तिरसटपणा आणि मूर्खपणाचं प्रतीक आहे. सर्वोच्च न्यायालयापुढे प्रकरण असताना विनाकारण आपल्या दंडशक्तीचं प्रदर्शन करण्यासारखं आहे. इथे मी थांबतो.

**आणीबाणीच्या अधिकारांचा गैरवापर**

राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा अधिकार हा आणीबाणीच्या वेळी वापरण्याचा अधिकार आहे. त्यातून दोन्ही, संघराज्यव्यवस्था आणि संसदीय लोकशाहीला काळीमा फासला जातो. त्याची मुळं १९३५च्या भारत सरकार कायद्यामध्ये आहेत, ज्यावेळी साम्राज्यवादी प्रशासनाचे प्रमुख असलेले व्हाईसरॉय राज्यपालांना काय करायचे ते सांगत असत. अनपेक्षित आणीबाणीच्या परिस्थितीत उपयोगी ठरेल म्हणून ते राज्यघटनेत ठेवण्यात आले. खरं तर, तसे करण्याची अजिबात गरज नव्हती. जर केंद्रीय शासन आणीबाणीशिवाय संसदीय लोकशाही चालवू शकत असेल तर राज्यसरकारही चालवू शकते. राज्यातील राष्ट्रपती राजवटीचा अधिकार हा एक राजकीय संघर्षाचा मुद्दा बनणार हे अटळच होते. १९५७ मध्ये पहिले कम्युनिस्ट सरकार केरळमध्ये निवडून आले आणि या तरतुदीच्या वापराचा क्षण जवळ आला. त्या सरकारमधे असलेल्या कृष्णा अय्यर यांनी मला सांगितले की, जेव्हा त्यांनी नेहरूंना सांगितले की केरळ सरकार तुमच्या सर्व मागण्या मान्य करेल तेव्हा नेहरू गांगरून म्हणाले, 'इंदिराला विचारा.' इंदिरा गांधी तेव्हा काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या. त्यांनी आणि गोविंद वल्लभ पंत दोघांनी कटकारस्थान करून अव्यवस्था निर्माण केली होती.

इंदिरा गांधींना राज्यातील विरोधी सरकारांकडून अधिकाधिक विरोध होऊ लागला तेव्हा त्यांनी निष्ठूरपणे राष्ट्रपती राजवट लागू करायचा पायंडा पाडला : राजस्थान आणि हरियाणा (१९६७), पश्चिम बंगाल, बिहार, पंजाब, पाँडिचेरी (१९६८) उत्तर प्रदेश, बिहार, मणिपूर (१९६९), पश्चिम बंगाल, केरळ, उत्तर प्रदेश (१९७०), ओडिसा, म्हैसूर, गुजरात, पंजाब, पश्चिम बंगाल (१९७१), बिहार, आंध्र, ओडिसा, मणिपूर, उत्तर प्रदेश (१९७३). पाँडिचेरी (दोनदा), गुजरात (१९७४), नागालँड, उत्तर प्रदेश (१९७५), तमिळनाडू, गुजरात, ओडिसा (१९७६), जम्मू आणि कश्मीर (१९७७).

ही काही उदाहरणे, काही मी वगळली आहेत. प्रत्येक वेळी सत्तेतील विरोधी आघाडीचा पराभव व्हावा यासाठी राज्यपालांनी अक्षरशः काहीही गोष्टी केल्या. पैसे आणि पदांची आश्वासने देऊन पक्षांतरे घडवली गेली. बहुतेकदा काँग्रेसकडून पण काही वेळा इतर पक्षांकडूनही हे झाले. इंदिरा गांधींना सत्ता अमर्याद असते, असे वाटत होते. १९६७ ते १९७० ही सत्ताभ्रष्ट करण्याची खास वर्षे होती – त्याच्यासाठी सर्व भल्याबुऱ्या मार्गांचा वापर केला गेला. १९७१ मध्ये बांगलादेश युद्ध जिंकल्यापासून १९७७ पर्यंत त्यांचा व्यवहार स्वतःच्या प्रेमात ठार वेड्या झालेल्या राणीसाहेबांसारखा होता. केरळ (१९५९) आणि मणिपूर (१९६९) या दोन राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा पाडाव ही कारणे दिली गेली होती तर उत्तर प्रदेशात (१९७३) पोलीसांची बंडाळी हे कारण दिले गेले. तामिळनाडू (१९७६) सरकार भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर हटवले गेले. संघराज्याच्या आणि कायदेनिर्मितीच्या लोकशाहीवरील हा हल्ला कधीही भरून न येण्याइतका घातक होता. अर्थात १९७५–७७ मधील राष्ट्रीय आणीबाणीने या सर्व घटना खुज्या करून टाकल्या.

१९७७ मध्ये काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर जनता पक्षाच्या सरकारमध्ये कायदा मंत्री असलेले शांती भूषण यांनी काँग्रेसशासित नऊ राज्यांमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची घोषणा केली. याचा वचपा १९८१ मध्ये इंदिरा गांधी यांनी काढला. सत्तेत आल्याबरोबर त्यांनी नऊ राज्यांमधील बिगरकाँग्रेस सरकारे बरखास्त केली. प्रत्येक वेळी सूडापोटी झालेल्या या कारवायांचे सर्वोच्च न्यायालयाने समर्थन केले. नंतरचा काही काळ शांत गेला. असे वाटू लागले की, आता तरी याला आळा बसेल. पण मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाली (१९८१ : ११० दिवस), त्यानंतर आसाम (१९८१ : १९७ दिवस), आसाम (१९८२–८३ : ३४५ दिवस), पाँडिचेरी (१९८३–८५ : १ वर्ष २६५ दिवस), पंजाब (१९८३–८५ : १ वर्ष ३५४ दिवस), सिक्कीम (१९८४–८५ : २८७ दिवस), जम्मू आणि काश्मीर (१९८६ : २४६ दिवस), पंजाब (राज्यात 'हत्यांचे शेत' फुललेले असल्याचा आरोप करून ४ वर्ष २५९ दिवस), मिझोराम (१९८८ : १३९ दिवस), कर्नाटक (१९८९ : २२३ दिवस), जम्मू आणि

काश्मीर (१९९०-९६ : ६ वर्ष २५४ दिवस). १९९१ नंतरही आणीबाणीचे हे सत्र सुरूच राहिले. हरियाणा, मेघालय, मणिपूर, नागालँड, उत्तर प्रदेश, हिमाचल, राजस्थान, त्रिपुरा, बिहार, गुजरात, गोवा, जम्मू आणि कश्मीर, कर्नाटक, झारखंड, दिल्ली, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि आता जानेवारी २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेश. ही सगळी राज्यघटनेची जबरदस्त मोडतोडच म्हणता येईल.

ही यादी भयावह आहे! भारतातील राज्ये शासित करण्याला लायक नाहीत? प्रमुख कारणांमध्ये समावेश असतो तो सदस्यांची पक्षांतरे, कायदा आणि सुव्यवस्था, भ्रष्टाचार, राज्यसीमांचे पुनर्गटन आणि वाट्टेल ते! कुठलेच राज्य यातून सुटलेले नाही. पक्षांतराच्या राजकारणाने राज्यव्यवस्थेलाच सुरुंग लावलेला आहे. जर केंद्रामध्ये आणीबाणीची गरज पडत नसेल तर राज्यांमध्येही गरज पडू नये. बहुतेक वेळा, केंद्रीय सत्तेचे हितसंबंध जोपासणाऱ्या राज्यपालांनीच यात कळीची भूमिका बजावलेली आहे. एका पुस्तकाच्या शीर्षकात सुचवल्याप्रमाणे राज्यपाल हा संत नव्हता. तो विध्वंसक होता.

घटनात्मक मार्गांनी राष्ट्रपती राजवटीचा विरोध करण्याचे काही प्रयत्न जरूर झाले, पण ते संसदेकडून झालेले नाहीत. राष्ट्रपती राजवटीला दोन महिन्यांच्या आत संसदेची मान्यता आवश्यकच असते. 'प्रेसिडेंट्स रूल इन द स्टेट्स' (१९७९) या माझ्या पुस्तकात असे दिसते की १९५९ मध्ये केरळमध्ये आणीबाणी लागू केल्यावर संसदेमध्ये दणदणीत चर्चा झाली होती. नंतरच्या काळात मात्र संसदेने केवळ अंगठेबहाद्दराची भूमिका बजावलेली दिसते. अत्यंत थोड्या वेळा राष्ट्रपतींनी या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे सुचविले. सुचविण्याचा हा अधिकार राष्ट्रपतींना १९७९ साली मिळाला. १९९७ मध्ये उत्तर प्रदेशात राष्ट्रपती राजवटीची मुदत संपत आल्यावर ती पुन्हा लागू करताना राष्ट्रपतींनी अशी विचारणा केली होती. तसेच १९९८ मध्ये बिहारमध्ये कायदा आणि सुव्यवस्था मोडली आहे या कारणावरून राष्ट्रपती राजवट लागू करण्याला राष्ट्रपतींनी नकार दिला होता. पण त्यामुळे काहीही बदल होऊ शकला नाही. सरकारने निर्णय घेतलाच, पण राज्यसभेमध्ये बहुमत नसल्यामुळे अखेर सरकारला माघार घ्यावी लागली. अखेरचा आधारस्तंभ न्यायपालिका असतो. बोम्मई प्रकरणात (१९९३) सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील राष्ट्रपती राजवटीच्या संदर्भात आम्हाला न्यायिक फेरआढाव्याचा (ज्युडिशियल रिव्ह्यू) अधिकार असल्याचे सांगत कर्नाटक, मेघालय आणि नागालँडमधील आणीबाणी बेकायदेशीर ठरवली. रामेश्वर प्रकरणात (२००६) सर्वोच्च न्यायालयाने बिहारमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी कसलीही परिस्थिती अस्तित्वात नसल्याचे सांगितले.

या सगळ्याचा मथितार्थ असा की राष्ट्रपती राजवट लागू करणे ही अयोग्य बाब आहे. आणि संघराज्याच्या तत्त्वाला चूड लावणाऱ्या या दडपशाहीच्या कृतीला अडसर केवळ सर्वोच्च न्यायालयाकडूनच होऊ शकतो.

अरुणाचलचे प्रकरण हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट प्रकरण आहे.

राष्ट्रपती राजवटीच्या इतिहासामध्ये अरुणाचलची विद्यमान आणीबाणी ही सर्वाधिक छचोर ठरवता येईल. राष्ट्रपती राजवट लागू करताना एकूण प्रश्न पुढीलप्रमाणे होते : मुख्यमंत्र्याचा सल्ला धुडकावण्याचा आणि विधानसभेचे अधिवेशन १४ जानेवारीऐवजी १६ डिसेंबर या दिवशी घेण्याचा अधिकार राज्यपालांना होता का? पक्षांतर केलेल्या सदस्यांचे सदस्यत्व काढून घेण्याचा केवळ सभापतींना असलेल्या विशेष अधिकारामध्ये राज्यपालांना हस्तक्षेप करणे आवश्यक होते का? एका समाज सभागृहात झालेल्या कायदेनिर्मितीचा व्यवहाराला ते मान्यता देऊ शकतात का? १७ डिसेंबर २०१५ रोजी ते राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी शिफारस करू शकत होते का? सर्वोच्च न्यायालय ज्यावेळी राष्ट्रपती राजवट लागू करावी की करू नये यासंबंधी विचार करत होते त्यावेळी केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट लागू करण्याचे पाऊल उचलायला हवे होते का? अखेरीस, प्रजासत्ताक मिरवणूक संपल्याबरोबर राष्ट्रपतींनी राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या आदेशावर सही करण्यापेक्षा केंद्राने याचा फेरविचारफेरविचार करावा असे सांगू शकले नसते का? या सर्व प्रश्नांची उत्तरे पाहू गेलो तर राज्यपाल आणि केंद्र सरकारने सत्य आणि घटनात्मकता बाजूला सारत केवळ अटकळीवर औद्धत्यपूर्ण अशी प्रतिबंधात्मक पाऊल उचलल्याचे दिसते.

एक तर, ही गोष्ट आपण लक्षात ठेवायला हवी की, राज्यघटना ही विशिष्ट अशा तत्त्वांवर आधारित असते, तो

काही येरागबाळ्याचा व्यवहार नसतो. संसदीय लोकशाही, संघराज्यपद्धत, न्यायपूर्णता आणि न्यायिक फेरआढाव्याचा अधिकार ही ती मूलभूत तत्त्वे होत. ही आणि आणखी अशी काही तत्त्वे मिळून राज्यघटनेचा मूलभूत ढाचा तयार होतो. राज्यपालांच्या आणि भाजपच्या वकिलांनी राज्यघटनेतील विस्तृत तरतुदींचा विचार न करता केवळ त्यातील वाक्यांचा वरवरचा अर्थ लावू पाहिला होता. तत्त्वदृष्ट्या पाहायचे तर राज्यपाल राजखोवा हे घटनात्मक प्रमुख असून त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार वागत त्यांना साहाय्यकारी भूमिका बजावायची असते. घटनाबाह्य पक्षांतरे करणाऱ्या विरोधी पक्षांच्या अथवा सत्ताधारी पक्षातून फुटून निघालेल्या आमदारांच्या इशाऱ्यानुसार त्यांनी काम करायचे नसते. ९ डिसेंबर २०१५ रोजी विरोधकांच्या सूचनेवरून त्यांनी अधिवेशनाची तारीख बदलायची किंवा त्या अधिवेशनाची कार्यक्रमपत्रिका ठरवण्याची, ज्यानुसार सभापतींची हकालपट्टी करण्यात आली, काहीही गरज नव्हती. ही सरळ सरळ पक्षपाती भूमिका होती.

१. पक्षांतराचा मुद्दा हा भारतात दीर्घ काळापासून प्रस्तुत आहे. १९८५ मध्ये राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करून केवळ तात्त्विक पक्षांतराला, तीही सामूहिक पक्षांतराला, मान्यता देण्यात आली. एका पक्षाचे/ अथवा काही पक्षांचे दुसऱ्या पक्षात विलीनीकरणही मान्य करण्यात आले. पक्षातून अगदी थोड्या संख्येने बाहेर पडणे अमान्य करण्यात आले. ही तरतूद दहाव्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत करण्यात आली आणि किहोटो हॉलोहन प्रकरणात (१९९२) तिला वैधही ठरवण्यात आले. पक्षांतरासंबंधीचा निर्णय घेण्याचा सभापतीला अंतिम व अनन्य अधिकार असून केवळ न्यायालयाला त्याचा न्यायिक फेरआढावा घेण्याचा अधिकार आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे पैशाच्या अथवा मंत्रिपदांच्या आश्वासनापोटी होणारी पक्षांतरे चालूच राहिली. त्याचा बंदोबस्त करताना २००३ मध्ये पक्षांतरबंदी कायद्यात पुन्हा दुरुस्ती करण्यात आली. या वेळेला आमदारांनी गट करून पक्षांतर करणेही घटनाबाह्य ठरवण्यात आले आणि मंत्रिमंडळाच्या आकारावर मर्यादा घालण्यात आल्याने मंत्रिपदाच्या आश्वासनाने होणाऱ्या पक्षांतरावर आळा बसेल हे पाहिले गेले. तरीदेखील, पक्षांतरविरोधी कायदा हा अजूनही बेडौल आणि हस्तक्षेपी स्वरूपाचाच आहे, हे मात्र खरे. अर्थात, १९९२ पासून २००८ पर्यंत सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी त्याला शिस्त लावण्याचा प्रयत्न निश्चितच केला आहे. या सर्व निवाड्यांनंतर आता वादविवाद निर्माण होण्याला जागा राहिलेली नाही. विलीनीकरण वगळता पक्षांतरे अथवा पक्षफुटी या घटनाबाह्य आहेत. कुठल्याही राज्यपालाला त्याला मान्यता देता येणार नाही. पक्षांतरसंबंधीचा निर्णय हा केवळ सभापतीलाच घेता येतो, ज्याच्यावर सर्वोच्च व उच्च न्यायालयांचा अंकुश आहे. अन्य कुणीच हस्तक्षेप करू शकत नाही अथवा तसे करताना दिसता कामा नये.

२. राज्यपालाला मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानुसार काम करावे लागते. मुख्यमंत्री हा विधिमंडळाला जबाबदार असतो आणि विधिमंडळ हे लोकांनी केलेल्या मतदानाच्या आधारावर उभे असते. मुख्यमंत्र्याकडून माहिती मिळवण्याचा अधिकार राज्यपालाला जरूर आहे पण तो विरोधी गटांकडे माहिती, सल्ला आणि कृतीसाठी जाऊ शकत नाही. राजखोवांनी नेमकी हीच चूक केली आहे.

३. राज्यपालांचा अहवाल १७ डिसेंबर रोजी राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला. त्याच दिवशी उच्च न्यायालयाने स्थगितीचा निर्णय दिला होता. राज्यपाल हा कायद्यापेक्षा मोठा नसतो. राजखोवांनी दिलेला अहवाल वाचा. वस्तुस्थिती नीटपणे जाणून घेत भाषेचा न्यायोचित वापर करत न्यायालयाने राज्यपाल आणि विरोधकांच्या कृतीबद्दल साशंकता व्यक्त केल्याबद्दल या अहवालात न्यायालयाने खडसावले आहे! खाजगी सभागृहात अधिवेशन आयोजित करणे आणि अशा अनेक घटनाबाह्य कृती करणे अशा ज्या गोष्टी राजखोवांनी केल्या तशा गोष्टी दुसरा कुठलाच राज्यपाल करू धजला नसता.

४. १७ डिसेंबर २०१५ आणि २६ जानेवारी २०१६ या काळात केंद्र सरकार नक्की काय करत होते? राज्यपालांनी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला मान्यता दिली होती. त्यांच्या कृती या न्यायिक आणि घटनात्मक सूक्ष्मदर्शकाखाली

होत्या. राष्ट्रपती लागू करण्यासाठी जी कारणे दिली गेली त्याच कारणांचा विचार सर्वोच्च न्यायालय करत होते. केंद्र सरकार आणि राज्यपालांची न्यायालयासमोर बाजू दुबळी पडताना दिसत होती. कोणतीही तातडीची कारणे नसताना राष्ट्रपती राजवट लागू केली गेली. त्याचा एकमेव उद्देश हा अरुणाचलमधील काँग्रेस सरकारचा पाडाव आणि त्यासाठी राजकीय संधिसाधूपणाला भरपूर वाव देणे हा होता. राज्यघटना पायदळी तुडवली जात होती हा त्याचा आनुषंगिक भाग होता.

राष्ट्रपती राजवट ही दुःस्थिती आहे. जेव्हा ती मनमानीपणे लादली जाते तेव्हा ती दुपटीने वाईट ठरते. विरोधकांच्या बाजूने मैदानात उतरणारे आणि राष्ट्रपती राजवट आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणारे राज्यपाल हे राज्यपाल म्हणून राहण्याच्या लायकीचे नसतात. राज्यघटनेचा अव्हेर करून राज्यांमध्ये अस्थिरता माजवण्याचा एक नवा मार्ग विद्यमान केंद्र सरकारने निवडला आहे. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी हा निर्णय घेण्यास नकार द्यायला हवा होता. आपण आपले घटनात्मक कर्तव्य बजावण्यात कसूर का केली हे कदाचित ते त्यांच्या आत्मचरित्राच्या पुढच्या आवृत्तीत आपल्याला सांगतील, असे दिसते.

●

*(मूळ इंग्रजी लेख http://thewire.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला होता. मराठी अनुवाद – अभय कांता)*

---

**(सतीश देशपांडे / पान ६ वरून)**

राजकीय हस्तक्षेपांमुळे आजवर गर्भित वर्णभेदाच्या छायेतच कार्यरत असलेला उच्चशिक्षण क्षेत्रातील अभिजन वर्गदेखील एकात्म झालेला आहे. पूर्वीपासून उच्चजातीयांची (आपण जातीच्या पलीकडे आहोत असे वाटण्याजोगी चैन ज्यांना परवडत असते) मक्तेदारी असणाऱ्या अभिजन सार्वजनिक संस्थांमध्ये या मक्तेदारीला सुरुंग लागत असल्याने अलीकडच्या काळात सर्वाधिक तणाव निर्माण झालेले दिसतात. याच संस्थांमध्ये अजूनही औपचारिक प्रवेशाची संधी आणि आशयात्मक समावेशन यामध्ये असणारी अप्रकट पण मोठी तफावत स्पष्टपणे जाणवते आणि जी अत्यंत कडवेपणाने टिकवलीही जाते. या तफावतीच्या पाठीराख्यांकडून हमखास एक प्रश्न विचारला जातो, 'प्रवेश दिला, शिष्यवृत्ती दिली, सोयीसुविधा दिल्या, अजून 'त्यांना' हवंय तरी काय?' या प्रश्नातून एक वास्तव समोर येते : एकतर्फी सक्ती करून संधी देता येत असेल पण समावेशन शक्य होत नाही कारण त्यासाठी त्या दुसऱ्याची जाण, ओळख असावी लागते.

या ओळखीचं/समजेचं सहजतेनं हाती न लागणारं स्वरूप आणि ती हाती लागणारच नाही यासाठी जाणीवपूर्वक वापरले जाणारे असंख्य असे सूक्ष्मतम मार्ग नेमकेपणाने विशद करणे ही गोष्ट अत्यंत अवघड असते पण रोहितने त्याच्या तुकड्यातुकड्यातील लिखाणातून हे वास्तव अतिशय नेमकेपणाने उभे केलं आहे. अशी समज निर्माण करणे आणि तिचे संगोपन करणे ही सार्वजनिक विद्यापीठाची आज सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे, खरं तर असायलाच हवी. ज्या संस्था या दिशेने प्रयत्न करण्यासदेखील तयार नाहीत त्या शिक्षणाची केंद्रे म्हणून आत्महत्या करत आहेत. तिचं शरीर हे इमारती, आवार, पगार, शिष्यवृत्ती आणि पदव्यांवर जगत असतं पण या उपरोक्त गोष्टींच्या बेरजेहून काही अधिक असणारं संपूर्णत्व म्हणजेच आत्मा पसार झालेला असतो.

आपण तेव्हाच एखादी गोष्ट वाटून घेऊ शकतो जेव्हा आपण दुसऱ्यांना त्या गोष्टीचे संपूर्ण मालक म्हणून सम जतो. ते आपल्यापेक्षा कितीही वेगळे असले तरी त्यांचा मालकीचा दावा हा आपल्या दाव्याइतकाच प्रांजळ आणि समान असतो. जर आपण आपली विद्यापीठं वाटून घेऊ शकलो नाही, तर लवकरच आपला देशही आपण वाटून घेऊ शकणार नाही.

●

*(१ फेब्रुवारी २०१६ च्या इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या मूळ इंग्रजी लेखाचा मराठी भावानुवाद – अभय कांता)*

# शेवटी 'न्याया'ने तिला नमविलेच!

सुधाकर
गायकवाड

ती गरीब. खालच्या जातीवर्गातील. तिच्यावर बलात्कार झाला. त्यातून तिला मुलगी झाली. न्यायालयात तिने दाद मागितली. न्यायालयाने तिच्यावर बलात्कार करणाऱ्या बलात्काऱ्याशी लग्न करण्याचा 'निर्णय' दिला.

आपण बलात्काऱ्याशी लग्न करणार नाही, अशा निर्धाराने तिने न्यायालयाचा निर्णय धुडकावून लावला. न्यायालयात ती त्याविरुद्ध भांडली, झगडली. पण शेवटी कोलमडली. तिने बलात्काऱ्याशी लग्न केले. उच्च जातीवर्गातील स्त्रीवर बलात्कार करणाऱ्याला फाशी देण्याची मागणी होते. त्यासंबंधी बालगुन्हेगाराचे वय कमी करण्याचा कायदा केला गेला. पण न्यायालयाने तिला मात्र बलात्काऱ्याशीच लग्न करण्यास भाग पाडले.

ही तमिळनाडूमधील कुड्डालोर जिल्ह्यातील २००८ ची घटना आहे. ती चौदा वर्षाची शाळकरी मुलगी दहावीला होती. परीक्षेच्या दोन दिवस अगोदर व्ही. मोहन या महाविद्यालयीन तरुणाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. ते दोघे एकमेकांना ओळखत होते. त्याने तिला शीतपेयात गुंगीचे औषध मिसळून तिला प्यायला दिले व तिच्यावर बलात्कार केला. तिने ही घटना आपल्या आईवडिलांना संगितली. त्या बलात्काऱ्याने तिच्या आईवडिलांना धमकाविले. तिच्या वडिलांवर हल्ला केला. तिच्यावर बलात्कार झाला आहे असे समजताच संपूर्ण गावाने तिच्या कुटुंबावर बहिष्कार टाकला. तिच्या नातलगाने संबंध तोडले. तिच्या आईवडिलांवर हल्ले होऊ लगले. ती गरोदर राहिली व एका बालिकेस तिने जन्म दिला. अशा प्रसंगात तिचे आईवडील गेले. तिला मुलगी मानलेल्या एका बाईच्या आधारे ती राहू लागली. ती मोलमजुरी करू लागली. तिचा पदवीधर भाऊ हमाल म्हणून मजुरी करू लागला.

कुड्डालोर तेथील महिला न्यायालयात तिच्यावरील बलात्काराचा खटला दाखल केला गेला. महिला न्यायालयाने २०१४ साली बलात्कारी

ईमेल : ssgaikwad53@gmail.com

व्ही. मोहन याला सात वर्षे कैद व दोन लाख रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

त्याविरुद्ध मोहन याने मद्रास उच्च न्यायालयात जामिनाकरिता अपिल केले. त्यावर २३ जून २०१५ रोजी मद्रास उच्च न्यायालयाने निकाल दिला. आता ती पीडित मुलगी २१ वर्षाची व तिची मुलगी सात वर्षांची झालेली आहे. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पी. देवदासा यांनी आरोपीला एका अटीवर जामीन मंजूर केला की त्याने पर्यायी विवाद निवारण (alternative dispute resolution) याच्या अंतर्गत वाद मिटविण्याकरिता मध्यस्थी केंद्रात (mediation centre) जायचे. पर्यायी विवाद निवारण अंतर्गत मध्यस्थीमार्फत ती पीडित मुलगी व तो बलात्कारी यांच्यात तडजोड घडवून आणून त्यांच्यात विवाह घडवून आणावा, असा न्यायालयाने आदेश दिला. तसेच त्याने त्या जिल्ह्यातील इंडियन बँकेत त्या पीडित मुलीच्या नावाने एक लाख रुपये मुदत ठेव म्हणून ठेवायला सांगितले.

**मद्रास उच्च न्यायालयाचा आदेश**

आपल्या निकालपत्रात उच्च न्यायालयाने म्हटले होते की, सदर घटना व परिस्थिती पाहिली तर सदर खटला दोन्ही पक्षकारांमध्ये समेट घटवून आणण्यासाठी मध्यस्थी केंद्रात वर्ग करणे रास्त आहे. आरोपीला मग तुरुंगात ठेवून विचारविनिमयासाठी त्याला मध्यस्थी केंद्रात उपस्थित राहण्यास सांगणे, यातून योग्य ती फलनिष्पत्ती निघणार नाही.

म्हणून त्याला स्वतंत्र व मुक्त व्यक्ती म्हणून परस्पर संवादात व विचारविनिमयात सहभागी होता आले पाहिजे आणि त्याला आपले मन, भावना मुक्तपणे व्यक्त करता आल्या पाहिजेत. इच्छा असेल तर मार्ग निघतो. न्यायमूर्ती पी. देवदासा यांनी एका खटल्यात अशाच तऱ्हेचा अगोदर निकाल दिला होता व मध्यस्थी केंद्रातील समुपदेशातून आरोपीने पीडित महिलेशी विवाह केला होता. न्यायमूर्ती पी देवदासा यांनी या बलात्काराच्या खटल्यात पर्यायी विवाद निवारणाच्या अंतर्गत मध्यस्थीचा मार्ग अवलंबिला. बलात्कारासारख्या गुन्हेगाराच्या संदर्भात असा मार्ग पूर्वी कधी अवंलबिला गेला नव्हता. आपल्या निकालपत्रात न्यायमूर्ती म्हणतात, की या खटल्यात बलात्कारातून जन्मलेले मूल हे परिस्थितीची शिकार आहे व त्या बालिकेला सामाजिक कंलक वागवावा लागणार आहे. पीडित मुलगी ही आता एका मुलीची आई बनलेली आहे, पण ती आतापर्यंत कोणाचीच पत्नी नाही. ती अविवाहित माता आहे. अशा वेळी ती पीडित मुलगी व तिची निष्पाप बालिका यांच्यासमोर एक मोठा प्रश्न उभा राहतो. अशा खटल्यात ती पीडित मुलगी ही बळी आहे असे म्हटले जाते, पण त्यापेक्षा बलात्कारातून जन्मलेले मूल खरे बळी ठरत असते. ते परिस्थितीचा बळी आहे.

त्याचा काही दोष नसता त्याला सामाजिक कलंक घेऊन जन्माला यावे लागले, ही मोठी शोकांतिका आहे. स्त्रिया या पुरुषांच्या सहज सावज बनतात. त्यांना मालमत्ता म्हणून मानले जाते. पण आपल्या देशात स्त्रिया शक्ती, आई, बहीण, जीवनसाथी या रूपात ओळखल्या जातात. यापेक्षा अधिक म्हणजे प्रत्येक पुरुषाच्या यशामागे स्त्री असते. म्हणून 'नीच कृत्य करणारी स्त्री' असा तिच्यावर कलंक असण्यापेक्षा तिला सन्मानाने वागविले गेले पाहिजे.

न्यायाधीशांनी मग निरनिराळ्या धर्मातील धर्ममतांचा दाखला देत ती धर्ममते असे प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविण्याची मार्गदर्शके आहेत, असे म्हटले. हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन धर्मात असे प्रश्न अनाक्रमकपणे व शांततापूर्वक सोडविल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यांची फलनिष्पत्ती फार चांगली आहे, कारण यात कोणी विजयी नसतो वा कोणी पराभूत नसतो. असे खटले न्यायालयात चालविण्याकरिता दीर्घ कालावधी व फार मोठा खर्च करावा लागतो. यापेक्षा पर्यायी विवाद निवारण पद्धतीचा अवलंब करणे रास्त आहे. शिवाय पर्यायी निवारण पद्धती ही भारतीय विधिपद्धतीच्या परिप्रेक्ष्यात आहे. न्यायाधीशांनी मग थिरोवल्लूर येथील जिल्हा विधि सेवा अधिकार (Distirict Legal Services Authority) व तमिळनाडू राज्य विधि सेवा अधिकार (Tamil Nadu State Legal Services Authority) यांना मध्यस्थी करण्याचे आदेश दिले.

तमिळनाडू महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विशालक्षी नेदूनचरिअन यांनी न्यायालयाचा हा निर्णय अभूतपूर्व व योग्य ठरविला आहे. म्हणजे बलात्काराच्या खटल्यात आरोपी व पीडित महिला यांच्यात मध्यस्थी केंद्रामार्फत समेट होऊन वाद मिटणे, ही प्रक्रिया रास्त आहे. त्यांच्यामते उच्च न्यायालयाचा निर्णय जरा खटकत असला तरी तो अशा बलात्काराच्या खटल्यात तो नवीन मार्ग दाखवितो. म्हणजे आरोपीचा पीडित महिलेशी समेट घडवून त्यांच्यात विवाह घडवून आणतो. नेदूनचरियन मग म्हणतात, की न्यायालयाने या निर्णयाद्वारे बलात्काराच्या

खटल्यात एक नवीन व रास्त मार्ग चोखाळलेला आहे.

यावर पीडित मुलीची प्रतिक्रिया होती. तिने न्यायाधीशाचा निर्णय मानण्यास नकार दिला. ती विचारते, की त्या काळात मी काय भोगले याची न्यायाधीशाला कल्पना आहे का? त्यांच्या एका आदेशाने मला परत त्या यातनांत ढकलले आहे. मी याविरुद्ध लढत राहीन. मी एक दिवस माझ्या मुलीला ती कोण आहे ते सांगेन. जेव्हा जेव्हा ती मला विचारील की तिचा बाप कोण आहे, तेव्हा मी तिला सांगेन की तिला बापच नाही. पण जेव्हा तिला कळायला लागेल तेव्हा मी तिला निश्चितच सांगेन की तिचा बाप बलात्कारी होता. मी जगण्यासाठी व तगून राहण्यासाठी किती लढा दिला व किती संघर्ष केला ते मी तिला सांगेन व तसा मार्ग मी माझ्या मुलीला दाखवून देईन. जर मी समेट केला तर एक दिवस माझी मुलगी मला तिचे पालनपोषण करण्यासाठी त्या बलात्काऱ्याचे पैसे का घेतले असे विचारील? मी समेट केला तर आम्हांला काहीतरी मिळेल. पण तिचे भवितव्य काय असेल? एका बलात्काऱ्याची मुलगी म्हणून? जरी ती एका बलात्काऱ्याची मुलगी असली तरी तिला एक दिवस उमजेल की तिच्यासाठी तिच्या आईने काय संघर्ष केला. या कष्टपर मार्गातून ती शिकत राहिल. त्यातूनच ती एक चांगली स्त्री बनेल. ती पीडिता म्हणते, ''मला न विचारताच न्यायालयाने समेट घटवून आणण्याचा आदेश देणे योग्य नाही. त्या नराधमाने मला सात वर्षे यातना दिल्या. आता तो माझ्याशी लग्न करण्यास तयार आहे. तुरुंगात जाण्यापासून वाचण्यासाठी तो मध्यस्थीसाठी तयार झाला आहे. माझ्या यातना ज्यांनी पाहिल्या आहेत त्यांनाच मी काय भोगले आहे याची कल्पना आहे. पैसे कमाविण्याचे अनेक मार्ग आहेत. पण आत्मसन्मान विकत घेता येत नाही. न्यायाधीशाचा आदेशही माझा आत्मसन्मान हिरावून घेऊ शकत नाही.''

मला न विचारताच मला माझा आत्मसन्मान बलात्काऱ्याच्या दयेखाली दाबून टाकण्याचा न्यायालय आदेश देते. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने हा आदेश रद्द करायला हवा.

**पर्यायी विवाद निवारणपद्धती**

या खटल्यात न्यायमूर्ती पी. देवदासा यांनी हा खटला पर्यायी विवाद निवारण केंद्राकडे सोपविणे योग्य, रास्त, विवेकपूर्ण तसेच कायदेशीर होते का, असा वाद निर्माण झाला होता. पर्यायी विवाद निवारणपद्धती ही कायद्याच्या अखत्यारितच आहे. न्यायालयात खटल्याच्या निकाल लागण्यात प्रदीर्घ काळ जातो. यावर उपाय म्हणून पर्यायी विवाद निवारणपद्धतीचा अवलंब केला जातो. पर्यायी विवाद निवारण म्हणजे न्यायालयीन प्रक्रियेच्या बाहेर वाद मिटविण्याची पद्धती. यात कायद्याची योग्य प्रक्रिया बाजूला ठेवून विवादी पक्षकारांमध्ये तडजोड घडवून वाद मिटविण्यास वाव दिला जातो. पण यात तडजोडीने घेतलेल्या निर्णयाला कायद्याचे पाठबळ असते. म्हणजे दोन्ही पक्षकारांनी तडजोडीने घेतलेल्या निर्णयाचे त्यांना पालन करावे लागते. त्याचे उल्लंघन हे न्यायालयीन निर्णयाचे उल्लंघन मानले जाते. पर्यायी विवाद निवारणाचे चार प्रकार आहेत.

एक : पक्षकारांनी परस्परांशी संवाद, समेट व तडजोड करून वाद मिटविणे.

दोन : पक्षकारांमध्ये एक त्रयस्थ वाद मिटविण्यास मदत करतो. त्यांना मान्य होईल असा तोडगा तो सूचवित असतो. तो आपला निर्णय पक्षकारांवर लादत नसतो.

तीन : पक्षकार एका त्रयस्थाकडे त्यांच्या वादावर तोडगा काढण्याचे कार्य सोपवित असतात. त्या त्रयस्थाने घेतलेला निर्णय मग त्या पक्षकारांवर बंधनकारक असतो.

चार : एक मध्यस्थ दोन्ही पक्षकारांमध्ये त्यांना मान्य होईल असा समेट घडवून आणतो. यात घेतलेला निर्णय पक्षकारांवर बंधनकारक असतो. या खटल्यात न्यायमूर्ती पी. देवदासा यांनी पर्यायी विवाद निवारण पद्धतीतील मध्यस्थ या प्रकाराचा अवलंब केला.

मध्यस्थ वा त्रयस्थांमार्फत वादाचे निवारण करणे ही प्राचीन पद्धती आहे व ती जगात सर्वत्र अवलंबिली जात होती. टोळीचा मुख्य असे वाद मिटवित असे. त्रयस्थ वा मध्यस्थ यांच्यामार्फत वाद मिटविणे हा प्राचीन रोमच्या कायद्याचा भाग होता. भारतात जातिव्यवस्थेमध्ये जातपंचायत वादाचे अशा प्रकारे निवारण करीत असते. पंचायतीने घेतलेला निर्णय पक्षकारांना मान्य करावाच लागतो. भारतीय न्यायपद्धतीत पर्यायी विवाद निवारणपद्धती ही लवाद कायदा १९४० (Arbitration Act 1940 ) या कायद्यामार्फत अंगीकारली गेली. कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर १९०८ मधील ८९ कलमात दुरुस्ती करून कलम ९८(१) नुसार वाद न्यायालयीन प्रक्रियेच्या बाहेर मिटविण्याचा प्रयाय दिला गेला. जर न्यायाधीशाला एखाद्या खटल्यात दोन्ही पक्षकारांमध्ये वाद मिटवून समेट घडवून आणण्याची शक्यता दिसली तर न्यायाधीश तो खटला

पर्यायी विवाद निवारण पद्धतीतील लवाद वा मध्यस्थ यांच्याकडे सोपवितो.

पण कोणत्या प्रकारच्या गुन्ह्यातील खटला पर्यायी विवाद निवारणपद्धतीकडे सोपविता येऊ शकतो? बलात्काराचा गुन्हा असलेला खटला पर्यायी विवाद निवारणपद्धतीकडे सोपविणे हे रास्त, न्याय्य व विवेकपूर्ण असू शकते का?

**न्यायाधीशाचा दृष्टिकोन**

या खटल्यात पी. देवदासा यांच्याऐवजी दुसरा न्यायाधीश असता तर त्यांनी यापेक्षा कदाचित वेगळा निर्णय दिला असता. म्हणजे कायद्याचा अर्थ अन्वयार्थ हा न्यायाधीशाच्या दृष्टिकोनावरही अवलंबून असतो. मध्य प्रदेशात मदनलाल या नराधमाने बालिकेवर लैंगिक अत्याचार केला होता. आरोपी मदनलाल व त्याचे पालक मुलीच्या आईवडिलांशी समेट करू पाहत होते. पण ट्रायल न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून त्याला पाच वर्षांची कैद ही शिक्षा सुनावली होती. पण उच्च न्यायालयाने तो लैंगिक अत्याचार विनयभंग ठरवून पाच वर्षांची शिक्षा रद्द केली.

त्यावर राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केले. सर्वोच्च न्यायालयाच्या दीपक मिश्रा व पी. सी. पंत यांच्या खंडपीठापुढे तो खटला आला. त्यांनी बलात्कार व बलात्काराचा प्रयत्न केलेल्या खटल्यात कोणत्याही परिस्थितीत समेटचा विचार करणे योग्य नाही, असे म्हटले. तसा समेट करणे हा तिचा आत्मसन्मानाविरोधी आहे. पण सर्वोच्च न्यायालयाच्या ही टिप्पणी मद्रास उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करणारी नव्हती. उलट तमिळनाडू राज्य विधि सेवा ॲथॉरिटीने त्या पीडित मुलीला १३ जुलैला मध्यस्थीकरिता उपस्थित राहण्याचे फर्मान काढले. मद्रास उच्च न्यायालयाच्या शंभर वकिलांनी त्या पीडितेच्या बाजूने मुख्य न्यायाधीशास एक विनंतीअर्ज सादर केला आहे. त्यांच्या मते, त्या मुलीची इच्छा नसताना न्यायालयाने ती मुलगी व तो बलात्कारी यांच्यात शांततापूर्वक तडजोड घडवून त्यांचा विवाह करून देणे, हा रास्त मार्ग नाही. न्यायालयाचा हा निर्णय त्या मुलांचा आपला जोडीदार निवडण्याच्या स्वातंत्र्यावर व तिच्या स्वायत्तेवर परिणाम करतो. न्यायमूर्ती पी. देवदासा यांनी बलात्काराच्या गुन्हेगारी खटल्यात मध्यस्थीचा अवलंब करून न्यायप्रक्रियेच्या कक्षा ओलांडल्या आहेत. त्या विनंतिपत्रात त्या वकिलांनी दावा केला, की बलात्काराच्या गुन्हेगारी खटल्यात न्यायमूर्ती पी. देवदासा यांनी मध्यस्थीचा निर्णय व आदेश देऊन एक चुकीचा पायंडा पाडला आहे. न्यायमूर्ती पी. देवदासांचा हा निर्णय असाच अमलात राहिला तर पुढे बलात्काराच्या खटल्यात अनेक न्यायमूर्ती तो खटला चालविण्यापेक्षा मध्यस्थीचा मार्ग अवलंबणे हा निकष स्वीकारतील.

बलात्काराच्या खटल्यात असा आदेश त्या पीडित मुलीचा तिच्या इच्छेविरुद्ध बलात्काऱ्याशी घडवून आणणे हे त्या आरोपीस फायद्याचे असेल व न्यायालयाने तो जबरीने घडवून आणलेला विवाह असेल.

पी. देवदासा यांनी बलात्काराचा खटला पर्यायी विवाद निवारण केंद्राकडे सोपविल्याने काही मूलभूत प्रश्न निर्माण झाले. पर्यायी विवाद निवारणपद्धती ही कायद्याच्या योग्य प्रक्रियेबाहेरसुद्धा असू शकते. पक्षकारांमध्ये समेट करून वाद मिटविणे हा त्याचा मुख्य हेतू असतो. पण समेट करण्याकरिता त्रयस्थ वा मध्यस्थ कोणते निकष वापरतो? त्या निकषाच्या मुळाशी कोणती मूल्ये असतात? बलात्काराच्या खटल्यात त्रयस्थाचा व मध्यस्थाचा स्त्रीविषयी कोणता दृष्टिकोन असतो? तो वैश्विक दृष्टिकोन असतो की पारंपरिक दृष्टिकोन असतो? भारतीय समाजरचनेत विशेषतः जातिव्यवस्थेत व पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत स्त्रीचे स्थान खालचे आहे. ती पूर्णपणे पुरुषाच्या वर्चस्वाखाली असते.

पुरुससत्तेत तिच्या स्वातंत्र्याला स्थान नसते. स्त्रीचे पुरुषाच्या तुलनेत असणारे दुय्यमत्व व त्या अनुषंगाने होणारे तिचे शोषण हे समाजरचित असते. सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांच्या त्याला आधार असतो. सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये ही स्त्रीचे स्थान समाजरचनेत सतत कायम खालच्या स्थानावरच ठेवण्यासाठीच कार्यरत असतात.

स्त्रीवर अन्याय, अत्याचार वा कोणत्याही प्रकारची तिच्यावर होणारी हिंसा ही तिचे समाजरचनेतील खालचे स्थान कायम राखण्यासाठीच घडत असते. म्हणजे स्त्रीवरील हिंसा ही पुरुषप्रधान समाजरचना कायम टिकविण्यासाठी असलेले एक हत्यार असते. त्यामुळे स्त्रीवरील हिंसा ही मूलतः समाजरचित असते. जातिव्यवस्थेतील हिंसा ही जातीव्यवस्थेच्या संरक्षणासाठी असते. पारंपरिक सामाजिक सांस्कृतिक मूल्य हे व्यक्तीचे तिचे समाजरचनेतील कार्यानुसार वर्तन घडत राहावे याच्यासाठी कार्यरत असतात. या सांस्कृतिक मूल्यांनी स्त्रीचा आपल्या लैंगिकेतेवर असलेला ताबा हिरावून घेतला. तिच्या लैंगिकतेचे नियंत्रण व नियमन

पुरुष करू लागला. सगळी जातिव्यवस्था या सूत्रावर बेतली गेली. स्त्रीने आपली लैंगिकता कशी व्यक्त करावी अथवा तिने कोणत्या पुरुषाबरोबर विवाह करावा याचा निर्णय सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांनी स्त्रीपासून हिरावून घेतला. तिचे प्रतिष्ठा त्या मूल्यांनी तिने वागण्यातच रोधित केली गेली. न्यायाधीशांनी भारतीय संस्कृतीत स्त्री ही शक्ती, ती आई, बहीण, जीवनसाथी या स्वरूपात ओळखली जाते, असे म्हटले आहे. वस्तुत: स्त्रीचा असा गौरव हा ती एक व्यक्ती म्हणून तिचे सत्व व स्त्रीत्व हिरावून घेत असतो.

स्त्री ही आई, बहीण, पत्नी, शक्ती अशा उपाध्यांपेक्षा एक व्यक्ती म्हणून ओळखणे आवश्यक असते. व्यक्ती म्हणून स्त्रीला संविधानाने बहाल केलेल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण न्यायालयाने करणे आवश्यक असते. पण प्रत्येक पुरुषाच्या यशामागे स्त्री असते, हे वचन न्यायालयाने सांगणे म्हणजे स्त्रीला पुरुषी वर्चस्वापासून न्यायालय मुक्त करू पाहत नाही, असा त्याचा अर्थ होऊ शकतो. भारतीय संस्कृतीने व हिंदू धर्म मूल्यांनी स्त्रीच्या केलेल्या गौरवात, समाजरचनेतील व कुटुंबरचनेतील स्त्रीचे दुय्यमत्व, अधिकारहीनत्व व शोषण दडलेले आहे. धर्ममूल्याने घडवून आणलेल्या तडजोडीत व समेटात संघर्षहीनता व शांतता असली तरी त्यात शोषणात्मक समाजरचेनेचे स्थितिशीलत्व राखले जाते.

विवाहाविना स्त्रीला झालेल्या मुलास सामाजिक कलंक लागत असेल, तर तो दोष सामाजिक मूल्याचा आहे. त्याच्या मुळाशी पुरुषसत्ताक पद्धती व खाजगी मालमत्ता व तिचा कायदेशीर अधिकार हे मूल्य दडलेले आहे. कारण मालमत्तेचा अधिकार हा पुरुषाकडे दिला गेला. वारसाहक्कांने येणारा तो अधिकार पुरुषाने पत्नी म्हणून स्त्रीला स्वीकारल्यावर त्यातून झालेल्या अपत्यास प्रदान होत असतो. भारतीय घटनेच्या निर्मितीप्रक्रियेत मूलभूत हक्कांची मांडणी होत असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बेवारस अपत्य ही संकल्पना नष्ट करून त्याला त्याच्या जीवशास्त्रीय पित्याच्या संपत्तीचा वारसा हक्क प्रदान करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याला विरोध होऊन त्यांचे ते मत नाकारलेले गेले.

मूलभूत हक्क हे जात, धर्म, वंश, लिंग यांच्या निरपेक्ष एक व्यक्ती म्हणून दिले गेले. स्वातंत्र्य हे मग व्यक्तीने आपल्या इच्छेने वागण्यात व अनेक पर्यायातून निवड करण्यात असते. यातून व्यक्तीची आत्मप्रतिष्ठा व आत्मसन्मान हा तिच्या स्वातंत्र्यात व इतरांच्या तुलनेत समान असण्यात सामावलेला असतो. आत्मसन्मान मग आपली कृती व वर्तणूक ही कोणाच्या इच्छेच्या व अधिकाराच्या अखत्यारित असण्यापासूनच्या मुक्ततेत असतो. स्वातंत्र्य व निवड यात व्यक्तीची प्रतिष्ठा बद्ध केली तर व्यक्तीने आपला जीवनसाथी कोण असावा व कोणापासून मूल व्हावे हा तिचा मूलभूत हक्क ठरतो. त्यामुळे बलात्कार हा स्त्री एक व्यक्ती म्हणून तिच्या स्वातंत्र्यावर केलेल्या हल्ला व म्हणून तिच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन म्हणून न्यायालयाने पाहणे हेच कायदेशीर असते. त्यामुळे समतेच्या तत्त्वानुसार आपण इतरांइतकेच समान प्रतिष्ठेचे असून, आपण निवड केलेल्या व्यक्तीशी विवाह करणे वा त्याच्यासोबत राहणे, त्याच्याबरोबर कुटुंब वसविणे, अपत्यास जन्म देणे हे कोणत्याही सामाजिक, धार्मिक मूल्यांच्या अखत्यारित नसून ती घटना कायद्याच्या कक्षेतील बाब असते. त्यामुळे बलात्कारातून झालेल्या मुलाचा बाप असलेला बलात्कारी पुरुष हा मुलाचा जीवशास्त्रीय बाप असला तरी तो कायदेशीर बाप व आपला पती म्हणून नाकारण्याचा हक्क त्या स्त्रीला असणे रास्त ठरते.

बलात्कारातून झालेल्या मुलाला काही दोष नसताना सामाजिक कलंक लागतो, याचा न्यायालयाने विचार करणे अभिप्रेत नसून उलट समाज व राज्य अशा मुलाला एक व्यक्ती म्हणून सन्मानाने कसे स्वीकारेल यासाठीचा अवकाश न्यायालयाने निर्माण केला पाहिजे. म्हणजे या तत्त्वाच्या विरोधी ज्या रूढी, रीतीरिवाज, सामाजिक व धार्मिक नियम व कायदे असतील ते घटनात्मक कायद्याच्या विरोधी म्हणून घटनात्मक ठरविले पाहिजे.

या संदर्भात त्या पीडित मुलीने घेतलेली भूमिका ही स्त्रीच्या आत्मप्रतिष्ठेविषयी संवदेनशील, योग्य, रास्त, विवेकशील व कायदेशीर होती. ती म्हणते की आपली मुलगी मोठी झाली की तिला तिचा बाप हा बलात्कारी होता हे मी तिला सांगेन. न्यायालय बलात्कारातून झालेल्या व विवाहाशिवाय झालेल्या मुलास सामाजिक कलंक लागतो, ही भूमिका घेते, तर याउलट ती मुलगी हे सर्व सामाजिक संकेत, मूल्ये उधळून देते. न्यायालय बलात्काराबरोबर तिचा विवाह करून देण्याचे योजते तर याउलट ती त्याचा धिक्कार करते. तिला बलात्काऱ्याच्या पैशावर जगणे अपमानास्पद वाटते. त्या बलात्काराच्या

(पान २१ वर)



# जनमत २०१६ : प्रादेशिक पक्ष विरुद्ध राष्ट्रीय पक्ष?

केतनकुमार पाटील

भारतातला निवडणूक आयोग हा सदैव व सर्वात व्यस्त असलेला व चर्चिला जाणारा आयोग आहे! सध्या निवडणूक आयोगाचे अध्यक्ष व सदस्य हे २०१६ च्या एप्रिल-मेमध्ये होऊ घातलेल्या राज्य विधानसभांच्या निवडणुकांची तयारी करण्यासाठी राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, पाँडेचरी व आसाम या राज्यांत सध्या निवडणुकांचे पडघम वाजत आहेत. या सर्व राज्यांतील परिस्थिती पाहता राष्ट्रीय पक्षांना अगोदर मिळालेल्या जागा टिकवता येतात का हे आव्हानच असेल कारण २०१४ च्या लोकसभा निवडणुकांमधले Advantage हे जसेच्या तसे कुठल्याही राज्यात परिवर्तित झालेले नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आसाम वगळता इतर चारही राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांचाच बोलबाला राहणार आहे. आसाम वगळता इतर सर्वच राज्यांमध्ये सलगपणे कुठलीही एक आघाडी किंवा पक्ष सत्तेत नव्हता. भारतीय जनता पार्टीने आसाम निवडणुकांसाठी आपल्या पक्षाचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलेला आहे. जो त्यांनी बिहार निवडणुकीत शिकलेल्या धड्याचा भाग असू शकतो अन्यथा आसाममधल्या धार्मिक ध्रुवीकरणाचा पाया असू शकतो. ह्याचा आधार असा की सोनोवाल यांच्या वक्तव्यांची सुरुवातच ही ध्रुवीकरणाला पाठिंबा देणारी आहे. संघ व संघाच्या गुप्तपणे चालणाऱ्या सामाजिक/धार्मिक ध्रुवीकरणाचे पडसाद येत्या काळात पूर्वोत्तर राज्यात आपल्याला दिसून येतीलच. अरुणाचलचे अस्थिर सरकार, नागा कराराची अंतिमत: अंमलबजावणी व आसाम निवडणुकांच्या काळात अनुसूचित जमातींचा दर्जा मागणाऱ्या जातसमूहांची मागणी मान्य करणे ह्या एकाच वेळेस भाजपाला राजकीय व सामाजिकदृष्ट्या फायदा करुन देणाऱ्या गोष्टी ठरू शकतील.

२०१६ मध्ये होऊ घातलेल्या निवडणुकांची राज्यवार आपण चर्चा करूया.


ईमेल : imketankumar@gmail.com

**१. आसाम**

तरुण गोगोई यांच्या सलगच्या पंधरा वर्षांच्या कारकिर्दीमुळे Anti-incumbency factor हा इथल्या निवडणुकांचा महत्त्वाचा भाग असेल. भाजपा ह्या निवडणुकीतसुद्धा धार्मिक आधारावर मतांच्या विभाजनावर भर देईल ही स्पष्ट बाब आहे. आसामच्या लोकसंख्येपैकी ३४% लोकसंख्या मुस्लीम आहे व इतर भाग बंगाली आणि आसामीभाषिक हिंदुबहुल लोकसंख्येचा आहे.

आसाम गण परिषद, बोडोलँड पीपल्स फ्रंट व AIUDF ह्या प्रादेशिक पक्षांमध्ये ह्या वेळच्या निवडणुकीत विशेष स्पर्धा असेल. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला राज्यात सात खासदार मिळाले. हे आसाममधले त्यांचे सर्वोत्तम यश आहे. यासोबतच १२६ पैकी ६९ विधानसभा मतदारसंघांतून भाजपने आघाडी घेतली होते. बिहारमध्ये लोकसभेच्या आघाडीनुसार विधानसभेत मते मिळविता आली नाहीत पण आसाममध्ये स्थानिक महानगरपालिका व नगरपालिकेच्या निवडणुकांत भाजपाने फेब्रुवारी २०१५ मध्ये तब्बल तेवीस नगरपालिका, वीस ग्रामीण समित्यांवर झेंडा रोवला आणि या तुलनेत काँग्रेसने सात नगरपालिका व नऊ ग्रामीण समित्या मिळविल्या. आसामच्या राजकारणात बांग्लादेशी स्थलांतरित हा कायमचा मुद्दा आहे व तो यावेळेसही चर्चिला जाणार. नुकतेच भारताने बांग्लादेशासोबत सीमाभागातील वस्त्यांची देवाणघेवाण केलेली आहे.

काँग्रेसमधले नेते हे भाजपात गेल्याने काय फरक पडतो व पंधरा वर्षांच्या अपींळ-ळपर्लीलशपलू चा रोल आहे का किंवा मागल्या वेळेप्रमाणेच तरुण गोगोई स्वबळावर सरकार बांधतात का हे पाहणे उचित ठरेल, पण एक मात्र नक्की, की, भाजपा आपला बऱ्यापैकी आधार निर्माण करण्यात जसा येथे यशस्वी ठरेल, तसाच काँग्रेसच्या खच्चीकरणामुळे येथल्या प्रादेशिक पक्षांचा भाव मात्र नक्कीच वधारलेला असेल.

**२. तामिळनाडू**

भारतीय राजकारणातील दोन प्रबळ प्रादेशिक पक्ष पण नेहमीच विरोधक आणि सत्ताधारी अशा भूमिकांमध्ये, असे दुर्मिळ चित्र तामिळनाडूमध्ये पाहावयास मिळते. वेगळ्या 'द्रविडनाडू' देशाची मागणी मांडता-मांडता आपलं अस्तित्व टिकवून वेळप्रसंगी राष्ट्रीय भावनांना पाठ दाखवून आपले वेगळेपण सिद्ध करणारे तमिळ राजकारण हे भारतीय राजकारणातला वेगळाच पोत जपताना दिसते.

तमिळनाडूमधले AIADMK व DMK हे दोन्ही पक्ष मूलतः एकाच प्रवाहाचे दोन भाग व गेल्या चार दशकांत आलटून-पालटून सत्ता उपभोगणारे दोन पक्ष राहिले आहेत. ब्राह्मण्यवादाला व अर्थातच तेव्हाच्या काँग्रेसला प्रतिक्रिया म्हणून द्रविडांच्या राजकारणाला सुरुवात झाली. Justice Party तून फुटून निघून तयार झाली ती DMK व नंतर AIDMK जयललिता व करुणानिधी यांच्यातले वैर हे प्रत्येकाच्या शासनकाळात वाढलेलेच आहे. एकमेकांना तुरुंगात टाकणे, लोकानुनयाच्या अनेक योजना अंमलात आणणे व आपला जनमानसांवरील प्रभाव टिकवण्यासाठी 'प्रतिमासंवर्धन' करणे. जेव्हा जयललिता ह्या तुरुंगात होत्या तेव्हा म्हणे त्यांचे मंत्री पनीरसेल्वन हे मुख्यमंत्री राहिले, पण 'अम्मांच्या' खुर्चीवर बसून कारभार न पाहता त्याशेजारी वेगळी खुर्ची ठेवून तेथूनच ते कारभार पाहत होते.

२०११ च्या निवडणुकांत फक्त लढत जणू दोनच पक्षांत होती. २३४ विधानसभा जागांपैकी जयललिता यांच्या एआयएडीएमके आघाडीने २०३ जागा मिळवत दणदणीत विजय मिळवला होता. त्यात एआयएडीएमकेच्या १५० जागा व डीएमडीकेच्या २९ जागा होत्या. करुणानिधी यांना संयुक्त पुरोगामी आघाडीमधल्या आपल्या मंत्रीगणांमुळे बरेच नुकसान झाले व पूर्वी ४२% मिळालेली मते ही २२% पर्यंत घसरली व १०० जागांवरून ते २३ जागांवर आले होते.

२०१४ च्या लोकसभा निकालात एआयएडीएमकेने ३९ पैकी ३७ जागा मिळवल्या आणि या पूर्वीपेक्षा २८ जागा जास्त आहेत. भाजपाच्या मतदानात ३ टक्क्यांनी वाढ झाली, पण आपले अस्तित्व दाखविण्यात भाजपा अथवा काँग्रेसला येथे वाव नाही, कारण स्थानिक पक्ष व श्रीलंकेसोबतच्या मुद्द्यांना न्याय न दिल्याच्या भूमिकेतून काँग्रेसला नकार मिळाला तसाच तो भाजपालाही मिळू शकतो. या निकालांना फक्त वेगळे वळण लावू शकतात ते अलीकडेच आलेल्या पुराचे परिणाम व त्याचा विरोधक कसा फायदा उचलतात यामुळेच. अन्यथा मोदीलाटेतही आपली वेगळी लाट निर्माण करणाऱ्या अम्मा पुन्हा एकवार सर्व लाटांवर स्वार होतील.

**३. पश्चिम बंगाल**

तब्बल तीन दशके डाव्यांचा गड समजल्या जाणाऱ्या बंगालात पूर्वाश्रमीच्या काँग्रेसी अशा ममता बॅनर्जी यांनी

२०११ मध्ये मुसंडी मारून काँग्रेसच्या सोबतीने डाव्या पक्षांना धुळीला मिळविले. नंद्रिग्रामचा व सिंगूरचा लढा ममतांना मुख्यमंत्रीपदापर्यंत घेऊन गेला हे जसं नाकारता येत नाही तसंच डाव्यांच्या अनिर्बंध सत्तेला वैतागलेला एक उजव्या विचारसरणीचा उदय हाही भाग ममतांच्या मदतीला आला.

मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले व २००६ च्या निवडणुकात तब्बल २३३ जागा असलेल्या डाव्या आघाडीला यावेळी केवळ ६२ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेससोबत टीएमसीच्या आघाडीला २२७ जागा मिळाल्यात ज्या २००६ मध्ये फक्त ३० होत्या.

२०१६ च्या होऊ घातलेल्या निवडणुकांत भाजपाला चंचुप्रवेश मिळण्याची शक्यता आहे. कारण २०१४ च्या लोकसभा निवडणुकांतून त्यांनी दोन जागा पटकावल्या व राज्यभरात झालेल्या नगरपालिका, जिल्हा परिषदात आपला टक्का पूर्वीपेक्षा वाढवून दाखविला आहे. २०१४ मध्ये भाजपाने आपल्या मतदारांत १०% वाढ केली आहे तर काँग्रेसने ३% घट दर्शविली आहे. २०१४ च्या निवडणुकांतही ममतांनी आपला करिश्मा कायम ठेवत ३४ जागा पटकावल्या व मतांत ९% एवढी वाढ केली.

ममतांना यावेळेस आव्हान असेल ते काँग्रेस व डाव्या आघाडी एकत्र लढल्या तर अन्यथा ममतांची नाव पुन्हा एक वेळ तरून जाणार हे नक्की! ममता काँग्रेसला राज्यसभेत व लोकसभेत मदतीचे आश्वासन देऊन ही आघाडी रोखू शकतात किंवा मग या आघाडीला विरोध करतानाच भाजपाकडून सहानुभूतीपर व्यवहार मिळवू शकतात. भाजपाला हे समीकरण पश्चिम बंगालपुरते परवडणारे नसले तरी राज्यसभेसाठी परिणामकारकपणे उपयोगी ठरेल. काँग्रेसमध्ये स्वतंत्र लढणे किंवा डाव्या पक्षांसोबत युती असे दोन पर्याय आहेत. काँग्रेस बहुधा स्वतंत्रपणे लढून संकटातून सुटण्याच्याच प्रयत्नात असेल.

ममतांना विजय मिळाल्यास भाजपासाठी डोकेदुखी वाढू शकते, कारण पुढील तीन वर्षांत पश्चिम बंगालमधून तब्बल नऊ राज्यसभेच्या जागांवर निवडणुका आहेत. ममतांना या निवडणुकांत संधी असली तरी ती निर्विवाद द्यायची नाही असा चंग सर्वच विरोधकांचा असेल पण त्रिशंकू विधानसभेची शक्यता निर्माण झाल्यास ममता कुठल्या बाजूस झुकतात हे पाहणे अगत्याचे असेल हे मात्र नक्की!

**४. केरळ**

ज्या राज्यात महिलांचे प्रमाण हे पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्याहून जास्तच आहे. (केरळात १२७ मतदारसंघांत स्त्रियांची संख्या ही पुरुषांच्या संख्येपेक्षा जास्त आहे व केरळात एकूण १४० विधानसभा मतदारसंघ आहेत.) केरळचा मानव विकास निर्देशांक भारतात सर्वोत्तम असा ०.७९० इतका आहे. केरळची साक्षरता ९३.९१ आहे, तर आयुष्यमान सरासरी ७४ वर्षे आहे.

२०११ मध्ये केरळात झालेल्या १४० मतदारसंघातल्या निवडणुकांत युडीएफ (काँग्रेसप्रणीत आघाडीला) ७२ जागा मिळाल्या व डाव्या पक्षाच्या आघाडीला ६८ जागा मिळाल्या. भारतीय जनता पार्टीला एकही जागा मिळाली नाही, मात्र ६.०६% मते मिळाली. एलडीएफ व युडीएफ यांच्यात फक्त १% मतांचा फरक होता. २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांत काँग्रेसने वीसपैकी आठ व माकपने पाच जागा मिळविल्या होत्या.

केरळात काँग्रेस आघाडी व डाव्या आघाडीसोबतच भाजपाने संघाच्या प्रचारकांना सोबत घेऊन प्रचाराला सुरुवात केली आहे. नरेंद्र मोदींनी गुरुवायूर मंदिरात जाऊन या प्रचाराला जणू डिसेंबरमध्येच सुरुवात केली होती. भाजपाने केरळातल्या हिंदूंना हाताशी धरायचा प्रयत्न केला आहे. इझुवा व नायर यांच्या २००६ ते २०१४ या काळात मतदानात झालेली वाढ पाहता ती भाजपाकडे झुकणार आहे व मागील पाच वर्षांत काँग्रेसच्या सरकारवर भ्रष्टाचार, गलथानपणाचे आरोप झालेले आहेत.

केरळ हे राज्य पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे आणि युडीएफ आघाडी सरकारने राज्यात पंचतारांकित हॉटेल वगळता इतरांना दारूविक्री परवाने नाकारले आहेत व दारूबंदीही लावली आहे. त्यामुळे व्यापारीवर्ग नाराज आहे. शिक्षणाचे प्रमाण, मध्यमवर्ग व शहरी लोकसंख्या हे भाजपाच्या पारड्यात जाणारे जसे घटक आहेत, तसेच संघाच्या ४,६०० पेक्षा अधिक शाखा, मुस्लीम एकगठ्ठा मते व ध्रुवीकरण यांचा भाजपा फायदा घेऊ शकतो.

त्रिशंकू विधानसभेची शक्यता निर्माण झाल्यास भाजपाची एखाददुसरी जागाही महत्त्वाची ठरू शकते. भाजपाने आत्तापर्यंत केरळमध्ये एकही विधानसभा, लोकसभा जागा मिळविलेली नाहीच.

डाव्यांना केरळातच संभवत: विजयाची खात्री असू शकते आणि इथेही जर हार पत्करावी लागली तर भारतात

डाव्या चळवळीला व डाव्या विचारसरणीच्या पक्षीय राजकारणाला घरघर लागणे हे मात्र निश्चित आहे. तशा ह्या सर्वच विधानसभांमध्ये स्थानिक/प्रादेशिक पक्षांनाच संधी आहेत. पूर्वीपासून भाजपाचे तुरळक अस्तित्व व काँग्रेसची होत चाललेली पिछेहाट पुन्हा प्रादेशिक पक्षांच्या ९० च्या दशकातील राजकारणाची पुनरावृत्ती ठरू शकते.

**५. पाँडेचेरी/पुद्दुचेरी**

फ्रेंच वसाहतीतून बनलेल्या पूर्वीच्या पाँडेचेरी व आताच्या पुद्दुचेरीमध्ये एकूण तीस विधानसभेच्या जागा आहेत. काँग्रेसमध्ये २०११ च्या निवडणुकांपैकी फूट पडून All India N. Ramgaswamy Congress of N Ramgaswamy यांनी निर्माण केली व लढलेल्या एकूण सतरापैकी पंधरा जागा पटकावल्या. काँग्रेसने लढलेल्या दहापैकी सात जागा जिंकल्या. एआयएडीएमके, डीएमके यांनी पाच व दोन अशा जागा जिंकल्या होत्या. एकूण चार वेगवेगळ्या ठिकाणी विभागलेला हा केंद्रशासित प्रदेश आहे. काँग्रेसच्या फुटीमुळे हा प्रदेशही प्रादेशिक पक्षांच्या ताब्यात आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत N. Ramgaswamy यांनी भाजपासोबत युती केली होती व एकमेव लोकसभेची जागाही ते जिंकले.

आता होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांत भाजपा AINRC सोबत युती करून आपले स्थान निर्माण करण्याच्या प्रयत्नांत असेलच व मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांना भाजपासोबतची युती केंद्राकडून होणाऱ्या मदतीसाठी आवश्यक ठरेल. कारण केंद्रशासित प्रदेशांवर नियंत्रण तसे पाहता केंद्राचेच असते.

जयललिता व करुणानिधी यांचेही पक्ष आपापली ताकद अजमावतील. कारण त्यांचा सहानुभूतीदार मतदार या भागांमध्ये आहे.

एकूण भारतात होऊ घातलेल्या २०१६ मधल्या राज्य विधानसभेच्या निवडणुकांत प्रादेशिक पक्षांना झुकते माप आहेच, पण मतदारांचे मत हे मतपेटीतून आलेल्या निकालांवरच अवलंबून असते. अंदाज न येऊ देण्याइतपत सजग शहाणपण आता मतदारांत नक्कीच आहे. पण राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षासोबत जुळवून घ्यावे लागणार हे नक्कीच.

ता. क. : जम्मू कश्मीर व अरुणाचलचा तिढा सुटला नाही तर या दोन राज्यांत पुन्हा निवडणुका होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसे भारतात प्रत्येक वर्ष हे निवडणुकांचेच वर्ष असते. ●

---

**(सुधाकर गायकवाड / पान १७ वरून)**

पैशावर जगण्यापेक्षा जगण्याकरिता अनेक मार्ग आहेत असे ती म्हणते. ती स्वकष्टाने आपला व आपल्या मुलीचा उदरनिर्वाह करू पाहते. न्यायालयाने आपल्याला न विचारता आपले मत ध्यानात न घेता त्या बलात्काऱ्याशी समेट करून विवाह करण्यास सांगणे तिला अन्यायकारक वाटते. ती न्यायालयाचा हा आदेश मानण्यास नकार देते. ती मुलगी केवळ सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक रूढी, रीती, नियम व मूल्ये यांनाच केवळ आव्हान देत नव्हती, तर ती न्यायालयाच्या भूमिकेवरही आव्हान देत होती. पी. देवदासा यांच्या निर्णयावर वांदग माजले. आरोपीने ऑक्टोबर २०१५ मध्ये मद्रास उच्च न्यायालयात अपिल केले. त्यात उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की खालच्या जिल्हा न्यायालयाने बलात्काराच्या वेळी पीडित मुलीचे वय १५ वर्षे होते की नाही याची योग्य पडताळणी केली नाही. उच्च न्यायालयाने तो खटला खालच्या न्यायालयात वयाच्या योग्य पडताळणीसाठी परत वर्ग केला. शिवाय आरोपीला कुड्डालोर महिला न्यायालयाने ठोठावलेला दोन लाखाचा दंड त्याला परत करण्याचा आदेश दिला. उच्च न्यायालयाचे आदेशाने कुड्डलोर न्यायालयाने पीडित मुलीची वयपडताळणी सुरू केली. ती पीडिता कोसळली. आरोपी शिक्षेपासून आपली सुटका करून घेण्यासाठी न्यायालयाच्या आदेशाने आपणाशी लग्न करू पाहत आहे, हे तिला माहीत होते. पण तिच्याकडे उपजीविकेचे कोणतेच साधन नव्हते. ती व तिची मुलगी, तिच्या भावावर अवलंबून राहत होती. त्यात उच्च न्यायालयाने तिचा खटला परत खालच्या न्यायालयात वर्ग केला. तिच्या आशा मावळल्या. ती हरली. न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे तिने आपल्या बलात्काऱ्याशी लग्न केले.

उच्च जातीवर्गाच्या स्त्रीवर होणाऱ्या बलात्काराबद्दल बलात्काऱ्याला फाशी देण्याची मागणी होते. खालच्या जातीवर्गातील स्त्रीवर होणाऱ्या बलात्काराबद्दल तिला बलात्काऱ्याशी लग्न करण्याचा 'न्याय' दिला जातो. हा 'वर्गीय' न्याय होय. ●

# अ.भा.वि.(द्रु)प.

जयदेव डोळे

हैदराबाद केंद्रीय विद्यापीठातला रोहित वेमुला एका क्रौर्याचा बळी आहे. हे क्रौर्य खास संघीय आहे. कठोरता आणि क्रौर्य यांत तसा फार फरक नसतो. पण कठोरता शिस्तीशी जोडली गेली आहे. त्याचबरोबर ती सहनशीलता, एकाग्रता, प्रयत्नांची पराकाष्ठा, चारित्र्याची जपणूक यांनाही जोडणारा एक भाग आहे. मनाने केलेला ठाम निर्धार कधीकधी कठोरपणाशी जाऊन भिडतो. उदाहरण घ्यायचे झाल्यास लग्नानंतर पत्नीला टाकून देण्याचा कठोरपणा नरेंद्र यांनी दाखवला किंवा कांशीराम यांनी राजकीय कार्यासाठी घर सोडले, ते कधी घरच्यांना न भेटण्यासाठीच. किंवा गांधीजी कस्तूरबांवर आपले हट्ट लादत आणि बा अनिच्छेने निरनिराळे प्रयोग सोसत. तेव्हाही गांधींचा कठोरपणा दिसे. पण या तिन्ही उदाहरणांत क्रौर्यही आहे. भावनांचा लवलेशही नाही. समोरच्याला काय वाटेल आणि समोरच्याची तयारी किती याचा मुळीच विचार न करता आपलाच हेका राबवून घ्यायचा हा कठोरपणा होय. त्यात क्रूरताही येतेच. प्रतिज्ञेचे पालन, आचाराचा आविष्कार आणि वर्तन सातत्याचे भवितव्य राखण्यासाठी केलेला कठोरपणा कोणाचा अपमान करतो, कोणाची भावना चुरगाळतो अथवा कोणाची सहनशीलता ताणतो, यांकडे कठोर माणसांचे लक्ष नसते. गळा दाबणाऱ्याला आपल्या हातांना बसणारे झटके जाणवत नसतील काय? शरीरावर घाव घालणाऱ्याला वेदनांनी कळवळणारा चेहरा दिसत नसेल काय?

विद्यार्थ्यांशी कठोरपणे वागून चालत नाही. परंतु संघ नेमका याच अत्यंत संवेदनशील, हळव्या, प्रभावक्षम आणि भावुक वयोगटाविषयी फार कठोर वागतो. प्रेम ही भावना तरुण विद्यार्थ्यांच्या जीवनक्रमातली सर्वात मोठी भावना. पण ती संघ जाणीवपूर्वक अव्हेरतो आणि तिच्या जागी कठोरता आणून ठेवतो. शिस्तीचे पालन घरापासून होत असेल


ईमेल : djaidev1957@gmail.com

तर शाखेत, शिबिरात अथवा शासनात ती टिकते. आईवडिलांची आर्थिक स्थिती, व्यवसाय, जातिव्यवस्था, शिक्षण आणि शेजारपाजार यांवर घरोघरची शिस्त अवलंबून असते. संघाच्या शाखांत ती टिकते. संघाच्या शाखेत ती तेवढ्यापुरती आणि सामूहिक वर्तनाचा भाग म्हणून आढळते. ती स्वयंस्फूर्त कमी, आदेशित अधिक असते. विद्यार्थ्यांचे तारुण्य निसर्गत:च शिस्तीची वाट लावणारे असते. महणून या तारुण्याला सदोदित भव्यदिव्य उद्दिष्टासाठी शिस्तपालन करायला संघात सांगितले जाते. संघशाखांमधून अभाविपमध्ये दाखल झालेला स्वयंसेवक बुद्धिमत्तेपेक्षा किंवा बौद्धिक चमक दाखवण्यापेक्षा शिस्त, चारित्र्य, ठरावीक वर्तन यांचा आधार घेऊन प्रभाव पाडायच्या प्रयत्नात असतो. आपण फार कठोर आहोत असे वारंवार दाखवून देत राहतो. व्यसने, वेळ घालवणे, करमणुकीसाठी खर्च, खेळ आणि अन्य कौशल्ये, प्रेम व मित्रमैत्रिणी, निसर्गात भटकंती आदी तारुण्यसुलभ आकर्षणे अभाविपला अमान्य असतात. स्वाभाविक मोकळेपणास विशिष्ट आकार देण्याचा आणि विशिष्ट साच्यात कोंबण्याचा प्रयत्नही संघटना फार करीत राहते. विद्यापीठांत दोन व महाविद्यालयांत चार वर्षांसाठी येणाऱ्यांवर झडप घालून सर्वांचे एकसाची वर्तन करवण्याचा ती कायम प्रयोग करते.

अभाविपबाबत एक विधान असे आहे : ''विद्यार्थी परिषदेचा राजकारणाशी संबंध नाही असा दावा असतो. आसाममधील परदेशी नागरिकांचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे, यात वाद नाही. पण तो राजकारणाशी संबंधित तितकेच खरे. तो विद्यार्थी परिषदेच्या कार्यकक्षेत येतो का? सामान्यपणे विद्यार्थी संघटनांचे जे कार्य समजले जाते त्यात त्याचा समावेश आहे असे कुणी म्हणू शकणार नाही. देशातील राष्ट्रीय नागरिकांचा तो असल्यामुळे विद्यार्थी परिषदेच्या कक्षेत तो येतो असे जर कुणी म्हणेल तर मग हा प्रश्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेच जाहीरपणा उचलावयाला हवा होता. आसाममधील तेथील लोकांनीच उचललेल्या या चळवळीला कोणत्याही स्वरूपात असो, विद्यार्थी परिषदेचे संपूर्ण सहकार्य होते. या चळवळीत विद्यार्थी परिषदेचा अगदी थोडा भाग जरी असला तरी संघ या चळवळीच्या मागे आहे असे म्हणायला सरकारी पुढाऱ्यांना मोकळीक झाली. याहीपेक्षा आणखी एक गोष्ट जाणवते. विद्यार्थी परिषदेची अधिकृत स्थापना होऊन तीन दशके लोटली. या तीन दशकांत एकूण विद्यार्थीजीवन सुधारले की अधिक बिघडले? शाळा, कॉलेजे आणि विद्यापीठांतून होणारे जे प्रकार आज वृत्तपत्रांतून येतात, ते बघून जीवन सुधारले असे मुळीच म्हणता येणार नाही. विद्यार्थी परिषदेने ते बिघडविण्यास मदत केली नाही ही गोष्ट खरी; पण विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्यासाठी संघ शाखा पुरेशा नाहीत असे वाटल्यामुळे की काय, ज्या विद्यार्थी परिषदेची स्थापना झाली, जिद्दीने काम करणाऱ्या संघ कार्यकर्त्यांची उत्कृष्ट परंपरा तिच्या पाठीशी असूनही देशाच्या एकूण विद्यार्थीजीवनावर विद्यार्थी परिषदेची छाप आहे असे म्हणता येण्यासारखी परिस्थिती नाही, असे का?'' (रा. स्व. संघ : काल, आज, उद्या, गंगाधर इंदूरकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८३, पृष्ठ १२०-३)

बरोब्बर ३३ वर्षांपूर्वीचे हे पुस्तक आणि त्यातील विवेचन एका आदरणीय पत्रकाराचे आहे. त्याने उपस्थित केलेला शेवटचा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. महत्त्वाचे म्हणजे वातावरण बिघविडण्याबद्दल इंदूरकरांनी अभाविपला निर्दोष ठरवले होते. आज हीच संघटना दोषी ठरली आहे. इंदूरकरांनी पुढे या प्रश्नांची चिकित्सा केली नाही. परंतु विद्यार्थी परिषदेची छाप एकूण विद्यार्थीजीवनावर अजूनही नाही आणि ती पडणेही शक्य नाही. कारण संघाचे मूलभूत क्रौर्य. रोहित वेमुला याची 'बेशिस्त' केवढी अन् तिला संघाच्या प्रभावाखालच्या प्रशासकांनी दिलेली शिक्षा केवढी, याचा विचार केला तर कठोरपणाच्या नावाखाली संघविचार आपल्या विरोधकांना कसा निपटून काढू पाहतो याचाच प्रत्यय येतो. रोहितने कोणकोणती प्रतारणा केलेली होती? हिंदू धर्म झुगारणाऱ्या आंबेडकरांचा तो स्वत:ला अनुयायी म्हणवून घ्यायचा. राष्ट्रविरोधी हिंसक कारवाई करणाऱ्या मुस्लीम गुन्हेगारीच्या फाशीला त्याने विरोध केलेला होता. आपल्याला गुंड का म्हटलेस असा जाब त्याने अभाविपच्या नेत्यास विचारला. आरक्षणास व त्या विरोधात राज्यघटनेतल्या संभाव्य बदलास त्याने प्रतिकार केला होता. थोडक्यात, रोहित आणि त्याच्यासारखे पाचसहाजण 'नासके आंबे' ठरवून बाजूला टाकले गेले. त्याच्यामुळे अभाविपचे सात्विक, सच्छील, ज्ञानवर्धक, राष्ट्रभक्तीपूर्ण वगैरे कार्य अडखळू लागले होते. म्हणून या रोहितचे सारे शैक्षणिक हक्क संघाकडून हिरावण्यात

आले. त्याचा स्वाभिमान चिरडण्यात आला. एका कठोर प्रतिपक्षापुढे हळवा आणि दुबळा रोहित टिकला नाही. त्याने जीव दिला.

संघ इतका क्रूर अन् निष्ठुर की त्याने रोहित दलित नव्हता, तो एमआयएमचा कार्यकर्ता होता, त्याने जातीचे बनावट प्रमाणपत्र सादर केले होते आणि तो नैराशाने ग्रस्त होता असा प्रचार करवला. उलटे काळीज म्हणतात ते हेच! आपले कार्यकर्ते व नेते जपण्यासाठी संघ कोणत्याही थराला जाऊ शकतो याचा हा निर्भेळ नमुना. कोण कुठला कालचा पोरगा, आमच्या कार्यकर्त्यांना अडचणीत आणतो काय, अशा ईर्षेने संघ परिवार चेतला आणि त्याने क्षमा, दिलगिरी, माफी, पश्चाताप, उपरती अशी कोणतीही भावना दाखवली नाही. उलट तो रोहितच 'व्यवस्थे'विरुद्ध उभा राहिला आणि शैक्षणिक शिस्त मोडून टाकत राहिला असे ठरवत राहिला. संघाच्या मते विद्यार्थी कसा असावा? ''स्वत: जगद्गुरू असूनही सांदीपनींच्या आश्रमात एखाद्या सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे राहणाऱ्या भगवान श्रीकृष्णाचा आदर्श पाहा. श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये एका आदर्श हिंदू विद्यार्थ्याचे चित्र तुम्हाला दिसेल. इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच ते आपल्या गुरूची अत्यंत प्रेमाने व भक्तीने सेवा करीत. यज्ञासाठी वाळलेली लाकडे आणण्यासाठी भर पावसात व वादळात जंगलात जात. वस्तुतः ते स्वत: ज्ञानाची साक्षात मूर्ती होते. त्यांना आणखी शिकायचे ते काय होते?'' (विचारधन, मा. स. गोळवलकर, हिंदुस्थान साहित्य, पुणे, १९७१, पृष्ठ ५३)

या उताऱ्याचा सारांश 'इतर' विद्यार्थी आणि एक राजपुत्र विद्यार्थी यांच्या आचरणात गुरुजींनी सांगितलेला आहे. तो 'ब्ल्यू बॉडीड' (ब्ल्यूब्लडेड तर आहेच) साधासुधा आहे, मग 'इतर' ब्लॅक बॉडीड विद्यार्थ्यांची काय मजाल आपले वेगळेपण मांडायची, असे गुरुजी वर्णवादी सिद्धांतन करतात. त्या आधी गुरुजी सांगतात, ''वडिलांच्या आदेशाप्रमाणे श्रीराम बालवयातच राक्षसांचा निःपात करण्यासाठी विश्वमित्रांबरोबर वनात निघून गेले. पुढे पित्याचे वचन पूर्ण करण्यासाठी त्यांनी चौदा वर्षे आनंदाने वनवास पत्करला.'' (तत्रैव, पृष्ठ ५२)

शिस्त, आज्ञापालन आणि ज्ञानग्रहण करतेवेळी कृष्ण व राम केवढे कठोर झालेले होते याची ही खास संघीय उदाहरणे. गुरू पित्यापेक्षा श्रेष्ठ आणि पित्याची आज्ञा मोडणे पाप हे गुरुजी फार ठाशीवपणे सांगतात. संघ कायम गुरुत्व व पितृत्व यांना अढळपद देत अनुल्लंघनीय मानत आलेला आहे. स्वत:चा लोप या दोन्ही व्यक्तीपुढ्यात करण्यातच मोक्ष आणि पुण्य! म्हणून आत्मविलय अथवा आत्मनाश हिंदू धर्मास मान्य असतो. रोहितने पित्याला अव्हेरले होते आणि गुरूमंडळीस तो जुमानत नव्हता. सबब त्याचाही आत्मनाश अटळ होता असा संघ परिवार विचार करू शकतो. संघ परिवार परंपराभंजकांना क्षमा

'वाटसरू' सातारा येथे

परिवर्तनाचा वाटसरू
द्वारा : **द युनिक ॲकॅडमी**
पहिला मजला, गुरूशिल्प
बिल्डिंग, बॉम्बे रेस्टॉरंट चौक,
सातारा-४११५००३.
दू. ०२१६२-२४४१९३.
भ्र. ८६२५९४६३९४

'वाटसरू' नांदेडमध्ये

**स्टुडंट बुक सेंटर**
गजानन निवास, हनुमान मंदिर रोड,
योगेश्वरी टायपिंग सेंटरच्या समोर,
मे. येवनकर ब्रदर्स भांडी दुकानाच्या
बाजूला, श्रीनगर, नांदेड
दू. ९१६८३२६६१८
९१६८३२६६१९

करीत नसतो. क्षमा देणे व मागणे सबळांना शोभत नाही असे परिवार मानतो.

२०१५ चे शैक्षणिक सत्र सुरू होताना संघ परिवाराच्या इशाऱ्यावरून अभाविपने दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे नामांतर नेताजी सुभाषचंद्र बोस करावे अशी मागणी केलेली होती. संघाचे मुखपत्र 'पांचजन्य'मध्ये 'दरार का गढ' अशी एक मुखपृष्ठकथा प्रसिद्ध झाली होती. तीत जेएनयू कशी राष्ट्रद्रोह्यांची, नक्सलवाद्यांची, जिहादींची भूमी बनली आहे असे म्हटलेले हेते. सुब्रमण्यम स्वामी या विद्यापीठात कुलगुरू म्हणून येणार अशीही एक कंडी पिकवली गेली. विद्यापीठे स्वतंत्र आणि विविध विचारांची आश्रयस्थाने असतात आणि असावीत ही कल्पनाच संघाला सहन होत नाही. जेएनयूचे भारतभरचे आकर्षण हेच आहे. तिथे गांधी, मार्क्स, ट्रॉटस्की, चे गव्हारा, माओ, लोहिया, जेपी, नेहरू यांच्यासमवेत सावरकर, गोळवलकर यांचेही अनुयायी असत आणि ते असणार. गेल्या वर्षी अभाविपचा एक कार्यकर्ता विद्यार्थी संसदेत निवडून गेला होता. परंतु मोदींचे सरकार येताच संघ परिवार असा काही चेकाळला की यत्रतत्रसर्वत्र आपली सत्ता असावी असा त्याचा खटाटोप सुरू झाला आणि त्याने अभाविपला पुढे केले. पण हे अभाविपवाले बौद्धिकदृष्ट्या फार दुबळे आणि कच्चे असतात. पोपटपंचीखेरीज त्यांना वैचारिक वादात सहभागच घेता येत नसतो. देशभक्ती, दहशतवाद, ज्ञान, चारित्र्य, एकता, समरसता वगैरे मोजके मुद्दे त्यांना मांडता येतात अन् त्या पलीकडे मानवाधिकार, लैंगिक हक्क, धर्मनिरपेक्षता, लिंगसमभाव, सामाजिक न्याय, महिला अधिकार, दलित अभ्यास इत्यादी विषय त्यांना रुचतच नाहीत. ते सारे समाजाचे तुकडे करणारे आहेत असे ते मानतात. कशाचीही चिकित्सा न आवडणारे, ठरावीक विचार स्वीकारणारे कार्यकर्ते घडवणे ही विद्यार्थी परिषदेची परंपरा विद्यापीठांमध्ये रुजणे अवघड आहे. म्हणून सतत वादाचे विद्रुपीकरण करून ती चर्चेत राहते.

स्वयंसेवकांना 'टफ' म्हणजे कणखर बनवणे हा संघाचा अत्यंत आवडता प्रयोग आहे. कठोरपणाच्या आड संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक तरुणांचा निव्वळ छळ करीत असतात. शाखेवर शत्रुमित्रासारखा एक खेळ असा घेतला जातो, ज्यात स्वयंसेवकाची शारीरिक सहनशक्ती पणाला लागेल. बुकलून काढणे, अंगावर ओझे म्हणून स्वयंसेवकांना बसवणे व ते झुगारायला लावणे, तलवार-वेत्रचर्म-दांडपट्टा-लाठी-बरछी-भाला-वाघनखे या शस्त्रांचा वापर आणि बचाव शिकवणे, पोहता न येणाऱ्याला बेसावधपणे पाण्यात ढकलणे, दांडगाई करायला लावणे वगैरे नाना प्रकार कठोरपणा व क्रौर्य यांत मोडणारे असतात. अचाट कृत्ये साहस म्हणून करायला लावणे आणि केव्हाही मुसलमान हिंदूंवर आक्रमण करू शकतो असे डोक्यात घुसवलेले असल्याने विचार सदा प्रतिकार-द्वंद्व-लढाई यांचेच करायला लावणे, हाही संघ स्वयंसेवकास कठोर अर्थात निर्दयी बनवण्याचा मार्ग असतो. बोलताना नजर एकटक रोखून बोलायचा सराव करणे, दाढी-कडे-उभट गंध यातून करारी व रागीट मुद्रा आत्मसात करणे, आवाज उंचावून ठासून बोलत राहणे, आवाजात कोणालाही घाबरत नसल्याचा स्वर काढत राहणे, परिस्थिती अशी पैदा करायची की शक्यतो धक्काबुक्की होईल आणि ती पुढे चिघळेल, युक्तिवाद मुद्दाम भलताच करून वाद भरकटेल असे मुद्दे मांडणे, शर्टाच्या बाह्या कोपऱ्याच्या वरपर्यंत दुमडून हात हमेशा 'तयारी'मध्ये असल्यासारखे 'मोकळे' ठेवणे, सभ्य व सुसंस्कृत माणसांशी अत्यंत आदबशीर वागून उद्धटाशी उद्धट व खटाशी खट अशी आपली सज्जता असल्याची बतावणी सदैव करीत राहणे, खोटारडे वा अतिरंजित विधान करण्यास अजिबात न कचरणे, कोणतीही जबाबदारी चुटकीसरशी आणि सहज उचलून पार पाडली जाईल याची 'व्यवस्था' होईल अशी आश्वासक हवा संभाषणातून तयार करणे, गुप्त माहिती फक्त आपल्यापाशीच असून मांजर उंदराला जसे खेळवत राहते तसा अविर्भाव चारचौघांत करीत राहणे, सोबतीच्या कनिष्ठांवर हुकमत आहे याची प्रात्यक्षिके समोरच्यांना सतत बघता येतील अशी कामे त्या छोट्यांकडून करवून घेत राहणे आणि त्यात कसलेही मार्दव, ऋजुता न दाखवणे असे असंख्य विभ्रम स्वयंसेवकात आपल्याला बघायला मिळतात.

विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता असा वाढत जातो. हिंसक आचरणशैली बाळगत तो कार्यविस्तार करू पाहतो. पण त्याला क्रौर्य व शिस्तपालन यांतला फरक कळत नाही आणि रोहित मारला जातो.

**विशेष मुलाखत**

# पुरुषभान निर्माण करणे ही स्त्रीमुक्ती चळवळीची जबाबदारी

मुलाखतकार :
**प्रवीण घोडेस्वार**

**स्त्रीमुक्ती चळवळीकडे कसे वळलात?**

जून १९७५ मध्ये देशात आणीबाणी घोषित झालेली होती. तेव्हापासून शहादा इथल्या श्रमिक संघटनेचे कामही थांबले होते. महागाई प्रतिकार समितीमध्ये काम करणाऱ्या सर्व राजकीय नेत्या कारागृहात होत्या. या वर्षाच्या ऑक्टोबरमध्ये लालनिशाण पक्षाशी निगडित ज्योती म्हापसेकर, शारदा साठे व पुण्यातल्या लीलाताई भोसले आणि गोखले संस्थेतल्या सुलभा ब्रह्मे, कुमुद पोरे अशा काही स्त्रियांनी एकत्र येऊन स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद आयोजित केली. त्याचबरोबर 'युनो'ने घोषित कलेले 'महिला वर्ष' साजरे केले. ही परिषद हा माझ्या जीवनातला एक महत्वाचा मैलाचा दगड ठरला. नेमक्या कोणत्या वाटेने जावे याचा निर्णय घ्यायला मात्र मला १९८८ हे वर्ष उजडावे लागले. मला निर्णय घ्यायला मदत करणारी एक घटना घडली. मला हॉलंड इथल्या 'इन्स्टिट्यूट ऑफ सोशल स्टडीज' या संस्थेची शिष्यवृत्ती मिळाली आणि 'स्त्रिया आणि विकास' या विषयात सोळा महिन्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करून एम. ए. ही पदवी संपादन करून मी परतले. एकटे राहणे, एकटे फिरणे यामुळे आत्मविश्वास आला होता. १९८८ मध्ये मी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत प्रपाठक (सहयोगी प्राध्यापक) म्हणून रुजू झाले आणि मला माझी वाट सापडली, असे म्हणता येईल.

**स्त्रीमुक्ती चळवळ आज कोणत्या टप्प्यावर आहे?**

– स्त्रीमुक्ती चळवळीने समाजातले अनेक प्रश्न ऐरणीवर आणले. अनेक क्षेत्रात बदल घडायला सुरुवात झाली. कायद्याच्या क्षेत्रात लक्षणीय काम झाले आहे आणि होतही आहे. कायदेविषयक जाणीव-जागृती वाढीस लागली आहे. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, संपत्ती हक्क कायदा, कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण प्रतिबंध कायदा यासारखे


ईमेल : gpraveen18feb@gmail.com

कायदे तयार होण्यात चळवळीचा वाटा महत्त्वाचा आणि मोलाचा आहे. बचत गटाच्या माध्यमातून स्त्रिया एकत्र येत आहेत. पारंपरिक सावकारीला बाजूला सारून काम पुढे जात आहे. micro finance हीसुद्धा एक प्रकारची सावकारीच आहे. चळवळीने केवळ स्त्रियांचे प्रश्न मांडले नाहीत तर यात पुरुषांचाही सहभाग घेतला आहे. समाजात पुरुषभान निर्माण करण्याचा प्रयत्न चळवळ सातत्याने करत आहे. शिवाय लिंगभाव संवेदनशीलता (gender sensitization) निर्माण होण्यासाठीही प्रयत्न केले जात आहेत.

**आगामी काळात कोणत्या प्रश्नांना चळवळ प्राधान्य देणार आहे?**

– येत्या काळात जमिनीविषयक मुद्द्यांना अग्रक्रम दिला जाणार आहे. शेतकरी स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया, जमिनी नावावर असलेल्या स्त्रिया, जमिनी नावावर नसलेल्या स्त्रिया अशा शेतीशी निगडित सर्व स्त्रियांच्या प्रश्नांना हात घातला जाणार आहे. एम. एस. स्वामिनाथन यांनी एक अशासकीय विधेयक संसदेत मांडले होते. पण ते पुढे जाऊ शकले नाही. हे विधेयक संमत व्हायला हवे. याबाबत महाराष्ट्रात फारसे काम झालेले नाहीये. इतर राज्यांत मात्र बऱ्यापैकी काम होताना दिसत आहे. विशेषत; गुजरातमध्ये यावर खूप जागरूकता दिसून येत आहे. बायका आपल्या जमीनविषयक हक्कांबाबत भांडत आहेत. लढा देत आहेत. केरळात 'कुटुंबश्री' नावाचा एक सरकारी उपक्रम राबवला जातो. शेतमजूर बायका एकत्र येऊन शेतीची लहानसहान अवजारे, यंत्रे बचत गटाच्या कर्जातून विकत घेतात आणि शेतीची कामे करून देतात. असे अनेक गट केरळात दिसून येतात. यांना 'ग्रीन आर्मी' असे म्हटले जाते. आपल्या राज्यांत जया सागळे, सीमा कुलकर्णी यांच्यासमवेत शेतमजूर आणि शेतकरी स्त्रियांबाबत काम सुरू झाले आहे. कोकणात, विदर्भात, मराठवाड्यात बैठका घेतल्या आहेत. लवकरच इतर ठिकाणीही बैठका आयोजित करण्यात येत आहेत. राज्यात गायरान जमिनींचा प्रश्न महत्त्वाचा आहे. शासन ह्या जमिनी कोणालाही वाटप करत आहे. याविषयी जाणीव–जागृती केली जाणार आहे.

**पर्यावरणीय स्त्रीवाद म्हणजे काय?**

– सिमोन द बोव्हाचे 'सेकंड सेक्स' हे पुस्तक १९६७ च्या सुमारास खूप गाजले. तिचे म्हणणे असे की परंपरेने स्त्रीला निसर्गाच्या जवळची, नैसर्गिक पद्धतीने जगणारी मानले आहे. पुरुष हा संस्कृतीचा जनक मानले आहे. कारण त्याने धोका पत्करून निसर्गावर मात करीत नवनवीन शोध लावले, म्हणूनच स्त्रीने आता हे निसर्गाशी असलेले नाते तोडून स्वतःची ओळख संस्कृतीला जन्म देणारी, नव्याचा शोध घेणारी अशी करून देणे आवश्यक आहे. ह्या सर्वातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ते आधुनिक होणे, औद्योगिकीकरणामध्ये भाग घेणे, तंत्रज्ञान शिकणे, शहरीकरणाचा भाग होणे ही स्त्रीमुक्तीसाठी पहिली पायरी आहे, असे जवळजवळ सर्व विचारसरणी मानत आल्या आहेत. या सर्वांचा पर्यावरणावर कायम परिणाम होतो हे ते विचारवंत जाणतात. स्त्रीची ओळख पर्यावरणाबद्दल अधिक ओळखीने बोलणारी, निसर्गाशी नाते सांगणारी आहे, निसर्गचक्राची जाण असल्यामुळे निसर्गाचा विनाश थांबवायला सज्ज असणारी असे मानायचे कारण नाही. जीवावर बेतले की सारेच सर्व शक्तीनिशी विकास कामाला विरोध करतात. तशाच स्त्रियासुद्धा करणारच असे त्यांचे म्हणणे असते.

पर्यावरणीय स्त्रीवाद सिद्धान्तांनी मुख्यत: स्त्री आणि निसर्ग हे अविभाज्य नाते पुरुषी दृष्टिकोनातून कसे निर्माण केले याचा शोध घेतला आहे. निसर्ग ही एक निर्मम, जड वस्तू आहे आणि स्त्रीच्याही सर्व क्रिया ह्या आपोआप घडणाऱ्या, नैसर्गिक आहेत असे गृहीत धरले गेले होते. स्त्रीचे अभिकर्तेपण नाकारले गेले होते. पर्यावरणीय स्त्रीवादाने याचा ऐतिहासिक शोध घेण्याची गरज अधोरेखित केली. एका अर्थाने तो पुरुषसत्ताक विचारसरणीचाच कसा डावपेच होता किंवा वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपोआप स्त्रीच्या क्षमतांना मागे ढकलले गेले आणि स्त्रीच्या कर्तृत्वाला अदृश्यता प्राप्त झाली असे त्याचे विश्लेषण केले आहे. पर्यावरणीय स्त्रीवाद हा सैद्धांतिकदृष्ट्या महत्त्वाचा असून पर्यायी विकासप्रणालीचा तो महत्वाचा पाया होऊ शकतो.

**पर्यावरणीय स्त्रीवादावर केल्या जाणाऱ्या आरोपाविषयी काय सांगाल?**

– या विचारधारेने पहिल्यांदा निसर्ग आणि स्त्री ही दोन अस्तित्वे एकमेकात मिसळून टाकणाऱ्या आणि दोघांनाही स्वत:चे कर्तेपण नाही असे आरोपण करणाऱ्या

विचारधारेला आव्हान दिले आहे. पुरुषही निसर्गाचा तितकाच भाग आहे जेवढी स्त्री आहे. शेवटी निसर्गाचे शास्त्र म्हणजेच पर्यावरणशास्त्र. कोणत्याही अस्तित्वाचे (मानव स्त्री-पुरुष) त्याच्या भोवतालच्या वातावरण व्यवस्थेशी असलेले परस्परसंवादी नाते, ज्यात होणाऱ्या परिणामांबद्दल एकमेकांना सतत संपर्कात ठेवले जाते व संतुलन साधण्याचा प्रयत्न होतो. या व्यवस्थेत एकाला सर्वश्रेष्ठ स्थान नसते असे पर्यावरणीय स्त्रीवादी म्हणतात. ही व्यवस्था विसरल्यामुळेच आजची धोरणे ही पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत होत आहेत. जीवशास्त्रीय सत्य किंवा स्त्रीत्वाचा गाभा म्हणून निसर्ग व स्त्रीचे नाते अतूट आहे असे मानता आणि स्त्रीला जुन्या व्यवस्थेत कैद करू पाहता, असा आरोप केला जातो. यावर असे उत्तर देता येईल की, आज स्त्रिया बहुसंख्येने बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमध्ये, निदान तिसऱ्या जगात तरी, सामील झालेल्या नाहीत. त्यांची उपजीविका निसर्गावर अवलंबून असते. ऱ्हासाचा परिणाम त्यांना जास्त प्रमाणात भोगावा लागतो. म्हणून त्या पर्यायी विकासाची मागणी करायला तयार होतात. त्यांचा गाभा पर्यावरणवादी असतो असे कधीही मानले गेले नाही.

**स्त्रीमुक्ती चळवळीची आजची मागणी काय आहे?**

- सध्या जी समाजरचना आहे त्यात समानतेची मागणी करण्याची गरज नाही. तर पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करायला हवी. अशी पर्यायी समाजव्यवस्था निर्माण करता येणे शक्य आहे यावर आमचा ठाम विश्वास आहे.

**'दलित स्त्रीवाद' याविषयी काय सांगाल?**

- अस्मितेचे राजकारण या अंगाने याकडे पाहायला नको. अशा दृष्टीने दलित स्त्रीवादाकडे पाहणे मला चुकीचे वाटते. शर्मिला रेगे आदींनी ही मांडणी पुढे आणली. त्यांच्या मते दलित स्त्री ही समाजरचनेच्या तळाशी आहे. आपली पुरुषप्रधान समाजरचना. मुळात दलित पुरुष हा जातीय व्यवस्थेचा बळी आहे. एकूणच आपल्या पुरुषप्रधान रचनेत स्त्रिया ह्या दुय्यम स्थानावर आहेत. स्त्री आणि त्यातही ती दलित. म्हणजे तिच्या शोषणाला दुहेरी पदर आहे. एक म्हणजे ती स्त्री आहे म्हणून आणि दुसरे म्हणजे तिचे दलित असणे. त्यामुळे तिच्या भूमिकेतून याकडे बघायला हवे, अशी काहीशी मांडणी दलित स्त्रीवादाची केली जाते. पण मला ही मांडणी पुरेशी वाटत नाही. याचे कारण म्हणजे यात आदिवासी स्त्री समाविष्ट नाही. आदिवासी स्त्रीचेही काही प्रश्न आहेत. त्यांचे काय ? आदिवासी स्त्रीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून आपल्याला पुढे नाही जाता येणार.

- **स्त्रीमुक्ती चळवळीतल्या उणिवा किंवा खटकणाऱ्या बाबींविषयी काय सांगाल?**

–'माय चॉईस' यासारख्या उपक्रमांना माझा पाठिंबा नाहीये. यास अतिरेकी व्यक्तिवाद म्हणता येईल. अलीकडे अतिरेकी स्त्रीवाद उदयास येत आहे. त्यातलाच हा प्रकार आहे. यात समूहभान नाहीये. समूहभान ठेवूनच काही एक करायला हवे. समूहभान न ठेवता जगण्याच्या मी विरोधात आहे. अशाने आपण अनेकांना दुखावत असतो. दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. पण असे न होता ही मंडळी इतरांना दुखावतात. परिणामी दृष्टिकोन बदलाची प्रक्रिया मागे पडते.

●

## वर्गणीसाठी

आपली वर्गणी वाटसरू कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवताना नाव, पत्ता, फोन नंबर व ई-मेल इत्यादी तपशील कळवावेत. वर्गणीची रक्कम रोख/मनिऑर्डर/चेक/डीडी/ऑनलाईन यांपैकी कोणत्याही मार्गाने पाठवू शकता. चेक अथवा ड्राफ्ट **'परिवर्तनाचा वाटसरू'** या नावाने असावा. वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी आमच्या www.pvatsaru.com या संकेतस्थळाला भेट द्या.

- १ वर्षासाठी वर्गणी : ₹ ३५०
- ३ वर्षांसाठी वर्गणी : ₹ ९००
- १० वर्षांसाठी वर्गणी : ₹ २५००
- सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक वर्गणी : ₹ २५०
- सॉफ्ट + छापील अंकाची वार्षिक वर्गणी : ₹ ४५०

**● कार्यालयाचा पत्ता ●**

व्यवस्थापक, परिवर्तनाचा वाटसरू,
द्वारा : द युनिक ॲकॅडमी, चौथा मजला, गुरुकृपा कॉम्प्लेक्स,
११७९/४, शिवाजीनगर, पुणे ४११००५.

# दलित स्त्रीकविता : समकालीन संदर्भ

छाया
कोरेगावकर

मानवाच्या उर्जितावस्थेत स्त्रियांनी प्रथम शेतीचा शोध लावला आणि मानवी जीवनात क्रांती घडवून आणली. अर्थात तेव्हापासून स्त्रीचं निसर्गाशी आणि पर्यायाने सृजनशीलतेशी नातं निर्माण झालं. स्त्री म्हणून तिच्याजवळ असलेल्या शरीर सृजनतेबरोबर तिच्या भावनिक आणि बौद्धिक सृजनाने मूर्त स्वरूप धारण केलं त्यातूनच गीत, संगीत, नृत्य अशा कलांचा उदय झाला. निसर्गाच्या सान्निध्यात तिची तरल भाववृत्ती अधिकाधिक बहरून आली आणि म्हणूनच गीत-गायन कला-साहित्याचा उगम स्त्री प्रतिभेतून झाला असं आपण म्हणू शकतो. अर्थातच ज्या काळात शब्दलिपीचा शोध लागला नव्हता अशा काळातील साहित्य हे मौखिक स्वरूपाचं होतं. त्यामुळे अशा साहित्याचा इतिहास उपलब्ध नाही. परंतु जेव्हा शब्दलिपी अस्तित्वात आली त्या काळापासून म्हणजे वेदकालीन साहित्यातील मैत्रीयी, गार्गी या प्रतिभावंत स्त्रियांपासून साहित्य क्षेत्रांत स्त्रियांचा सहभाग आढळून येतो. पुढे गौतम बुद्धाने स्त्रियांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार प्राप्त करून दिल्यानंतर थेरी गाथांमधून बुद्ध भिक्कुणींनी बौद्धकालीन साहित्यात आपल्या प्रतिभेची साक्ष दिली आहे. तसेच मध्ययुगीन काळात महानुभव पंथातील महदंबा, बायसा आदी स्त्रियांच्या साहित्याचा इतिहास उपलब्ध होऊ शकतो. संत साहित्याच्या परंपरेत एकनाथ, तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव यांच्या भक्तीपारायण साहित्याच्या प्रवाहात चोख्याची महारी, जनाबाई, मुक्ताई या स्त्रियांनी आपल्या अभंग-ओव्यांनी भर टाकलेली आहे.

ब्रिटिश काळात सावित्रीबाईंनी क्रांतिकारक पाऊल उचलून स्त्रियांना शिक्षणाचं महाद्वार खुलं करून दिलं. या काळात ब्राह्मण समाजातल्या आणि अस्पृश्य समाजातल्या स्त्रिया बोलू लागल्या. रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक अशा ब्राह्मण स्त्रियांबरोबर तानूबाई बिरजे, मुक्ता साळवे,

ईमेल : chhayakoregaonkar@gmail.com

ताराबाई शिंदे अशा ब्राह्मणेत्तर समाजातल्या स्त्रियांनी साहित्य साहित्य क्षेत्रात मोलाचं योगदान दिलं आहे.

प्रचलित अर्थाने दलित स्त्री-कवितेच्या उगमाकडे जायचे असेल तर १९ व्या शतकातल्या सावित्रीबाई फुले यांना ओलांडून पुढे जाता येत नाही. रूढार्थाने सावित्रीबाई दलित नव्हत्या. पण त्यांनी जी स्त्रीवादी कविता लिहिली त्यात समग्र शोषित वर्गाला त्यांनी सामावून घेतलं आहे. दलितत्वाचा अधिकाधिक बोजा जिच्यावर पडला आहे त्या स्त्रीच्या वतीने जेव्हा त्या कविता लिहितात तेव्हा त्या स्वत: दलित स्त्रीच्या आत्मानुभूतीत उतरतात. जणू त्या स्वत:च दलित होऊन जातात. म्हणूनच तिच्या शोषणाला, तिच्या दुय्यमतेला शब्द देताना त्या म्हणतात,

*बाईल काम करत राही*
*ऐतोबा हा खात राही*
*पशुपक्षात ऐसे नाही*
*तयास मानव म्हणावे का?*

म्हणजेच स्त्रीचं शोषण अधोरेखित करताना तिला मानवीय मूल्यांपर्यंत नेऊन ठेवण्याचा त्या प्रयत्न करतात. तिचं मानव्य पशूपक्षांपेक्षाही हीन असल्याचे वरील कवितेत दिसून येते. ही कविता जितकी उपरोधिक तिकीच मार्मिकही आहे. त्या स्वत: दलित नसल्या तरी सहसंवेदनेतून त्यांनी दलित स्त्रीकवितेला दिलेला हा प्रखर आत्मस्वर नाकारता येत नाही; म्हणूनच त्या दलित स्त्री-कवितेच्या आद्य प्रणेत्या आहेत असं ठामपणे म्हणता येतं. या अर्थाने त्या दलित स्त्री-कवितेच्या आद्यकवयित्री ठरतात.

स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९६० च्या दशकात मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले. ललित साहित्याबरोबरच वास्तव समाजचित्रण करणाऱ्या एका नव्या साहित्यप्रवाहाची जोरदार लाट उसळून आली. हे साहित्य प्रामुख्याने अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या दलित समाजाकडून निर्माण झालेले आढळले. या साहित्यात विशिष्ट अशा जातसमूहाचे चित्रण आढळून येते. स्वातत्र्यपूर्व काळापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुकारलेल्या मानवी हक्कांच्या लढ्यातून स्वभानाची प्रखर जाणीव झालेला दलित समाज निर्भीडपणे आणि जोरकसपणे लिहू लागला. ज्यातून शंकरराव खरात, दया पवार, लक्ष्मण माने, प्र. ई. सोनकांबळे असे साहित्यिक उदयाला आले. याच सुमारास शांताबाई कांबळे, कुमुद पावडे, मुक्ता सर्वगोड, शांता दाणी, बेबी कांबळे, उर्मिला पवार यांनीही आत्मकथनाच्या माध्यमातून सामाजिक व्यवस्थेचे, त्यातील शोषणाचे, अंधश्रद्धेचं व त्यातून स्त्रीवर लादल्या गेलेल्या गुलामगिरीचे भीषण वास्तव समाजापुढे मांडले.

या सर्व गद्यलेखनाच्या प्रातांत कविता, शाहिरी पोवाडे, जलसे या माध्यमातून पद्यलेखनानेही आपला वेगळा ठसा उमटविलेला दिसतो. वामनदादा कर्डक, अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख अशा प्रतिभावंत कवींबरोबर सुगंधा शेंडे, हिराताई बनसोडे, सुरेखा भगत, ज्योती लांजेवार, उषा आत्राम या स्त्रियांनी आपल्या काव्यलेखनास प्रारंभ केला. परंतु ज्या प्रमाणात स्त्रियांच्या गद्यलेखनाची दखल घेतली गेली, त्या प्रमाणात त्यांच्या काव्याची दखल घेतली गेली नाही. थोड्याफार प्रमाणात दलित स्त्रीची कविता दुर्लक्षितच राहिली. दलित साहित्य हे एका सामूहिक वेदनेच्या आविष्कारातून निर्माण निर्माण झालेलं साहित्य आहे. कविता हा वेदनेचा स्वाभाविक आणि उत्कट असा हुंकार आहे. त्यामुळे दलित साहित्याच्या उगमस्थानी दलित कवितेला एक अटळ असं वेगळं स्थान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या पहिल्या पिढीच्या स्त्रिया लिहित्या झाल्या, त्यात सुगंधा शेंडे, हिराताई बनसोडे, कुमुद पावडे, ज्योती लांजेवार, उषा आत्राम या कवयित्रींनी मोलाचं योगदान दिलं आहे. सुरुवातीच्या काळात थोड्याफार फरकाने सर्वच कवयित्रींची कविता स्त्रीसुलभ प्रेमभावनेभोवती घुटमळताना दिसते. परंतु दलित साहित्याची मूलभूत प्रेरणा ही मानवमुक्तीची आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या दलित समाजाच्या अस्तित्वाच्या लढाईची आहे. त्याला नाकारलेल्या मानवी मूल्यांच्या प्राप्तीची ही प्रेरणा आहे. म्हणूनच दलित कवयित्रींच्या लेखनातूनही हाच आशय तीव्र स्वरात उमटतो. दलित स्त्री जातीचा भोगवटा कुमुद पावडे अतिशय भेदक शब्दांत मांडतात.

*तुला दिसेल त्यांचा एकेक अवयव*
*उद्ध्वस्त हिरोशिमापेक्षा कमी नाही*
*दारिद्र्य गोवलेल्या त्यांच्या हिरव्यातर नसा*
*कुत्र्याची हाडहाड भोगणारं जातीचं हीनपण*
*जन्मताच मृत्यूचं दु:ख सोसणारं असोशी स्त्रीपण*

*सारं कवेत घेऊन एकेक झोपडी आक्रोश*
*दाबताना कष्टत आहे.*
*पिढ्यान् पिढ्या सखी हे असंच चालू आहे.*

इथल्या विषम आणि जातीनिहाय समाजव्यवस्थेमुळे एकूणच दलित समाजाला हिणकस पातळीवर ठेवलं. धर्म रूढीच्या नावाखाली मानवी हक्क नाकारलेल्या समाजाचा बुरखा फाडताना हिरा बनसोडे यांची कविता अधिक टोकदार होते.

*या संस्कृतीचे सजग पहारेकरी*
*पाण्याला कैद करून तळे राखतात*
*तुझ्या स्पर्शाने होईल विषबाधा म्हणून मनात*
*धास्तावतात*
*तान्हेने व्याकुळलेल्या तुला ह्यांनी तुझाच रक्तभिषेक केला*
*नि आज तुझ्या दगडी पुतळ्याच्या मुखात ते पाणी*
*ओतताहेत*

दलित कवयित्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने आत्मनिर्भर झाली आहे. ती डोळसपणे समाजाचा वेध घेऊ लागली आहे. त्यामुळेच स्त्रीसुलभ सोहळ्याला ती वेगळे परिमाण देते. तिचं गर्भारपण एका अनोख्या प्रतिमा विश्वातून साकारते.

*असे डोहाळे जगावेगळे*
*काय हवंसं झालंय या जिवांकुराला?*
*डोहाळे कडक होत चालले आहेत*
*तिच्या सभोवार प्रश्न वलयांकित होत चालले*
*एकदमच तिला महाडच्या पेटत्या पाण्याची*
*अनिवार तहान लागली*
*पुणे कराराने तळमळून उठली*
*तिच्या मनात झटकन वीज लकाकली*
*ती हरकून गेली, धुंदावून गेली*
*सूर्यनक्षी रूजत होती डोहाळे तेजात भिजत होते.*

हिराताई असं आपलं गर्भारपण व्यक्त करताना कवितेला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवतात.

भारतीय व्यवस्थेने स्त्रीला सामाजिक चौकटीबाहेर ठेऊन तिच्या दास्यत्वासाठी अनेक रुढी-परंपरा लादून तिला अंकित करून ठेवलं. याच रूढी आणि सांस्कृतिक आधिपत्याचा निषेध करताना नागपूरच्या सुरेखा भगत म्हणतात-

*काचेची वस्तू म्हणून की काय*
*काच घरातल्या मॉडेलसारखं राहणं आलं*
*पण आपण काच नाही हे तिला कळून चुकलं*
*काचेच्या बाहेर पडायला लागल्यापासून*

उषाकिरण आत्रामांच्या कविता या स्त्रीशोषणाच्या मुळावर घाव घालताना एक आशावाद देऊन जाते. त्या आपल्या कवितेत म्हणतात-

*आपलं नशीबच तस्सं*
*लोणी काढाचं न ताक विकत घ्यावं*
*हातातली पाटी पेन्सिल*
*घेतलेली पोरगी म्हणाली*
*माये! पण आपण लोणी कायले द्याचं*
*त् ताक इकत कायले घ्याचं*
*आवं माये! नशीब नशीब म्हणू नको*
*नशीब त आपल्याच हाती आहे!*
*आपला दिवा आपणच होवाचं*
*आपल्या नशिबाच धुणं आपणच धुवाचं*
*माय! मी सावित्रीसारखं शिकीन*
*बाबासाहेबासारखं पुस्तक वाचीन*
*समद्या रानाच्या कोनाकोनात दरीखोरीत*
*झोपडीखेपडीत उजेड पाडीन*

अशी बाबासाहेबांच्या प्रेरणेतून आकाराला आलेली उषाकिरण यांची कविता उजेडाचं स्वप्न दाखविते.

१९८०च्या दशकातली महत्त्वाची कवयित्री म्हणून मल्लिकाचा उल्लेख अटळ आहे. स्त्रीत्वाचं नेमकं भान असलेली मल्लिका अमर शेख यांना तिच्या मूक सहनशीलतेत विश्वविध्वंसनाचा अणूकण गवसतो. एकंदरीत बाईचा आवाज आजच्या मितीला दडपता येण्यासारखा नाही.

*'मी एक स्त्री'*
*ग्रीकमधली की अमेरिकेतील*
*काय फरक पडतो यानं?*
*कुरूप की सुंदर*
*काहीच बिघडत नाही*
*गर्भाशय असणारच कायम*
*न स्त्रीत्वाबरोबर चिकटून असलेलं दुःख*
*एकटेपणाचं विव्हळणारं जखमी श्वापद*
*जगभरातल्या बायका या श्वापदावर*
*स्वार होऊन हिंडतात*

*त्या बंदिस्त असतात*
*अदृश्य पिरॅमिडमध्ये*
*बायका असतात एक अणूचा कण*
*विश्वाच्या महास्फोटातला एक क्षण*

याच दशकातली संध्या रंगारी यांची कविता लक्षवेधी ठरते. व्यवस्थेने लादलेल्या दु:खाची चिरफाड करताना ती एक स्वतंत्र वाट चोखाळते. तिचा आपल्या स्त्रीत्वावर ठाम विश्वास आहे आणि म्हणूनच आपल्या बाईपणावर प्रेमही. संध्या रंगारी म्हणतात–

*मला विद्रोही व्हायचं आहे*
*मला बंड करायचं आहे*
*मला माझं बळ वाढवायचंय*
*मला स्वतंत्र व्हायचंय*
*अन् स्वायत्तही*
*हे सगळं खरं आहे*
*पण मला पुरुष व्हायचं नाही*

नव्वदनंतर दलित स्त्री–कवितेचा चेहरा बदलला. पूर्वसूरीच्या कवितेतली काहीशी घोषणाबाजी, जातव्यवस्थेतून आलेल्या शोषणाच्या वेदनेपलीकडे जाणारी ही कविता आहे. जवळपास या सर्वच कवयित्री सामाजिक चळवळीशी नाळ जोडून आहेत. डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असणाऱ्या भारताचं स्वप्न धूसर होत चालले आहे. त्याबद्दल त्या सर्वचजणी अस्वस्थ आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वानंतर विघटित झालेली दलित चळवळ, निळ्या क्रांतीच्या स्वप्नाळू निळाईत रंगलेले भोंदू आणि गद्दार नेते यांचा परखड शब्दात समाचार घेताना प्रतिभा अहिरे म्हणतात–

*आपल्या आभाळाची सारी निळाई*
*दिवसेंदिवस कुठं हातात हात*
*तर कुठे भगव्यात शिरतीय*
*आपल्या परिवर्तनाची लढाई जन्मण्यापूर्वी*
*गर्भातच मरतीय*
*क्रांती अन् संघर्ष नुकतेच हात चोळताहेत*
*समरसतेच्या नावाखाली वाटेल तिथे लोळताहेत*

व्यक्तिगत दु:खाबरोबरच पुढच्या काळातली कविता ही अधिकाधिक प्रगल्भ होताना दिसते. शिक्षणामुळे तिचे राजकीय भान जागे झालेले आहे, म्हणूनच छाया कोरेगावकर म्हणतात–

*बाबासाहेब,*
*किती काळ उभे आहात चौकाचौकात*
*हात उंचावून दिशा दाखवत. जथ्था तर भलत्याच दिशेला निघून गेला*


Symbiosis School for Liberal Arts
Parivartanacha Waatsaru
&
The Unique Institute of Higher Learning
Present

***"Between the Lines:Interpreting India"***

a Public talk by
**A Raghuramaraju** ( Professor, Department of Philosophy, University of Hyderabad )

**Title:** Interrogating the Gandhi-Tagore Debate

**Chair:** Arvind Ganachari (Retd. Professor, Department of History, University of Mumbai)
**Venue:** Vishwabhawan Auditorium, Symbiosis Campus, S B Road, Pune.
**Date:** 27th February, 2016.
**Time:** 5 pm to 7 pm.

All are cordially invited.

*पँथरचे बछडे युतीच्या भजनात मग्न झालेत*
*आपल्याच बडव्यांनी तुमचं देऊळ बांधायचा घाट घातल्यापासून*
*मी गस्त घालत उभी आहे तुमच्या स्मारकापुढे*

नव्या पिढीच्या कवितेच्या प्रवासात प्रज्ञा दया पवार यांची कविता मैलांचा दगड ठरलेली आहे. त्यांच्या कवितेतला स्त्रीवाद अतिशय प्रखर आणि स्पष्ट आहे. एकीकडे त्यांची कविता स्त्रीकेंद्री तर आहेच पण त्या पलीकडेही माणूस म्हणून तिचा वेगवेगळ्या पातळ्यांवर विचार करणारी आहे. एकीकडे पुरुषसत्ताक व्यवस्थेने तिचं चिरडलेलं माणूसपण आणि त्याचवेळी तिच्या बाईपणाचा शरीरभोग घेण्यापासून ते धार्मिक-जातीय संघर्षात सूड म्हणून केलेला तिच्या शरीराचा वापर करणाऱ्या समाजव्यवस्थेला जाब विचारताना त्यांची कविता आत्मतेजाचं भान लखलखीत शब्दात उतरवते.

*मलाही व्हायचं आहे प्रकृती*
*मलाही व्हायचं आहे सुजाता*
*पटाचारा उत्पलवर्णा संघमित्रा*
*मलाही लिहायची आहे थेरगाथा*
*दोन हजार सहा*

प्रज्ञा पवारांची कविता ही समग्र बाईजातीचा आलेख मांडतं. मग ती वेश्या असो वा मातृत्वाच्या गोंडस मिथकात स्वत:चा चेहरा हरवलेली संसारी बाई असो, तिची गळचेपी, शोषण एक विषादाचा सूर घेऊन त्यांच्या कवितेत उतरताना दिसते. सिद्धार्थाच्या यशोधरेपासून बाबासाहेबांच्या रमाईपर्यंत जिचं हौतात्म्य दुर्लक्षितच राहिलं अशा स्त्रियांच्या वतीने बोलताना स्त्री सामर्थ्याच्या प्रखर तेजाने त्यांची कविता झळाळून जाते?

*कवयित्रीला कधीच मोह होत नाही*
*सिद्धार्थ होण्याचा*
*कवयित्रीला मोह होतो यशोधरेचा*
*सिद्धार्थाच्या रित्या कटोऱ्यातील अपरंपार क्षुधा*
*काठोकाठ शमविणाऱ्या*
*यशोधरेच्या हातांचा*
*सिद्धार्थाला बुद्धत्व बहाल करणाऱ्या*
*यशोधरेच्या लसलसत्या विराट तृष्णेचा.*

नव्या पिढीतली कवयित्री उच्चशिक्षित आहे. सृजाण आहे. स्वतंत्र दृष्टीने ती सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा वेध घेत आहे. पारंपरिक सांस्कृतिक मूल्य आणि प्रतीकं याला नकार देताना ज्योती लांजेवार म्हणतात :

*श्रीकृष्णा,*
*द्रौपदीला वस्त्र पुरवण्याऐवजी*
*कौरवाचे हात का छाटून टाकले नाहीस!*

बदलत्या पर्यावरणाने आणि वैज्ञानिक क्रांतीने इथल्या बाईच्या जन्माला येण्याच्या वाटा रोखून धरलेल्या असताना आपल्या निसर्गदत्त हक्कासाठी विद्रोह करणाऱ्या छाया कोरेगांवकर यांची कविता अतिशय स्फोटक रूप धारण करते.

*झाडं कुंपणाच्या आत लावली*
*म्हणून देता येणार नाही*
*कळीच्या सुरक्षिततेची हमी*
*इथं रोजच नखलल्या जातात कळ्या*
*बाईच्या गर्भात अंकुरण्यापूर्वीच*
*तेव्हा,*
*सावित्रीच्या लेकींनी, वेळीच शहाणं व्हायला हवं*
*धुळाक्षरं गिरवण्यापूर्वीच हाताळायला हवीत शस्त्रं*
*बाईच्या निरंतर अस्तित्वासाठी*

एकूणच नव्या पिढीच्या कवयित्रींनी स्त्री-कविता सशक्त केली आहे. समग्राशी डोळा भिडविण्याची तिची धीटाई लक्षवेधी आहे. वरील कवयित्रीसकट उषा अंभोरे, शारदा नवले, कविता मोरवणकर ह्या सर्वचजणी आपल्या कवितेतून पारंपरिक मूल्यांना छेद देताना दिसत आहेत. आपली अशी एक नवी आणि स्वतंत्र पायवाट निर्माण करत आहे. ही कविता केवळ दु:खापाशी किंवा वेदनेपाशी थांबली नाही. स्त्री म्हणून तिला प्राप्त झालेल्या वैचारिक, बांधिक आणि भौतिक सामर्थ्याच्या बळावर ती स्वत:च अवकाश निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. ज्या अवकाशात तिच्या कर्तृत्वाला, तिच्या माणूस म्हणून जगण्याला एक हक्काचं अधिष्ठान आहे. सर्वच कवयित्रींच्या कवितेतून मानवी मूल्यांचा आग्रह दिसतो. या कवितेचा प्रवास आत्मभानाकडून आत्मतेजाकडे आणि पुढे संघर्षाच्या मैदानात उतरताना दिसतो. एकूणच समकालीन स्त्री-कविता ही आशावादी आहे.

●

# भाषासंशोधन : जाणीव आणि दिशा



विलास बुवा

वाङ्मयीन संशोधनाला जास्त महत्त्व आणि भाषा संशोधनाला कमी महत्त्व दिले जाते अशी आज आपल्या संशोधनाची स्थिती आहे, ही स्थिती भाषा संशोधनाला नक्कीच मारक आहे. जागतिकीकरणाच्या युगात भाषा संशोधनाला कशी चालना मिळेल आणि भाषा संशोधनाच्या मर्यादा आणखी कशा कमी करता येतील यावर भर देणे आवश्यक आहे.

भाषा कोणतीही असली तरी भाषाभ्यासासाठी मूलभूत संशोधनपद्धती आवश्यक असते, ज्यांचा विकास वेगवेगळ्या टप्प्यांवर होत असतो विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्विस भाषाशास्त्रज्ञ फर्निनांड दी सस्यूर (१८५७-१९१३) यांनी जीनिव्हा विद्यापीठात १९०६ ते १९११ दरम्यान भाषेविषयी काही व्याख्याने दिली. त्या व्याख्यानांमध्ये काही निरीक्षणे त्यांनी नोंदविली. ती सर्व निरीक्षणे त्यांच्या विद्यार्थ्यांनी टिपण स्वरूपात जमा करून संपादित केली व भाषेचे मूलगामी विचार देणारे हे पुस्तक अस्तित्वात आले. त्याचे नाव होते *Cours de linguistique genrale* (१९१६.) नंतर हेच पुस्तक इंग्रजीत 'अ जनरल कोर्स इन लिंग्विस्टिक्स' या नावाने भाषांतरित झाले आणि भाषा संशोधनाची मूलभूत अंगे काय असू शकतात याचा निर्देश करणारी ठरली. सस्यूरने 'चिन्ह' हे 'चिन्हक' आणि 'चिन्हित' असे दोन घटक मिळून तयार झालेले असते आणि त्यामध्ये कोणत्याही स्वरूपाचे नैसर्गिक अथवा अनुवंशिक अथवा नैसर्गिक संबंध नसतो असे प्रतिपादन केले चिन्हव्यवस्था उभ्या आणि आडव्या धाग्यांनी बांधलेली असते मात्र याचबरोबर भाषा ही एक चिन्हव्यवस्थेचा एक भाग आहे असे प्रतिपादन केले. मानवी संप्रेषण हे भाषिक आणि अभाषिक अशा चिन्हांनी तयार होत असते (उदाहरणार्थ 'झाड' हे भाषिक अथवा शब्दाचा उच्चार आणि 'झाड' ही वस्तू) भाषिक यंत्रणेला तो लांग *(langue)* अशी संज्ञा वापरतो तर प्रत्यक्ष वापराला परोल *(parole)* असे म्हणतो तर एककालिक व सार्वकालिक *(Diachronic and Synchronic)* अभ्यास भाषेचा करता येतो असे प्रतिपादन


ईमेल : vilas.buwa@gmail.com

करतो. अमेरिकन तर्कशास्त्रज्ञ आणि गणिती चार्ल्स सॅण्डर्स पर्स (१८३९-१९१४) यांनी चिन्हमीमांसेविषयी विवेचन केले आहे व चिन्हाचे त्रिस्तरीय स्वरूप मांडले. विसाव्या शतकात उन्नत झालेला आणि विकास पावलेला संरचनावाद हा भाषेबरोबरच जीवनाच्या इतर क्षेत्रांनाही व्यापून राहिला होता जसे लेव्ही स्ट्रॉस यांनी मानववंशशास्त्रीय संरचनावादी विवेचन *Structural Anthropology* (१९५८) या पुस्तकात केले आहे. संरचनावादाने पारंपरिक भाषाविषयक दृष्टिकोन बदलण्यास मदत केली आणि भाषा ही एक वैज्ञानिक बाब असून वैज्ञानिक दृष्टिकोनातून तटस्थपणे भाषेचा अभ्यास होऊ शकतो ही बाब पुढे आली. १९३० च्या दशकात लिओनार्ड ब्लूमफिल्ड यांनी भाषेवर मूलभूत *'Language'* नावाचे पुस्तक लिहिले. रोलां बार्थ्स या फ्रेंच भाषाशास्त्रज्ञाने संरचनावादाच्या मर्यादा प्रथमत: लक्षात आणून दिल्या आणि भाषेचे अस्तित्व, त्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचे सर्वसामान्य अर्थ, मथितार्थ आणि सहअर्थ असतात आणि संदर्भानुसार बदलत असतात असे फरक लक्षात आणून दिले. भाषा हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे सामाजिक संस्थांचे संप्रेषण हे भाषेच्या माध्यमातूनच कार्यरत असू शकते. रशियन रुपवादी भाषाशास्त्रज्ञ, फर्निनांड द सस्यूर, चार्ल्स सॅण्डर्स पअर्स, रोलां बार्थ्स, झॅक देरिदा, मिखाईल बाख्तीन, नोअ्म चॉम्स्की, यॉकोब्सन, चार्ल्स मॉरिस, उंबरटो इको, झॅक लकाँ, बोदिलियर, विलियम लेबाव्ह, डेल हाईम्स इत्यादी अभ्यासकांनी विविध स्वरूपात भाषेचे संशोधन होऊ शकते याबद्दल दिशा दिलेली आहे.

भाषाभ्यास आणि वाङ्मयीन समीक्षा या दोन्ही समांतर बाबी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दिसतात. या समांतरतेमुळे भाषासिद्धान्त आणि वाङ्मयीन सिद्धांत यामध्ये समायोजनाचा अभाव होता मात्र अशा मर्यादांवर उत्तर संरचनावादी विचारांनी पूल बांधलेला दिसतो. यामध्ये रोलां बार्थ्सने महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. १९६० च्या दशकात भाषा आणि साहित्यसिद्धान्त यामध्ये विविध राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन प्रभाव दिसतात. बार्थ्सने *The Death of the Author* (१९६८) नावाचा निबंध लिहिला आणि त्यामध्ये वाचकांचे स्थान आणि महत्त्व अधोरेखित केले व संहितेवरची लेखकाची मक्तेदारी अथवा अधिकार असत नाही हे निक्षून सांगितले व वाचक हा सहनिर्माता असतो अशी भूमिका प्रतिपादित केली. झॅक डेरिडाने *'Structure, Sign and Play in the Discourse of the Human Science'* (१९६६) हा निबंध हॉपकिन्स विद्यापीठ येथे मांडला व भाषा आणि साहित्य अन्वेषण पद्धतीत महत्त्वाची भर टाकली. विविध वैचारिक प्रवाह जसे स्त्रीवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय दृष्टिकोन इत्यादींचा प्रभाव भाषेबरोबरच साहित्यावरही आपल्याला दिसतो. वाङ्मयीन समीक्षा ही प्रामुख्याने लेखककेंद्री, संहिताकेंद्री, संदर्भकेंद्री व वाचककेंद्री अशी विभागता येते साहित्याचा आशय भाषा वाहून नेत असते जी सर्वसामान्य भाषा नसून अलंकारिकतेने सुशोभित केलेली असते जरी असे असले तरी यातून विशिष्ट विचारप्रणाली व्यक्त होत असते व त्याचा प्रभाव वाचकांवर होत असतो हे आपल्याला नाकारता येत नाही.

केवळ भाषा संशोधनाच्या पद्धतींचा विचार करायचा झाल्यास भाषेचा पारंपरिक अभ्यास - जसे जॉन लॉक म्हणतो की माणसाचा मेंदू हा कोऱ्या पाटीसारखा असून त्यावर जे कोरले जाते त्याचा संचय होतो आणि त्यानुसार माणूस त्याचा वापर करतो. मात्र नोअॅम चॉम्क्सीने 'इनेटनेस हायपोथेसिस'ची संकल्पना मांडून अगोदरच्या सिद्धान्ताला छेद दिला. शारीरिकदृष्ट्या अथवा नैसर्गिक/जन्मत:च माणसाकडे भाषा शिकण्याची क्षमता मेंदूत असते असे निरीक्षण मांडले. भाषेच्या संशोधन अभ्यासात पारंपरिक व्याकरणापेक्षा पुढे : फ्रेज स्ट्रक्चर सिद्धान्त', 'एक्स बार सिद्धान्त', 'प्रिन्सिपल अॅण्ड पॅरामीटर सिद्धान्त', 'गव्हर्मेंट अॅण्ड बाइंडिंग सिद्धान्त' व यातून अस्तित्वात आले 'मिनिमॅलिझम.' मिनिमॅलिझम अथवा किमानतेचा व्याकरणिक सिद्धान्त हा भाषा सिद्धान्त नसून उपयोजन व्यवहार आहे. वेगवेगळ्या टप्प्यांवरील भाषा संशोधनातील महत्त्वपूर्ण टप्प्यांचा अभ्यास व जाणीव मराठी भाषाशास्त्रज्ञांना असणे गरजेचे ठरते. डेव्हिड क्रिस्टल यांनी आठवड्याला दोन भाषा लोप पावतात असे निरीक्षण नोंदविलेले आहे भाषेचा मृत्यू हा नैसर्गिक नसून मानवनिर्मित कसा आहे आणि त्याची कारणे कोणती आहेत, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा संकुचित केला जातो आहे याबद्दल गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे. या सर्व विवेचनाचे तात्पर्य असे की, मराठी संशोधनासाठी भाषाभ्यासाची विविध क्षेत्रे व त्याबद्दलची जाणीव होणे आवश्यक आहे म्हणून त्रोटकपणे वरील बाबी मांडल्या आहेत. गणेश देवी यांनी भारतीय भाषांचे विशेषत: आदिवासी बोलींचे सर्वेक्षण आणि संकलन केले असून जागतिक महामंदीच्या काळात भारतीय भाषांचे

आर्थिक योगदान कसे आहे याबद्दल निरीक्षण नोंदविले आहे.

भाषा ही समाजापासून वेगळी कधीच नसते तर ती संस्कृती वाहून नेणारी असते. जेवढ्या म्हणून सामाजिक संस्था आहेत जसे कुटुंबसंस्था, न्यायसंस्था, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था इत्यादींचा व्यवहार भाषेतूनच चालतो, त्यासाठी भाषेविषयीच्या अनिष्ट धारणा आपल्याला दूर कराव्या लागतील. भाषा प्रतिस्पर्धी नसतात तर त्या सहप्रवासी असतात. संस्कृत ही सर्व भाषांची जननी आहे. भाषा विशिष्ट मैलांवर अथवा अंतरावर (अंतर निश्चित नाही) बदलते विशिष्ट भाषेवर विशिष्ट लोकसमूहांची जन्मजात मक्तेदारी असते इत्यादी उदाहरणेच द्यायची झाली तर नामदेव ढसाळ यांचे 'गोलपिठा' व 'गांडु बगिचा' इत्यादी काव्यसंग्रह आणि त्यातील भाषा, गावाबाहेरील दलितांची वस्ती आणि त्याही पलीकडे पडलेली भटक्यांची पालं आणि त्यांची भाषा यात फरक आहे. गोपाळ गुरू यांनी 'दलित स्त्रियांचे वेगळे बोलणे' या विषयावर स्वतंत्र लेख लिहिला होता

बोलीभाषा ही प्रमाणभाषेचाच भाग असते. प्रमाणभाषा ही बोली भाषांचाच सर्वसंमत स्वीकाहार्य आविष्कार असते किंबहुना, प्रमाणभाषा बोलीभाषेमुळेच श्रीमंत आणि वैभवसंपन्न झालेल्या आहेत. मानवी संज्ञापनाच्या इतिहासात ध्वनिरूप शब्द लिखित रूपाअगोदर येतात. भाषा विकासात शब्द अगोदर तयार होतात व वापरात येतात, त्यानंतर शब्दकोशात आपली जागा निर्माण करतात जसे इंग्रजी भाषेला विविध भाषेतून आलेल्या शब्दांमुळे वैभव प्राप्त झाले आहे. विनोदाचा भाग सोडला तरी आपल्या लक्षात येईल की, भारतीय भाषांमुळे इंग्रजी भाषा अधिक समृद्ध झालेली आहे आणि होते आहे. भाषा ही अगोदर वापरली जाते आणि त्यानंतर तीचा व्याकरणिकदृष्ट्या विचार होतो. हे भाषाशास्त्रज्ञांना व अभ्यासकांना आव्हान असते जसे सध्या समलैंगिकतेविषयी चर्चा होते मात्र भाषिक अनुषंगाने व्याकरणिक दृष्टीने कोणती सर्वनामे वापरणार आहोत अथवा वापरली पाहिजेत या अनुषंगाने भाषिक संशोधनाच्या मर्यादा कमी करता येऊ शकतात.

भाषा संशोधनासाठी मुळात भाषेची जाणीव आणि आवड निर्माण होणे आवश्यक असते. मराठी भाषेच्या विकासासाठी शालेय शिक्षणात भाषेची गोडी लागणे आवश्यक आहे व त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नही मराठी भाषा संशोधनात अशोक केळकर, विश्वनाथ खैरे, मिलिंद मालशे, रमेश धोंगडे, खुबचंदानी, गणेश देवी इत्यादींचे योगदान मोठे आहे. विश्वनाथ खैरे यांनी मराठी भाषेचा अभ्यास दाक्षिणात्य भाषेच्या तुलनेने करावा, अपभ्रंश व उद्भ्रंश अशी दुहेरी देवाणघेवाण भाषाव्यवहारात असते आणि संस्कृत ही अगोदर लोकभाषा होती, अशा स्वरूपाच्या भाषा संशोधनाला उपयोगी पडतील असे पथदर्शक काम केलेले आहे

शालेय अभ्यासक्रमांबरोबरच भाषाशिक्षकांना भाषासंशोधनाचे प्रशिक्षण मिळणेही आवश्यक आहे भारतात राष्ट्रीय स्तरावर काही जगप्रसिद्ध शिक्षणसंस्था आहेत, जसे हैद्राबाद येथे असणारी इंग्लिश ॲण्ड फॉरेन लँग्वेजेस युनिव्हर्सिटी जेथे हिंदी, इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, उर्दू इत्यादी भाषांचे प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि संशोधन चालते. दुसरी संस्था म्हैसूर येथे भारतीय भाषांच्या विकासासाठी आहे आणि त्या संस्थेचे नाव आहे सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस अर्थात केंद्रीय भारतीय भाषा संस्था या ठिकाणी वेगळी भारतीय भाषा शिकायची असल्यास इच्छुकांना संधी मिळते. भाषेच्छुक शिक्षकांसाठी त्यांच्या मातृभाषेव्यतिरिक्त भारतीय भाषा शिकण्यासाठीची जाहिरात वर्तमानपत्रात येते. भाषेचे सर्वेक्षण कसे करावे याबाबतही मार्गदर्शन मिळू शकते. भाषा विकास करुन घेण्यात संज्ञापनाच्या क्षेत्रातील पारिभाषिक शब्दांशीही सलगी करावी लागेल. एसएमएस, ई-मेल व सोशल नेटवर्किंगमध्ये वापरली जाणारी भाषा, त्यातील शब्द, त्यांचे व्याकरण, इत्यादींचाही अभ्यास भाषा संशोधनात अपेक्षित आहे नुकतीच प्रकाशित झालेली आर्य बब्बर यांची कादंबरी 'माय फियान्सी मी ॲण्ड...' (२०१५) मोबाईल-संगणक वापरणाऱ्या तरुण पिढीची भाषा याचा नमुना आहे. Tone भाषा, Click भाषा, आदिवासी समूहांच्या Drum भाषा व अशा प्रकारच्या विविध भाषा हे संशोधनाचेच विषय आहेत.

भाषासंशोधन आणि भाषा विकासासाठी मूलभूत संशोधनपद्धतींच्या जाणिवा निर्माण होणे, शालेय अभ्यासक्रम ात योग्य त्या सुधारणा, भाषिक धोरण, भाषिक प्रशिक्षण इत्यादी स्वरूपांचे बदल जाणीवपूर्वक स्वीकारावे लागतील यामुळे निश्चितच भाषा संशोधनाच्या विकासात भर पडेल आणि कट, कॉपी, पेस्टचा धोकाही कमी होईल.

●

# मूल्यात्मकतेचा मानदंड



अजित मगदूम

सर जाऊन २५ जानेवारीला एक वर्ष होत आहे. त्यांच्याविषयीच्या अनेक आठवणी मनात दाटून येतात. ते जायच्या आधी दोनेक महिन्यांपूर्वी सांगलीला त्यांच्या घरी मी व वृषाली त्यांना भेटायला गेलो होतो. त्यांची कन्या रेवती त्यांचा हात धरून हॉलमध्येच चालवत होती. 'सर, तब्येत कशी आहे?' मी विचारलं.

त्यांनी त्यांच्या खर्जातल्या आवाजात 'बरी नाही!' असं म्हणाले. त्यांच्या स्वरात हताशता जाणवली. अगदी नवख्या लेखनाबद्दलही थेट 'बरं नाही' असं कधीच न म्हणणारे सर आपल्या तब्येतीबद्दल असं एकांगी 'बरं नाही' म्हटल्यावर थोड वाईटही वाटलं. सुधावहिनीही हॉलमध्येच बसल्या होत्या. मात्र सर चालता चालता बोलत होते, ''आम्ही यांच्या घरी गेलो होतो. मुक्काम केला. माझ्याबरोबर भेंडे (सुभाष) व कोडोलीकर (पु. द.)ही होते. सकाळी हे दोघे आम्हाला ठाण्याच्या स्टेशनवर सोडायला आले.'' गाडी सुटल्यावर वृषालीची उतरायची कशी तारांबळ उडाली, याचीही आठवण त्यांनी दिली.

आम्ही विलिंग्डन कॉलेजमध्ये टीवायला असताना हातकणंगलेकर सरांना ग्रंथालयात धाडस करून गाठले. सोबत दोन मित्र होते, मी विचारलं ''सर, 'सर्व्हे ऑफ इंग्लिश लिटरेचर' हा पेपर खूप किचकट वाटतो.''

सर लगेच म्हणाले, ''किचकट काय म्हणता रूक्ष म्हणा हवं तर! हे पाहा, त्यामध्ये काय असतं की वाङ्मयीन कालखंड, त्यामध्ये येणारे लेखक व त्यांच्या साहित्यकृतींचा आढावा घेतलेला असतो एवढंच. तुम्ही रस घ्यायला लागलात तर आवडेल.''

एरवी एवढे गंभीर व कडक शिस्तीचे भासणारे सर एवढ्या हळुवारपणे समजावून सांगतील असं वाटलं नव्हत. त्यांच्या एवढ्या बोलण्यानं आम्ही पार विरघळून गेलो. काही दिवसांनी तोच पेपर सोपा वाटू लागला. इंग्रजी वाङ्मयाचे निष्णात प्राध्यापक, मराठी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक,

ईमेल : ajitbalwant@gmail.com

विद्यार्थ्यांना आंतरिक मायेने वागविणारे शिक्षक, नव्या उमलत्या लेखकांना त्यांच्या मर्यादा हळुवारपणे दाखवून त्यांच्या सामर्थ्यस्थळाद्वारे प्रोत्साहन देणारे म.द. हे एक चालतेबोलते विद्यापीठच होते. महाविद्यालयीन आणि विद्यापीठ पातळीवरील अनेक प्राध्यापकांशी चर्चा केल्यानंतर अनेकदा त्यांच्या व्यासंगाचा तळ कुठे ना कुठे उघडा पडायचा. अलीकडे तर तथाकथित 'स्कॉलर' आपलं कुठलं तरी कोपऱ्यातलं क्षेत्र हे 'स्पेशलायझेशन' आहे असं सांगून 'मला बाकी काही विचारू नका' असं सूचित करून टाकतात. असे फार थोडे शिक्षक वाट्याला येतात की त्यांच्या व्यासंगाचा थांग सापडत नाही. त्यामध्ये हातकणंगलेकर सरांचं नाव घ्यावं लागेल. साडेतीन दशकांच्या समृद्ध प्राध्यापकी जीवनात त्यांच्या विद्यार्थ्यांशी असलेल्या नात्याची जातकुळीच वेगळी होती. साहित्य आणि त्याचा रसास्वाद या एक-दोन बाबीभोवती या नात्याची गुंफण असायची. त्यांच्या अंतःकरणातील ममत्व माझ्यासारख्या गावाकडून सांगलीला आलेल्या असंख्य विद्यार्थ्यांनी अनुभवलं आहे. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्यांचा त्यांचा एक अलवार गोतावळा आहे. विलिंग्डन आणि हातकणंगलेकर सर माहीत असलेल्या दोन अनोळखी व्यक्ती जरी जवळ आल्या तरी त्यांच्या आठवणी संपता संपत नाहीतच, पण त्यांच्यात हा दुवा गाढ मैत्रीचं नातं निर्माण करतो.

एकदा नवी मुंबईत ट्रॅफिक इन्स्पेक्टरने माझी स्कूटर अडवून लायसेन्स काढून घेताना त्याच्याशी बोलाबोली झाली. नंतर त्याला विनंती केली. गाव विचारलं तर सांगली म्हणाला. मीही सांगलीचाच म्हणून पाहिलं तर स्वारी गुर्मीतच. मी विलिंग्डनला होतो असा खडा टाकून पहिला तर थोडी काळी खुलली. म.दं.चा विद्यार्थी म्हटल्यावर त्याने माझ्या शर्टाच्या खिशात ते लायसन्स कोंबलं. सरांच्या आठवणी आम्ही एकमेकांना सांगत जवळच्या टपरीवर चहा घेऊनच विदा झालो.

पश्चिम महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमाभागात इंग्रजीचे व्यासंगी प्राध्यापक म्हणून सरांचं नाव सुपरिचित होतंच, पण मराठी साहित्यजगतात त्यांना 'समीक्षक' म्हणून महाराष्ट्रभर मानाचं पान असायचं. त्यातल्या त्यात आस्वादक समीक्षा हा काहीसा मान्यताप्राप्त मानला न गेलेल्या समीक्षाप्रकारचे ते खंदे पुरस्कर्ते होते. महाराष्ट्रातील सर्व नवोन्मेषशाली लेखकांना हातकणंगलेकर सरांचा आधार वाटण्याचं ते एक कारण होतं. चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या अनेक नव्या लेखकांची, कवींची पुस्तकं त्यांच्या टेबलवर पसरलेली दिसायची. ही सगळी पुस्तकं त्यांच्या विचक्षण नजरेखालून जायची. मग यातल्या अनेकांना त्याचं चार-दोन ओळींचं एक छान टिपणवजा पत्र म्हणजे पोस्टकार्ड जायचं. म. द. हातकणंगलेकर अशा लफ्फेदार सहीचं ते पोस्टकार्ड मिळालं की त्याला या आभाळमायेचा स्पर्श आंतर्बाह्य सुखावून जायचा हे खरं आहे. तेच नवोदित मोठे होतात, खूप मोठे होतात, त्यांना पुरस्कारही मिळतात. पण त्यातल्या काहींना म.दं.चं ते पहिलं पत्र नंतरच्या सर्व पुरस्कारांपेक्षा मोठं वाटतं म्हणून ते जपून ठेवलं आहे. महाराष्ट्रात नवोदितांना आत्मीयतेने हिताचे चार शब्द खर्च करणाऱ्या रवींद्र पिंगे, मधु मंगेश कर्णिक यांच्याबरोबर म. द.चं नाव अग्रक्रमानं येत.

सरांची आणखी एक खासीयत म्हणता येईल ती म्हणजे नेहमीच्या संभाषणात ते इंग्रजीचा एखादाही शब्द वापरत नसायचे, पण व्यासपीठावरील समीक्षकीय भाषणातही कधी इंग्रजीची अवतरणं ऐकायला मिळाली नाहीत. मात्र इंग्रजी वाङ्मयाच्या गाढ्या अभ्यासातून आलेल्या प्रगल्भतेचा प्रत्यय मात्र आल्याशिवाय राहत नसे.

जी. ए. कुलकर्णी व श्री. दा. पानवलकर या त्यांच्या विशेष प्रिय असलेल्या कथाकारांवर त्यांनी पुस्तके लिहिली. समीक्षाग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. 'उघडझाप' हे त्याचं एक अनवट आत्मपर पुस्तक आहे. त्याची म्हणावी एवढी चर्चा/प्रसिद्धी झाली नाही, पण ते वाचल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक वैशिष्ट्यांचं मनोज्ञ दर्शन घडतं. त्यांच्या नेमस्त व तटस्थ वृत्तीमुळे अनेक पुरस्कार समित्यावर त्यांनी काम केले. साहित्य अकादमी, ज्ञानपीठ पुरस्कार (विभागीय सल्लागार), विश्वकोश मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद इ. उदाहरणे देता येतील.

सांगली आणि विलिंग्डन कॉलेज ही त्यांची कर्मभूमीच. या कर्मभूमीतच म्हणजे विलिंग्डन कॉलेजच्याच मैदानावर पार पडलेल्या ८१ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविता आले हा एक सुवर्णयोगच. शिक्षणक्षेत्र आणि साहित्यक्षेत्रात किमान मूल्यात्मकतेचा आग्रह धरणाऱ्या, गटतट-कंपू या सर्वांपलीकडे जाऊन कसाला उतरणाऱ्या साहित्याचा अहर्निश वेध घेणाऱ्या या आस्वादकाला व विद्यार्थ्यांच्या क्षमतावर श्रद्धा बाळगणाऱ्या या महान शिक्षकाला विनम्र अभिवादन!

●

# ‘जय भीम-जय भारत’ नाटकाला सेन्सॉरचे आक्षेप का?

सुबोध मोरे

‘आकार’ या संस्थेतर्फे जनार्दन जाधव यांचे ‘जयभीम-जय भारत’ या नावाचे मराठी नाटक महाराष्ट्र शासनाच्या ‘रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाकडे’ (सेन्सॉर बोर्ड) दि. २३ नोव्हेंबर २०१५ रोजी सेन्सॉरचे संहिता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दिले होते. सदर संहितेमध्ये सेन्सॉरमंडळ सदस्यांनी एकूण एकोणीस आक्षेप नोंदवून तसे लेखी पत्र नाट्यलेखकास दि. ११ जानेवारी २०१६ रोजी दिले व सदर आक्षेप मान्य केल्यावरच प्रमाणपत्र देऊ असे सांगितले. सदर आक्षेप (कट्स) पुढीलप्रमाणे–

१. कवी नामदेव ढसाळ व ‘गांडू बगीचा’ हे शब्द वगळून दुसरा शब्द वापरा.

२. ‘आधी बामणशाही तुमच्यासारखे’... ही ओळ गाळणे

३. पान क्र. ६ वरील, ‘घराघरांत देवदेवतांचे लोण फोफावते... कर्मकांड वाढत आहे’ अशा अर्थाची ओळ वगळणे.

४. पान क्र. १८ वरील चंदर कांबळे, पोचिराम कांबळे, अंबादास सावणे ही मराठवाडा विद्यापीठ नामांतरलढ्यातील शहिदांची नावे, दलित पँथरच्या आंदोलनातील शहीद भागवत जाधव, रमेश देवरूखकर ही नावे, त्याच परिच्छेदातील रमाबाईनगर, मनोहर कदम, मोरे, जातीयवादी, नागपूर, खैरलांजी, ठोंबरे, महार आदी, घाटकोपर रमाबाईनगर व खैरलांजी दलित हत्याकांडाशी संबंधित महत्त्वाचे शब्द गाळण्यास सांगितले.

त्याच पानावर देशभरातील चुंदुर (आंध्र प्रदेश), कुम्हेर (राजस्थान), बेलछी (बिहार), करमचेंडू (आंध्र प्रदेश) आदी जातीय हत्याकांड-अत्याचाराच्या घटनांचे जे उल्लेख आहे तेही सेन्सॉर बोर्डाने वगळण्यास सांगितले.

ईमेल : subodhvidrohi@gmail.com

५. पान क्र. २७ वरील खैरलांजी हत्याकांडविरोधी जनआंदोलनात पोलिसांनी नागपूर शहरात जी दडपशाही व जातीय भेदभाव केला त्या संदर्भातील विधानही गाळण्यास सांगीतले

६. पान क्र. ३२ वरील डॉ.आंबेडकरांच्या तोंडी देशातील जातीयवादी व पोलिसांच्या अत्याचारासंदर्भात जी विधाने आहेत, तसेच 'या देशातील मंत्री दलितांना जी कुत्र्याची उपमा देता, एक राज्यपाल 'अल्पसंख्याकांनी दुसऱ्या देशात चालते व्हावे' असे सांगतो व कोणी काय खावे काय खाऊ नये हे सरकार ठरवणार काय? काय चालले आहे या देशात' असा सवाल डॉ. आंबेडकर महात्मा गांधींना विचारतात, तो संपूर्ण भागही सेन्सॉरने गाळण्यास सांगितला. त्याच पानावर 'कुत्रा' हा शब्दही गाळून 'श्वान' हा संस्कृतप्रचूर शब्द वापरण्याचा सल्ला दिला आहे.

७. पान क्र. ३४ वरील एका परिच्छेदात डॉ. बाबासाहेब आंबेडकर छुप्या व उघड हिंदुत्ववाद्यांवर वैचारिक टीका करतात व गांधीजी आंबेडकरांकडे स्वतःची व्यथा व्यक्त करतात तो सगळा भाग वगळण्यास सांगितले

८. पान क्र. ३५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर गांधीजींना उद्देशून, 'तुमचा खून करणाऱ्या देशद्रोह्याची येथे जयंतीमयंती साजरी केली जाते, ह्याला काय म्हणणार आहात तुम्ही?' हे संपूर्ण वाक्यही गाळण्यास सांगितले आहे.

९. पान क्र. ३७ वरील डॉ. आंबेडकरांच्या संवादात 'हिंदुत्ववाद' असा शब्द आहे व ते 'हिंदुत्ववाद्यांवर टीका करतात तेही गाळण्यास सांगितले आहे.

१०. पान क्र. ३८ वर 'हिंदुत्ववाद' व रमाबाईनगर, खैरलांजी हत्याकांडाचा उल्लेख डॉ. आंबेडकरांच्या संवादात आहे ते वाक्यही गाळण्यास सांगीतले.

११. पान क्र. ४० वर 'तोच एखादा पैलू 'बौद्धमय' भारत होण्यासाठी प्रेरक ठरेल' हे डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण विधान केवळ 'बौद्धमय' ह्या शब्दामुळे गाळण्यास सांगितले आहे.

१२. पान क्र. ४१ वर सगळ्यात कळस म्हणजे पद्मश्री पुरस्कार आणि साहित्य अकादमीने भारतातील विशेष लेखक म्हणून गौरविलेले नामदेव ढसाळ यांची अनेक विद्यापीठांत अभ्यासक्रमात असलेली

## 'वाटसरू'चे प्रतिनिधी

**अहमदनगर :** प्रा. विजय ठाणगे : ९८२२६७१८४५
**अकोला :** डॉ. संतोष कायंदे : ९४२१७४८७८२
**अमरावती :** डॉ. प्रशांत विघे : ९३२६८७७७४९
**औरंगाबाद :** डॉ. भारत गोरे : ९४२२४७८०००
**बारामती :** वसंत घुले : ९४२२५११००६
**बीड :** विशाल गोरे : ९५४५५२८८०२
**बुलडाणा :** सुरेश साळवे : ९४२०३३६६६७
**चिपळूण :** प्रा. विराज महाजन : ९४२११४०७६७
**धुळे/जळगाव :** प्रा. संदीप नेरकर : ९४२३४९४७८०
**जालना :** प्रा. बळीराम कटारे : ९४०३८४२६५५
**कोल्हापूर :** सूर्यकांत गायकवाड : ९६७३१६०३७२
**लातूर :** डॉ. उमाकांत जाधव : ८२७५५९९७७७
**परभणी :** प्रा. पी. बी. मेणे : ९४२१३९२१३०
गजानन अंभोरे : ९८२३८०४१४१

**पालघर :** डॉ. चंद्रकांत गायकवाड : ९५०३८१३९५५
**मुंबई :** प्रा. हर्षद भोसले : ९८६९१२७९७२
**नवी मुंबई :** प्रा. संदीप घोडके : ९८६९१८५७४७
**नाशिक :** प्रा. प्रशांत देशपांडे : ९४२२७६०६०४
**नंदूरबार :** धनराज पाटील : ९९२२०४२१२१
**नांदेड :** प्रा. राजेंद्र इंगळे : ९४२३३०५८२७
प्रा. सुग्रीव फड : ८९७५४३८७३६
**रायगड :** प्रा. व्यंकट खटके : ९४२१२५३७१०
**सातारा :** प्राचार्य सीताराम गोसावी : ९८५०१५६१६६
**सांगली :** ज्ञानेश्वरी पाटील : ७५८८५८६६७६
**सोलापूर :** रवींद्र मोकाशी : ९६१९६६६६५६
**ठाणे :** हर्षल पाटील : ९८२१८६१५६७
**वर्धा :** डॉ. अरविंद सोमनाथे : ७५८८१८७३०९
**यवतमाळ/नागपूर :** प्रा. राहुल बावगे :९४२३४०३३०८

'गोलपीठा' या कवितासंग्रहातील 'माणसाने' या कवितेतील 'भरचौकात नेऊन, यांचे कपडे उतरवून, यांच्या गांडीवर हंटरने फटके मारावेत, नंतर गटाराचं मेनहोल उघडून, त्यात त्यांना सलग सडत ठेवावं...' ह्या ओळीही गाळण्यास सांगितले आहे.

सेन्सॉर मंडळाने वरील आक्षेप कुठल्या कारणास्तव नोंदविले आहे ह्याचे स्पष्टीकरण मागणारे लेखी पत्र लेखकाने मंडळाला १३ जानेवारीला २०१६ ला दिले.

त्यानंतर मंडळाचे अध्यक्ष अरुण नलावडे ह्यांची लेखक व दिग्दर्शकांनी प्रत्यक्ष २० जानेवारीला भेट घेतली व आक्षेपांबाबत खुलासा मागितला तेव्हा त्यांनी नाटककार अशोक समेळ ज्यांनी या नाटकासंदर्भात वरील आक्षेप नोंदविले, त्यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याच दिवशी लेखक दिग्दर्शक अशोक समेळांना भेटले व त्यांच्याशी आक्षेपांबाबत चर्चा केली, पण त्या चर्चे तही अशोक समेळ आक्षेपांबाबत समाधानकारक खुलासा करू शकले नाही. त्यानंतर दि. २७ जानेवारीला मंडळाने आम्हाला 'तात्पुरते' प्रमाणपत्र केवळ दि. ७ फेब्रुवारीच्या एका प्रयोगापुरते दिले. त्यातही वरील सर्व प्रमुख आक्षेप (कट्स) कायम ठेवले आहे. त्यामुळे नाटकाचा मूळ आशय व वैचारिकतेला मारक असे आक्षेप कायम ठेवून नाटक सादर करणे अडचणीचे होणार आहे.

वास्तविक जुन्या सेन्सॉर बोर्डाने प्रज्ञा दया पवार यांच्या 'धादांत खैरलांजी' नावाच्या नाटकाला प्रमाणपत्र दिले आहे. त्या नाटकामध्ये पीडितांची खरी नावेही वापरली आहेत. 'खैरलांजी' नावाचा चित्रपटही आला आहे. एवढेच नाही तर नामदेव ढसाळांच्या 'गोलपीठा' काव्यसंग्रहावर 'गांडू बगीचा' नावाचे नाटकही चरण जाधव या लेखकाने सादर केले आहे. त्यालाही अनेक स्पर्धांत बक्षिसे मिळाली व त्याला सेन्सॉरचे प्रमाणपत्रही आहे. 'मी नथुराम बोलतोय'सारखे महात्मा गांधींच्या खुनी देशद्रोह्याचे गौरव करणारे व उघड जातीय-धार्मिक द्वेष पसरवणारे, हिंसेचे व हिंदुत्वाचे समर्थन करणारे, असत्य इतिहासकथन करणारे नाटकही सेन्सॉरच्या संमतीने राजरोस सुरू आहे. अशा वेळेस आमच्या, सत्यघटनांवर आधारित व ज्या रमाबाईनगर व खैरलांजी दलित हत्याकांडामध्ये न्यायालयीन निर्णय होऊन शिक्षाही झाली आहे अशी नावे, शब्द नाटकातून गाळण्याचा सेन्सॉरचा आग्रह का? विषारी हिंदुत्वाचा प्रचार करणारी नाटके सुरू असताना आमच्या नाटकातील शांतीचा संदेश देणारे 'बौद्धमय भारत' का गाळायचे? सेन्सॉरच्या वरील आक्षेपावरून आम्हाला असे वाटते की हे सेन्सॉर बोर्ड समाजातील आजचे वास्तव स्वीकारण्यास तयार नाही. त्यांना दलित व अल्पसंख्याकांवरील अन्यायाचे चित्रण, जातीयवाद, धर्मांधता, अंधश्रद्धेवरील टीका मान्य नाही. आमच्या मते सेन्सॉर बोर्डचे वरील आक्षेप म्हणजे लेखकाच्या मूलभूत अभिव्यक्ती स्वातंत्र्यांची मुस्कटदाबी आहे. आणि देशातील सत्य दाहक वास्तव वरील आक्षेपाद्वारे सेन्सारबोर्ड दडपत आहे.

सेन्सारबोर्डची वरील कृती म्हणजे भारतीय राज्यघटनेने दिलेल्या लेखन, उच्चार व वैचारिक स्वातंत्र्यावर आणि संविधानात्क मूल्यांवर आघात आहे. सेन्सॉर मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या वरील आक्षेपांवरून ते आजच्या सत्ताधारांच्या हिंदुत्ववादी विचारसरणीचाच पुरस्कार करीत आहे आणि सत्ताधाऱ्यांचेच लांगुलचालन करीत आहेत हे स्पष्ट जाणवत आहे.

आमच्या नाटकावर घेतलेले आक्षेप मागे घेऊन प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळतील अशी आम ची अजूनही अपेक्षा आहे. प्रमाणपत्र न मिळाल्यास आम्हालाही सवाल करावा लागेल की सेन्सॉर बोर्डाला हिंदुत्वाच्या 'श्वाना'ने चावले आहे काय?

●

'वाटसरू' सोलापुरात

**प्रोग्रेसिव्ह बुक सेंटर**
शॉप नं. १०, युनायटेड रेसिडेन्सी,
१५९, रेल्वे लाईन, सोनामाता
शाळेसमोर, सोलापूर-४१३००३.
दू. ९४२२६४५०५५

# पवन खेबुडकर यांच्या **दोन कविता**

## कोष

आपल्याभोवती कोष विणायचं नवं तंत्र
शिकून घेतलं होतं मी अगदी अलीकडंच
याच विचारानं की
आता तरी होईल आपली हक्काची एक जागा
जिच्यात गुरफटून राहता येईल आपल्याला
सगळी कवाडं बंद करून
राहिलोही तसा चिडीचूप
घुसमटत, मिटमिटत
पण फक्त काही क्षणच
कारण स्वच्छतेच्या नावाखाली
बरंच काही साफसूफ करण्याच्या इराद्यानं
झाडूंच्या बरोबरीनं तलवारीही लखलखल्या जेव्हा
विखारी वैखरींसह
सपासप सपासप
तेव्हा हडबडलो
धडपडलो कोषातल्या कोषात
आणि उसळी मारून आलं आतून काहीतरी
म्हणून पाहिलं चमकून
तर कसं कुणास ठाऊक
पण झालं होतं माझं
रंगीबेरंगी फुलपाखरू
मजेत उडणारं
चुकवत दुधारी तलवारींचे वार
झपाझप
झपाझप

## फुलपाखरू

अनेक वेळा बजावून
आणि सक्त ताकीद देऊनदेखील
उडतच राहिलं ते फुलपाखरू अगदी मजेत
गुणगुणत आपल्याच नादात
संतापले मग ते
आणि शिपाईच पाठवले त्यांनी
त्याला पकडायला
खरं तर काहीच गरज नव्हती त्याची
कारण अगदी लगेचच
एका चिमटीतच सापडलं ते
धारदार शस्त्रांनी विच्छेदन करून
प्रयोग केले मग त्यांनी
शोधू पाहिलं रहस्य
त्याच्या मजेत उडण्याचं आणि गुणगुणण्याचं
मात्र खूपसे निराश आणि थोडेसे चकित होऊन
निघून गेले ते माघारी
रिकामे हात हलवत
हे सारं अचंबित होऊन पाहणारा
एक छोटा मुलगा
बिचकतच आला पुढं
एकेक करून गोळा केले त्यानं
त्या फुलपाखराचे विखुरलेले पंख
आणि अगदी हळुवार हाताने
अलगद दिले ठेवून
आपल्या वहीच्या कोऱ्या पानांमध्ये
आता तो वाट पाहतोय
त्या पंखांची गाणी होण्याची

# अरुणचंद्र गवळी यांच्या **तीन कविता**

चेहरा गोठत चाललाय
जीवघेणं नैराश्य
अन् लादलेल्या न्यूनगंडाची
परिसीमा
निरनिराळ्या नशांच्या हिमनद्यांमध्ये
गोठून चाललेलं अस्तित्व
इथं डंख मारताहेत
असंख्य नैसर्गिक सजीव
किनारे शोधण्याचा हव्यास संपलाय
तरीही आठवतच राहतात
पूर्वायुष्यातली जंगलं
त्यात अस्तव्यस्त विखुरलेले
कुपोषित हाडांचे सापळे
अन्
वणवा पेटवून देणारी माझी कविता

●

माझ्या अघोरी कविते
तुझ्याप्रत पोहोचताना
आता कुठलाच आणि कसलाच
कृत्रिमच काय पण नैसर्गिकही
अडथळा नाही
मेंदू आणि हात
दोन्ही शतप्रतिशत शाबूत
अन् हे भावनात्मक संबंध
ओंगळवाण्या गॅलरीतल्या
मख्ख डबड्यात टाकून दिलेले
माझं उकळतं रक्त
तुझ्या वेडापायी
आटत चाललेलं
तुझ्या निःशंक प्रेमापोटी
सताड आयुष्याचा क्षण न् क्षण
तोंडात जाणाऱ्या मातीसारखाच
अप्रतिम उग्र कुबट अनिवार्य
तुझं वारांगणेसारखं खुणवणारं
धारदार आवतण
आयुष्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवणारं
एक बेभान अंतिम चुंबन

●

कविता

## इसापकथा : २०१६

मेंढ्या भुलल्या
त्यांचे कळपच्या कळप गेले
लांडग्यामागे
मेंढ्यांना वाटलं
हा धर्मवीर शेंदाड लांडगा
ज्याने हरणांचा, काळवीटांचा
वंशच नष्ट करण्याचा
विडा उचलला आहे
तो तर आपल्यासाठीच
ही हिरवीगार कुरणं
मोकळी करून देत आहे
हा तर सांगतोय
मी फक्त मेंढ्यांचाच विचार करणार
ही हरणं, काळवीटं
कुरणं फस्त करणारी
गद्दार अवलाद आहे
ही परक्या कुरणांमधून येऊन
माझ्या या मेंढ्यांना धर्मभ्रष्ट करून
या कुरणात शिरजोरी करून चरताहेत
मेंढ्यांनी त्याच्या जयजयकाराच्या
घोषणा द्यायला सुरुवात केली
अन् कळपातल्या
दोन उन्हाळे पावसाळे
जास्त पाहिलेल्या
शहाण्या वृद्ध मेंढ्या हादरून गेल्या
त्यांनी कळपांच्या सभा घ्यायला
सुरुवात केली
त्यांनी समजावून सांगायचा
प्रयत्न केला
लांडगा हा आपला शत्रूच आहे
त्याच्या राक्षसी भुकेसाठी
जशी हरणं-काळवीटं आहोत
तसे आपणही आहोत
मेंढ्या उपहासांनी म्हणाल्या
काळ बदलला तरी ही थेरडी
बदलायला तयार नाहीत
त्यांनी वृद्धांना कळपाबाहेर काढले
जयजयकारांच्या घोषणा देत
कळपच्या कळप लांडग्यामागे गेले
आता लांडगा निर्दयपणे मेंढ्यांचे
कळपच्या कळप संपवत चाललाय
आता ही कुरणं ज्यात
सजीवच समूळ नष्ट करण्याचा
प्रस्ताव आहे.

●

# निदा फाजली यांच्या अनुवादित नऊ कविता

(अनु. : **लोकनाथ यशवंत**)

## अब्रू

जर,
तुमची मान्यता आहे की,
पत्नी घराची अब्रू असते
तर;
कृपया या घराच्या अब्रूसाठी
दरवाजा उघडा असो की बंद
नेहमी दाद ठोठावूनच घरात जा

## सहमत

सरकारी कॉलनीतल्या घरांसारखी
प्रत्येक तरुणी एकसारखी असते
कुठल्याही नंबरचे दार ठोठवा.
प्रत्येक दार बेडरूममध्ये जाऊन संपून जाते
काही दिवस फिरण्याभटकण्यासाठी पैसे असतील तर;
भटकून बघा.
तुम्ही माझ्याशी सहमत व्हाल.

## झोपण्यापूर्वी

प्रत्येक तरुणीच्या उशाखाली
एक धारदार ब्लेड, गोंदाची शिशी
आणि काही सुंदर चित्रं असतात
झोपण्यापूर्वी
त्या अनेक चित्रांना कापून कापून
एक मनाजोगे चित्र बनवितात
कुणाचे डोळे कुणाच्या चेहऱ्यावर लावतात
कुणाच्या शरीरावर कुणाचा चेहरा सजवितात
आणि जेव्हा त्या या खेळाला कंटाळतात
तेव्हा, मांसाचा गोळा असलेल्या एखाद्या नवऱ्यासोबत
मिठी मारून झोपी जातात.

## एकात्मता

ती वेश्या,
कित्येक पुरुषांशी परिचित आहे.
म्हणूनच ती
जगाला 'चांगलं' ओळखते.
तिच्या खोलीत
सर्व धर्मांच्या देवांचे फोटो.
हे फोटो
नेत्यांच्या भाषणांसारखे बोगस नाहीत
तिचा दरवाजा रात्रीपर्यंत
हिंदू
मुस्लीम
शीख
ईसाई
प्रत्येकासाठी खुला असतो
...
तिच्या खोलीतील एकात्मता
मंदिर, मस्जिदीच्या अंगणात केव्हा येईल?

## सत्य

ती कुठल्याही एका माणसासोबत
जास्त दिवस राहू शकत नाही.
ही तिची कमजोरी नसून
वास्तव आहे.
मात्र,
ती जितके दिवस ज्याच्यासोबत असते
त्याच्याशी मुळीच बेइमानी करत नाही
तिला लोक काहीही म्हणोत
पण;
कोणत्या तरी एका घरात
आयुष्यभर खोटं बोलण्यापेक्षा
वेगवेगळ्या घरांत प्रामाणिक राहणं
केव्हाही चांगलं.

## प्रेम

अगोदर ती रंग होती
नंतर ती रूप झाली
रूपातून शरीरातून परावर्तित झाली
आणि शरीर झाल्यावर बिछाना होऊन
घराच्या कोपऱ्यात पडून राहिली
तिला,
खोलीतील घुसमट वेळी-अवेळी उचलून घेते
उलगडते आणि अंथरून घेते.

## पत्र

तू आरशासमोर नटण्याथटण्यात मग्न होतीस
उघड्या डोळ्यांच्या गाढ झोपेत लिप्त होतीस
तू तेव्हा स्वतःवरच प्रेम करायचीस
तेव्हा मी तुझ्यावर प्रेम करायचो.

तुझ्या नावाच्या सुगंधाने तेव्हा ऋतू सजत होते
तुझे रात्रंदिवस घेऊन दूत उतरायचे
तुला आपलं करण्याची मनीषा होती
तेव्हा तुझ्यावर माझं प्रेम होतं

तुझे स्वप्न तेव्हा आकाशातील ताऱ्यांत लुकलुकायचे
गुलाबी डोळ्यांत उजेड होता, पदरात श्रावण होता
अनेकांशी तुझी प्रतिद्वंद्वता होती
तेव्हा तुझ्यावर माझं प्रेम होतं

तुझं पत्र मिळालं
तुझ्या आठवणीत मी आहे, कृपा तुझी
बदलत्या वेळेचं मात्र प्रत्येक हृदयावर राज्य असतं
ते अगोदरच सत्य होतं
जेव्हा तुझ्यावर माझं प्रेम होतं.

## वेळेच्या अगोदर

तसं पाहिलं तर
प्रत्येक नात्याचा शेवट असाच होतो
फुलं फुलतात
सुगंध पसरवितात
आणि
गळून पडतात.

माझी तुझ्याबद्दल
कुठलीच तक्रार नाही
डहाळी हिरवी असली तर
वातावरण भावुक असते
प्रत्येक कळी जखमेनं वेगवेगळी असते.

तू विनाकारणच
पर्यावरणाला त्रास दिलास
अन्यथा
फूल जेव्हा उमलून सुगंधी होते
तेव्हा ते,
आपोआपच डहाळीपासून गळून पडते.

## एक तरुण आठवण

निसटणाऱ्या वेळेनं
माझे केस पांढरे केले
नि इकडे-तिकडे भटकण्याची सवय कमी झाली

आरसा जे म्हणतो
ते खरंच म्हणतो
एकच चेहरा कुणाचा राहतो?

या वेळेच्या बदलणाऱ्या वाळवंटात मात्र,
कुठेतरी कुणातरी घरात
एक मुलगी अशी आहे
अनेक वर्षांपासून ती
जशी होती तशीच आहे
अगदी तशीच आहे

# ज़ैनुल आबेदिन

(१९१४-१९९६)



सुधाकर
यादव

अमृता शेर-गील भारतात परत आली त्यावेळी भारतीय चित्रकलेत 'बंगाल स्कूल' आणि 'बॉम्बे स्कूल' प्रस्थापित होऊन सर्वमान्य झालेच होते. स्वदेशी चळवळीतून आलेले राष्ट्रप्रेम, ब्रिटिश विरोध म्हणून भारतीय परंपरेचा अनुनय आणि अनुकरण हेच कलेचे मापदंड झाले होते. प्रत्यक्ष जीवन, सभोवतालचा परिसर, भारतातल्या विविध परंपरा यांची दखल न घेता उठावदार दिसणाऱ्या सर्वमान्य झालेल्या अजिंठा, लघुचित्र, वेरुळ याच परंपरेला जोडून घेण्याचा प्रत्येक कलाकार प्रयत्न करत होता. कलकत्ता, मुंबई, चेन्नई आणि लाहोरपर्यंत कलाकारांना भौतिक परिस्थितीचे भान नव्हते.

दृक्-प्रत्यवादापासून घनवादापर्यंत युरोपियन कला बदलली होती. दृक्-प्रत्यवादी चित्रकारांच्या भरभराटीत भारतीय वंशाची चित्रकार अमृता शेर-गील युरोपातच होती. दृक्-प्रत्यवादापासून घनवादाकडे सरकणारा काळ तिने प्रत्यक्ष अनुभवला होता. त्याचा पूर्ण प्रभावही अमृता शेर-गीलवर होता.

प्रत्यक्ष वास्तवाला भिडणारा दृक्प्रत्यवाद आणि उत्तर दृक्प्रत्यवाद, त्यातूनच तीव्र भौतिक भान, प्रतिमा टिपणाऱ्या कॅमेऱ्याचा शोधापासून आफ्रिकन आदिवासी कलेचे तत्त्व, दुसऱ्या महायुद्धासाठी विध्वंसक होत चाललेला परिसर, सभोवतालचे वातावरण अशा परिस्थितीतून उद्भवलेला घनवाद आणि पिकासोसारखा भेदक प्रतिभावंत कलाकार.

भारतीय कला आणि युरोपियन कलेतला परस्पर विरोध, त्यातून भारतीय कलेचा कला आणि परंपरेबाबत चुकलेला अंदाज, निव्वळ अलंकृत झालेल्या भारतीय कलेपासून उद्विग्न झालेल्या अमृता शेर-गीलने जी भारतीय कलेची समीक्षा केली त्यातून भारतीय कला नि:शब्द झाली. कसल्याही परंपरेचा अनुनय न करता आजूबाजूचं वास्तव, परिसरात

ईमेल : suya1957@gmail.com

**स्वदेशी चळवळ ते भारतीय स्वातंत्र्यापर्यंतच्या काळात भारतीय कलेत अनेक परिवर्तने झाली. वसाहतीकरणाची प्रतिक्रिया म्हणून परंपरेकडे जेवढी भारतीय कला ओढली गेली, स्वातंत्र्यानंतर तेवढीच जागतिक कलेने भारतीय कला प्रभावित झाली. भारतीय कलेची स्वतंत्र ओळख ज्या कलाकारांनी तयार केली, स्वातंत्र्यानंतर त्यातलेच काही कलाकार विदेशात गेले. तर देशाच्या फाळणीने काही कलाकार मूळभूमीसह विदेशी झाले. मूळभूमी, मूळ संस्कृतीच्या एकसंध विचाराने स्वातंत्र्यपूर्व काळातील काही पाकिस्तानी आणि काही बांगलादेशी चित्रकारांच्या निर्मितीची चिकित्सा भारतीय कलेबरोबर होणे म्हणूनच अनिवार्यच वाटते.**

एकरूप झालेले चित्रकार रवींद्रनाथ टागोर, यामिनी रॉय, रामकिंकर बैज यांसारखे चित्रकार मात्र अमृताच्या मर्जीत आले.

कश्मीर आणि सिमला म्हणजे अद्‌भुत सुंदर निसर्गाचे ठिकाण म्हणून भारतीय कलाकारांना आकर्षण होते. दृक्-प्रत्यवादी विचाराचा प्रभाव असलेली अमृता शेर-गील याच परिसरात असूनही तिथले प्रचलित निसर्ग सौंदर्यापेक्षा संपूर्ण भारतीय समाजजीवन, कला परंपरा तिने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. भारतीय समाजाचं दारिद्र्य, दु:ख, कारुण्य याचाच पुन्हा पुन्हा आलेला प्रत्यय तिच्या कलेत उतरला. आणि भारतीय कलेत खऱ्या अर्थाने भारतीय वास्तव प्रगटत गेले. दु:ख, यातना आणि खिन्न चेहऱ्याच्या चित्रणाने इथल्या समाजाला पहिल्यांदाच आपले खरे प्रतिबिंब कलेत दिसले.

अमृता शेर-गीलच्या चित्र जाणिवा अलगदपणे पुढे रामकिंकर बैज, यामिनी रॉय यांच्या माध्यमातून येत गेल्या. १९४० नंतर खऱ्या अर्थाने भारतीय कलेला सामाजिक भान आले. हाच काळ भारतीय राजकारण, समाज यांच्या संघर्षाचा होता. स्वदेशी चळवळ तीव्र होऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष पेटला. स्वातंत्र्याचा मार्ग अहिंसक असला तरी चळवळीतून पेटलेल्या उद्वेगाने हिंसा होतच होत्या. १९४२ चा गांधींचा 'चले जाव'चा उठाव आणि १९४३ ला बंगालमध्ये पडलेला तीव्र दुष्काळ याने राजकीय, सामाजिकतेबरोबर निसर्गाच्या कोपाने माणसाचे जगणे कुरुप होऊन गेले. सौंदर्यपूजक भारतीय कला हे वास्तव उघड्या डोळ्यांनी बघत होते. उघड्या डोळ्यांनी आलेला हा प्रत्यय सौंदर्याच्या कल्पना, आदर्शांपेक्षा प्रभावी होता. कलाकारांच्या जाणिवा आपोआपच बदलल्या गेल्या. देशाची फाळणी करून मिळालेले स्वातंत्र्य हे आणखीन वेदनाकारक होते. राष्ट्रवादाचे प्रेम, परंपरेची आदर्शवादी कल्पना यांतून गृहीत धरलेली कला भंग होऊन जीवनातले प्रत्यय भारतीय कलेत येऊ लागले.

डाव्या विचाराची लाट देशभर प्रभावीपणे पसरली. हा कम्युनिस्ट विचार बुद्धिजीवी आणि शहरी समाजातून पार गावपातळीवरच्या तळातल्या माणसापर्यंत पोहोचला. समाजरचनेत झाकून गेलेले खरे वास्तव उघड होत गेले. त्यातून अनेक विचारवंतांबरोबर कलाकारांनीही समविचारी गट करून हे 'समाजवादी वास्तव' कलेत आणले. डोळ्यांना दिसणारा वास्तववाद चित्रकलेत आकर्षकपणे येत होताच. उघड्या डोळ्यांना दिसलेला हा वास्तववाद मात्र करुण आणि भेदक होता. कलकत्त्यात यामिनी रॉय, माणिक बंद्योपाध्याय, बुद्धदेव बोस आणि विष्णू डे या लेखक, चित्रकारांनी Anti Fascist Writers and Artists Association (A.F.W.A.A.) असा एक ग्रुप स्थापन केला आणि मुंबईत Indian People's Theatre Association (I.P.T.A.) असा एक ग्रुप १९४२, १९४३ दरम्यान सुरू झाला. त्यातून खरे समाजवादी चित्रण सुरू झाले.

विभूतिभूषण बंद्योपाध्यायच्या पाथेर पांचाली, अरण्यक साहित्यापासून माणिक बंद्योपाध्याय, सत्यजित रे, ऋत्विक घटक, बिमल रॉय, रामकिंकर बैज, सोमनाथ होर यांच्या कलासाहित्यात इथलं वास्तव चित्रण होतेच. कम्युनिस्ट विचाराच्या प्रत्यक्ष क्रियाशील असलेल्या सोमनाथ होर, चित्ताप्रसाद, गोपाळ घोष, गोवर्धन अश, ज़ैनुल आबेदिन यांनी समाजवाद अतितीव्र केला.



राजकारण आणि समाजवाद इथल्या समूहाला बदलणाऱ्या दोन शक्ती आहेत हे चित्ताप्रसाद भट्टाचार्य आणि ज़ैनुल आबेदिन यांनी जाणून आपल्या कलेचा केंद्र या दोन शक्तींवरच केला. १९४३च्या बंगालच्या दुष्काळावर लक्ष केंद्रित करून रामकिंकर बैज, सोमनाथ होर, गोपाल घोष, चित्ताप्रसाद आणि ज़ैनुल आबेदिनने 'Famine Bangal' म्हणून या विदारक गोष्टीसाठी चळवळच उभी केली. त्यातून चित्ताप्रसाद भट्टाचार्य आणि ज़ैनुल आबेदिनने याच विचाराचे सातत्य ठेवले. चित्ताप्रसाद आणि ज़ैनुल आबेदिन यांची निर्मिती, शैली, आशय एकच असल्याने हा जुळा विचार परस्पराला बळ देत राहिला.

देशाची फाळणी करूनच भारतीय स्वातंत्र्य मिळाले. राजकीयदृष्ट्या मिळालेले स्वातंत्र्य सामाजिकदृष्ट्या विदारक यातना देणारे होते. या फाळणीने चित्ताप्रसाद भारतात राहिले आणि ज़ैनुल आबेदिन पाकिस्तानात गेले. एक शक्ती अशी विभागली. भारतीय समाजवादाचे तीव्र चित्रण करणारा चित्रकार भारतापासून अनोळखी झाला.

ब्रिटिश इंडियन, नंतर पाकिस्तानी आणि शेवटी बांगलादेशी अशी आपल्या नागरिकत्वाची ओळख ज़ैनुल आबेदिनला करून द्यावी लागते. आपल्या कलेची मुळं भारतातच ठेवून बांगलादेशाच्या कला विस्तारासाठी ज़ैनुल आबेदिनने कला संस्था स्थापन करून बांगलादेशी चित्रकलेचा विस्तार केला.

लोककलेची ओढ असलेल्या ज़ैनुलवर सुरुवातीच्या काळात यामिनी रॉयचा प्रभाव होता. लोककलेपेक्षा प्रत्यक्ष ग्रामीण जीवनातच एकरूप झाल्याने लोकपरंपरा आणि यामिनी रॉयचा प्रभाव संपून प्रत्यक्ष ग्रामीण जीवनातले अनुभव त्याच्या चित्राचे विषय झाले. ग्रामीण जीवनातले दारिद्र्य, यातना अशा समान अनुभवाने तो रामकिंकर बैज, सोमनाथ आणि चित्ताप्रसाद यांचा समविचारी चित्रकार झाला. परस्परांच्या बळाने हे चित्रनिर्मिती करत. त्यातल्या त्यात चित्ताप्रसाद आणि ज़ैनुल हे एकाच वयाचे, एकाच विचाराचे चित्रकार होते. चित्राची शैली ही समसमान.

ग्रामीण परिसर. त्यातून तिथं पडलेल्या दुष्काळाने हा परिसर विध्वंसक झाला. ज़ैनुल आबेदिनने या परिसराच्या जाणिवा मानवी आकारातून टिपल्या. फक्त माणूसच त्याचे लक्ष्य नव्हते. बेचिराख करणाऱ्या परिसराचा चेहरा माणूस प्राणी याच्या माध्यमातून तो टिपत होता.

परिसरात राहून परिसराला प्रतिकार करणे शक्य नसते. परिसर आपल्याला व्यापून असतो. हवा, पाण्याने आपल्या आत आणि भौतिक रूपात बाहेर असा घन आणि द्रव्य रूपात परिसर व्यापल्याने आपले अस्तित्व क्षीण असते. ज़ैनुल चित्रातले आकार अशाच क्षीण रेषेने दाखवून रेषेच्या आत बाहेर एकच अवकाश असते, हे दाखवून देतो.

छाया-प्रकाशाने वस्तुला घनरूप येते. घनरूपातली वस्तू परिसरात आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवते. ज़ैनुलच्या चित्रात छाया-प्रकाश नसल्याने कुठलाही आकार घनरूपात नसतो, परिसरात एकरूप झालेला

असतो. ज़ैनुल आबेदिनच्या चित्रातले आकार परिसरापेक्षा वेगळे अस्तित्व दाखवत नाही. परिसरावरच कोरलेल्या त्या आकृत्या आहेत. म्हणून रेषा अनिवार्य असते तरी परिसर अखंड राहतो.

मानवी मनातले उत्कट भाव चेहऱ्यावर उमटतात. मानवी आकारात आत-बाहेर व्यापलेला परिसरच ज़ैनुल आबेदिनच्या निर्मितीचा उद्देश असल्याने माणसाच्या उत्कट भाव दाखवणाऱ्या चेहऱ्यापेक्षा परिसराचे मूर्त रूप म्हणून मानवी आकृती ज़ैनुल दाखवतो.

साधारणपणे चित्रात रंग, रेषा, आकार हे घटक असतातच. चित्रात जेवढे घटक तेवढ्या मित्तीने आशय प्रगटतो. कमीत कमी घटकाने आशयही एकांगी असतो. कमीत कमी तपशिलातला आशय थेट पोहचतो. ज़ैनुलला परिसराचा तपशील नोंदवायचा असल्याने रेषा हीच महत्त्वाची ठरते. नोंदी आपण लेखन, आलेखन, अंकन किंवा रेखांकन करूनच ठेवतो. विध्वंसक काळाच्या पाऊलखुणा म्हणूनच ज़ैनुलची चित्रं आहेत, 'कला' म्हणून नाही.

प्रत्येक रंगाला त्याच्या आत त्याचा त्याचा काळोख असतो. म्हणूनच शुद्ध रंग एक-दुसऱ्यात मिसळले की गडद होतात. रंगाच्या मिश्रणातून हा गडदपणा वाढत जाऊन त्यातला काळोख वाढत जातो. शेवटी हा काळोख काळ्या रंगात प्रगटतो. परिसराची उदासीनता केवळ काळ्या रेषेतून तोलता येते हे ज़ैनुलच्या चित्राचित्रातून दिसते.

प्रत्येक रंगाला त्याचे त्याचे अंगभूत सौंदर्य असते. तो परिपूर्ण असतो. त्याला कलाकृतीत आशयाच्या अंगाने सामावून घेतला तरी कलाकृतीतला आपला आशय देऊन तो पुन्हा तो स्वत:ची भासमयता राखतोच. रंग हा कायमच भास आभास देत राहतो. ज़ैनुलला आपली कलाकृती त्याच्या जाणिवा परिपूर्णपणे व्यक्त करणारी हवी असते. भास आभास हा त्याच्या कलाकृतीचा स्वभाव नाही.

प्रत्येक शरीराला त्वचा असते. त्वचेला त्याचा त्याचा रंग असतो. त्वचा सजीव आणि तेजस्वी ठेवणारे शरीरात काही रस असतात. निरस आणि विरक्त होऊन त्याची त्वचा ही निर्जीव आणि रंगहीन होते. परिसराला त्याचं त्याचं म्हणून सौंदर्य असतं. ते सौंदर्य तिथल्या अनेक घटकांच्या अभिसरणातून तयार होतं. या सौंदर्यातूनच परिसर आपल्या ओळखीचा होतो. अनेक घटकांतून तयार झालेले सौंदर्य हे त्या परिसराचे बाह्यांग आहे. म्हणजेच त्याची त्वचा आहे. परिसराची ही त्वचा त्याचे बाह्य सौंदर्य टिकवणारे घटक निर्जीव आणि शुष्क होत गेले की परिसरही रंगहीन होतो. त्वचा हरवून तो कुरुप दिसायला लागतो. ज़ैनुल आबेदिनचा परिसर असाच त्वचाहीन आणि कुरुप असल्याने तो तशाच मानवी आकारातून मांडतो. त्याच्या कलाकृतीत रंग नसतात. शेवटी रंग ही कलाकृतीची कांतीच आहे.

अशक्त आणि निर्जीव होत जाणारी वस्तू जमिनीकडेच ओढली जाते. ज़ैनुल आबेदिनच्या चित्रातले आकार असेच झुकलेले आणि जमिनीला समांतर पडलेले असतात. अशा जमिनीवर सांडत गेलेल्या मानवी आकाराजवळ, कुत्रे आणि कावळ्यांची प्रतीकात्मक रचना चित्रात असते. कुत्र्या कावळ्यांच्या प्रतीकात्मक रचनेने विदारक दृश्य तयार होते. ज़ैनुल आबेदिन चित्र रचना कलाकृतीसारखी अवकाश, आकार, तोल, ताल या जाणिवेतून करत नाही. त्या सहज पाहिलेल्या, जाणवलेल्या अनुभवाच्या नोंदी असतात.

ज़ैनुल आबेदिनच्या चित्रातले प्राणी प्रतीकात्मक असतात. मानवी आकाराबरोबर कावळ्या, कुत्र्यांची रचना ही मानवी वेदनेची तीव्रता वाढवते. तशी बैलाची प्रतिमा ज़ैनुलच्या चित्रात पुन्हा पुन्हा येते. कुठले तरी अदृश्य ताण आणि ओढ या प्रतिमेतून जाणवतात.

निसर्गाला चिटकूनच असलेले शेतकरी जीवन निसर्गाला प्रतिकार करू शकत नाही. झाडा-झुडपासारखे निसर्गाच्या गतीनेच ते संपते. रानटी निसर्गापेक्षा शेतीच्या माध्यमाने माणूस आणि निसर्ग एकरूप झालेला असतो. निसर्ग जेव्हा हिंसक होतो तेव्हा माणसाचं जीवनही कुरूप होऊन जातं. ज़ैनुल आबेदिनच्या चित्र नोंदी या अशाच निसर्गाच्या गती स्थिरावल्याच्या आहेत. झैनुअल अब्दीनच्या चित्रात काळ दर्शवणारी काही चिन्ह रचना म्हणून मानवी आकार, पशू आणि पक्षी चित्रात येतात. म्हणून ही चित्रं निसर्गाची नाहीत, माणसाची नाहीत. ही केवळ निसर्ग आणि माणसाचं जीवन कुरूप करणाऱ्या काळाची आहेत.

●

# बाजीराव-मस्तानी : जात-पितृसत्तेने लादलेले मृत्युपर्व




**इनायत परदेशी**

दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी प्रदर्शित झालेल्या बाजीराव मस्तानी' या चित्रपटावर ब्राह्मण्यवादी संघटनांनी आक्षेप घेतला. या संघटनांचे म्हणणे होते की, बाजीरावच्या (पहिला बाजीराव पेशवा : इ.स. १८ ऑगस्ट, १७०० ते इ.स. २८ एप्रिल, १७४०)[१] चरित्राचे या चित्रपटातून विकृत दर्शन घडते. मात्र या संघटनांचे खरे दुखणे म्हणजे बाजीरावच्या त्याची मुस्लीम पत्नी मस्तानीप्रति प्रेमाचे दर्शन व बाजीरावास पुण्यातील तत्कालीन ब्राह्मणशाहीने दिलेला प्रचंड त्रास, मस्तानीचा मुस्लीम म्हणून झालेला, ब्राह्मणशाहीने केलेला छळ हे चित्रपटातून सत्यरीत्या आणि स्पष्टपणे प्रदर्शित केलेले आहे, हे आहे. कारण तत्कालीन ब्राह्मणशाहीस मुस्लीम स्त्री ही रक्षा/रखेल म्हणून मान्य आहे. परंतु ती पत्नी म्हणून मुळीच मान्य नाही. मस्तानीला वैध पत्नीचा दर्जा मिळावा, यासाठी बाजीरावने केलेला संघर्ष, ब्राह्मणशाहीचा बाजीराव-मस्तानीच्या नात्यास होणारा विरोध याचे सत्य, यथार्थ चित्रण हा चित्रपट करतो. ब्राह्मणी पितृसत्ता, भारतीय जातिव्यवस्था, पुरुषसत्ता, स्त्रियांच्या शोषणातील तीव्रतेने विविध स्तर आणि आंतरछेदितता तसेच त्यांना असणारे सद्यकालीन जमातवादाचे संदर्भ यांची यानिमित्ताने चर्चा होणे गरजेचे ठरते.

चित्रपटात बाजीराव (रणवीरसिंग), मस्तानी (दीपिका पदुकोण), राधाबाई (तन्वी आझमी), काशीबाई (प्रियांका चोप्रा), शाहूराजे (महेश मांजरेकर), चिमाजी (अभय तत्त्ववादी) यांनी भूमिका केल्या आहेत. संजय लीला भन्साळी हे दिग्दर्शक आहेत. या चर्चेची पार्श्वभूमी बाजीराव, मस्तानी यांची व्यक्तिमत्त्वे, त्यांच्यावरील प्रभाव आणि त्यांचे समकालीन संदर्भ यांवर आधारित आहे.

मस्तानीप्रति इतिहासकारांनी फारच थोडी माहिती उपलब्ध करून दिलेली आढळते. मस्तानी ही प्रणामीपंथीय होती. ती बुंदेलखंडचा हिंदू

ईमेल : inayat.pardesi@gmail.com

राजा छत्रसाल याला त्याची मुस्लीम पत्नी रुहानी बेगम हिच्यापासून झालेली होती. छत्रसाल हा प्रणामीपंथीय असल्याने त्याच्या कन्येने- मस्तानीनेही प्रणामी पंथ स्वीकारला होता.

प्रणामी पंथ हा इ. स. १६ व्या शतकात देवचंद्र याने एकेश्वरवादी कृष्णभक्तीच्या विचारांनी प्रभावित होऊन स्थापन केला. हा पंथ मेहराज पंथ, महाराज पंथ, चकल पंथ, धाम संप्रदाय इ. नावांनीही ओळखला जातो. हा पंथ हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कर्ता होता. 'कुल्लझम' हा ह्या पंथाचा मुख्य धर्मग्रंथ होय.[२] या धर्मग्रंथात अरबी, फारसी, हिंदी, सिंधी, गुजराती शब्दाचा भरपूर भरणा आहे. मस्तानीच्या नावालाही एक सूफी संदर्भ आहे. तर बाजीराव हा चित्पावन ब्राह्मण असून छत्रसालावर महंमद बंगश या मुघल सरदाराने आक्रमण केल्यानंतर त्याने बंगशला हरविले. बाजीरावाने छत्रसालास याप्रकारे मदत केली. या मदतीची व दोस्तीची आठवण म्हणून छत्रसालाने त्याची औरस कन्या मस्तानीचा विवाह बाजीरावाशी लावून दिला. छत्रसालाचा प्रणामीपंथीय निधर्मी दृष्टिकोन ध्यानात घेतला तर यवन उपपत्नीपासून झालेल्या मस्तानीस 'अनौरस' समजणेही गैर ठरते.[३] मस्तानीस छत्रसालाने दिलेले युद्धप्रशिक्षण तिच्या औरस दर्जाची साक्षच ठरते. चित्रपटातही तिचे युद्धकौशल्य दिसून येते. 'तारीखी महंमदशाही'त विधान आहे की, मस्तानी कंचनी असून ती अश्वरोहणात विशेष कुशल होती. बाजीरावांप्रमाणेच तलवार, भाला घेऊन ती त्याजबरोबर भरघाव घोडदौड करी. त्या तीव्र वेगात उभयतांच्या रिकिबी यत्किंचित मागेपुढे होत नसत. मोहिमांत ती बाजीरांबरोबर हजर असे; हे वर्णन रियासतकार सरदेसाई देतात.[४] चित्रपटातही वरील बाबींचे चित्रण ॲक्शन सीन्स म्हणून आलेले आहे. मात्र चित्रपटाच्या सुरुवातीस काही चुका आढळतात. उदाहरणार्थ - १. बाजीरावाने छत्रपती शिवाजीच्या राज्यास 'हिंदू स्वराज्य' म्हणणे. कारण तत्कालीन लढा हा धार्मिक संघर्ष नसून राजकीय संघर्ष होता. तसेच हा संघर्ष प्रादेशिक सत्ता विरुद्ध साम्राज्यवादी केंद्रीय सत्ता असा होतो. शिवाजीने कधीही हिंदू धर्माच्या नावावर सैन्यसंघटन वा राज्यविस्तार केला नाही.

२. चित्रपटातील दुसरी चूक म्हणजे बाजीरावाने छत्रसाल राजास मदतीचा निर्णय घेताना 'एका हिंदू राजाने दुसऱ्या हिंदू राजास मदत केली म्हणून छत्रपती शाहू खूष होतील' असा संवाद आहे. या ठिकाणी पुन्हा तत्कालीन संघर्ष हा हिंदू विरुद्ध मुस्लीम असा नसून तो राजकीय होता, हेच सांगावेसे वाटते. मात्र चित्रपटाची पुरोगामी, जमेची बाजू म्हणजे ब्राह्मण्यावरील हल्ला. हा हल्ला दृश्ये व संवाद यातून केलेला आहे. विशेषतः कृष्णाजी भट व बाजीराव यांचा संघर्ष दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांनी अचूकरीत्या मांडला आहे. कृष्णाजी भट हा पुण्याच्या भटाचा नेता, जातिव्यवस्थापक, पुरुषसत्ताक व जमातवादी मानसिकता असणारा आहे. याउलट ब्राह्मण बाजीराव आणि मुस्लीम मस्तानी हे नाते प्रेम मूलतःच पुरोगामी, सर्वधर्मसमभाववादी, हिंदू-मुस्लीम राजकीय ऐक्य व सहजीवनाचे प्रतीक ठरणारे आहे. एका दृश्यात मस्तानी बाजीरावाच्या काशीपासून झालेल्या पुत्राला नामकरण प्रसंगी भेटवस्तू द्यायला येते, तेव्हा चिमाजी आप्पा हा बाजीरावचा बंधू तिच्याशी शाब्दिक चकमक करतो. तिला परकीय लेखत हिरव्या रंगास विष संबोधतो. कृष्णाजी भट मस्तानीस 'तू दर्गा व दुर्गा यातील फरक विसरली आहेस काय?' असा प्रश्न विचारतो. यास प्रत्युत्तर देत मस्तानी 'धर्माला रंग मानवाने दिला व रंगाचा धर्म नसतो. दुर्गे सही हिरव्या रंगाचा चुडा-बांगड्या शालू अर्पण करतात. दर्ग्यावर भगव्या रंगाची चादर चढवतात' असे चोख प्रत्युत्तर देते.

चित्रपटाची दुसरी बाजू म्हणजे तत्कालीन धर्मसत्ता व राजसत्ता यांतील संघर्ष होय. सल्तनत काळात अल्लाउद्दीन खिलजी विरुद्ध इस्लामी उलेमा, शिवकाळात शिवाजी राजेविरुद्ध ब्राह्मण अमात्य, संभाजींचा शाक्त पंथ विरुद्ध ब्राह्मणी छावणी असे संघर्ष होते. पेशवाईच्या प्रारंभी पहिल्या बाजीरावाने मस्तानीवरील प्रेमापोटी का होईना धर्मसत्तेशी पर्यायाने ब्राह्मणशाहीशी संघर्ष केला. या संघर्षाचे स्वरूप व्यक्तिगत जरी असले तरी त्याला व्यापक राजकीय पैलू आहेत. भारतीय जातिव्यवस्थापक ब्राह्मणी सनातन धर्माच्या जमातवादास यात बाजीराव आव्हान देतो. हे आव्हान देताना एक बाब लक्षात येते, ती म्हणजे ब्राह्मण असूनही ब्राह्मणशाहीने त्याची कुठेही गय केलेली नाही. कृष्णाजी भटाचा जेव्हा मस्तानी महालावरील हल्ला बाजीराव अपयशी करतो, त्यावेळी कृष्णाजी भटाला ब्राह्मण असणाऱ्या श्यामभटाच्या हत्येपोटी कैद

केल्याचे दृश्य आहे. या दृश्यातील संवादात कृष्णाजी भट बाजीरावास म्हणतो की, 'त्या यवनीचे (मस्तानीचे) भाग्य चांगले म्हणून ती बचावली. नाहीतर धर्माच्या नावावर तुझेही तुकडे झाले असते.' बाजीराव यावेळी कृष्णाजी भटावर चालून जातो. परंतु बाजीरावाच्या आई राधाबाई मध्यस्थी करून कृष्णाजी भटास वाचवतात. ह्या प्रसंगात ब्राह्मणशाही, सनातन धर्म यांच्या कुटुंबसंस्थेवरील प्रभाव आणि विशेषत: या धर्माच्या पुरुषसत्तेने, पितृसत्तेने स्त्रियांना त्याचे वाहक कसे बनविले आहे, याचे दर्शन घडते. कुटुंबसंस्थेने सनातन धर्म, ब्राह्मणशाही यांचे वाहक बनणे, कुटुंबातील स्त्रियांनी त्यासाठी पुढाकार घेणे इ.चे दर्शन ह्या चित्रपटात आहे. धर्मसंस्था-जातिसंस्था-कुटंबसंस्था या परस्परसंबधित असल्याने आणि कुटुंबाशी जैविक नाते असल्याने बाजीरावास स्वतःच्या आईपुढे तात्कालिक माघार घेत कृष्णाजी भटास सोडून द्यावे लागते. राधाबाई ही विधवा, केशवपन झालेली आहे. परंतु ती पेशव्यांच्या (ब्राह्मण) वंशशुद्धतेची रक्षक आहे. कारण जात-पितृसत्तेने तिला हीच भूमिका योग्य असल्याचे तिच्या बालपणापासून संस्कारीकरण केलेले आहे. पितृसत्ता, पुरुषसत्ता ह्या स्त्रियांमध्येही परस्परांत स्पर्धेची भावना उभी करतात. ही स्पर्धा त्यांच्या पिता, पती, पुत्र इ.च्या दर्जावर अवलंबून असते. त्यामुळे स्त्रिया बहुतांशी पितृसत्तेच्या, पुरुषसत्तेच्या, जातिव्यवस्थेच्या नियमांना संरक्षित करतात. मस्तानी विरुद्ध राधाबाई, काशीबाई या संघर्षात वरवर पाहता राधाबाई खलनायक ठरते. परंतु त्यामागील पुरुषसत्तेचा, जातिव्यवस्थेचा डाव लक्षात घ्यायला हवा.

चित्रपट ब्राह्मण स्त्रीच्या दु:खावरही प्रकाश टाकतो. या दु:खासही अनेक पैलू आहेत. ब्राह्मण स्त्रियांचे बालविवाह, अकाली वैधव्य, वयात येण्यापूर्वी होणारे लैंगिक शोषण, पतीचे इतर स्त्रियांना उपवस्त्र म्हणून ठेवणे, पातिव्रत्याच्या कल्पना इ.पासून ते पेशव्यांच्या मोहिमावेळी (दीर्घकाळच्या मोहिमा) स्त्रियांचे होणारे लैंगिक दमन, पेशव्यांच्या कुटुंबातील पुरुषांचे अत्यल्प आयुर्मान इ. पैलू पेशवे-ब्राह्मण स्त्रियांच्या दु:खाचे आहेत. राधाबाई विधवा असल्याने त्यांची सावली व दर्शनही समाजासाठी वर्ज्य मानले आहे, याची प्रचिती मस्तानीला जेव्हा राधाबाई भेटायला येतात, तेव्हाच्या दृश्यात येते. चार स्त्रिया राधाबाईभोवती कापडाचा पडदा घेऊन सतत फिरताना दाखविल्या आहेत. मात्र तरीही राधाबाई ब्राह्मणी पितृसत्तेच्या समर्थकच ठरतात. कारण त्यांनी पेशव्यांच्या तथाकथित वंशशुद्धी व वंशश्रेष्ठत्वाला दिलेला पाठिंबा होय. चित्रपटात राधाबाईंच्या अशा वर्तनाच्या कारणमीमांसेच्या चित्रणास अधिक वाव द्यायला हवा होता. चित्रपटातील एका संवादात मस्तानीस राधाबाई म्हणते की, 'राजपूत व मुघलांमध्ये विवाह होत असतील. परंतु पेशव्यांचे रक्त शुद्धच ठेवले जाईल.' यावरून तत्कालीन पितृसत्ता, वंशशुद्धीच्या संकल्पना किती संकुचित होत्या, याची जाणीव होते. इथे प्रश्न हा उद्‌भवतो की, पेशवे ब्राह्मण होते म्हणून असे घडले काय? तर याचे उत्तर 'नाही' असे आहे. कारण कोणत्याही धर्मात, जातीत स्त्रियांना त्या त्या धर्म-जातीच्या पितृसत्ता, वंशशुद्धी यांचे वाहक बनावे लागते. हे वाहकत्व लादलेले असते. इंग्लंडच्या राजघराण्यातील प्राचीन, मध्ययुगीन काळातील विवाह असोत की, स्त्रियांची पुरुषाच्या धर्मात धर्मांतरित करून झालेले विवाह असोत, येथे वंशशुद्धी, स्ववंशश्रेष्ठत्वाची भावना काम करते. राजपूत स्त्रिया व मुघल मुस्लीम पुरुष या नात्यांमध्ये स्त्रीला पत्नीचा दर्जा व सन्मान होता. पण ही नातीही राजकीयदृष्ट्या त्या स्त्रीवर लादलेली धर्मांतरे असलेलीच होती. तिची मर्जी लक्षात घेतली गेलेली नव्हती. ब्राह्मणी पुरुषसत्ता व जातिव्यवस्था यांची लागण इस्लामलाही झाली. विजयनगर व इतर शाह्यांच्या संघर्षात हिंदू स्त्रियांना जनानखान्यात जावे लागणे (जबरदस्तीने) आणि हिंदू राज्यांच्या मुस्लीम उपवस्त्रांना वैध दर्जा न मिळणे यातून ह्या ब्राह्मणी पितृसत्ता, पुरुषसत्तेची भीषणता लक्षात येते. वैधताही पुरुषाच्या धर्मावर, त्याच्या तिला पत्नी म्हणून मिळणाऱ्या मान्यतेवर ठरते. तसेच बाबराने राणासंगविरुद्ध लढताना 'मैने दारूल हर्ष को दारूल इस्लाम बना दिया' हे विधान जमातवादाचीच साक्ष देते.[५] तसेच विजयनगरचा हेमाद्री पंडिताने चक्रधराच्या शिष्यांची कत्तल करणे, हेदेखील त्याचेच प्रमाण (जमातवादाचे) ठरते. यावरून हे स्पष्ट होते की, कोणत्याही धर्माचे राज्यकर्ते शोषणासाठी 'धर्म खतरे में है'चा आधार घेतात. 'ब्राह्मणी' या संकल्पनेचा अर्थ म्हणजे जातवर्ण स्त्रीदास्याचे समर्थन करणारी परंपरा होय. या परंपरेस ब्राह्मणी म्हणण्याचे कारण म्हणजे भारतीय अखंडता शोषणास व त्याच्या शोषकव्यवस्थेत प्रारंभ 'ब्राह्मण' वर्णाने (जातीने नव्हे)

केला. या ब्राह्मण वर्णातील (या वर्णात सर्व समूहांतील बुद्धिमान लोक असत. सुरुवातीस त्यात अनार्य बुद्धिमान व्यक्तीही असत.) लोकांनी चातुर्वर्ण्यव्यवस्था बंदिस्त करत जातिव्यवस्थेचा व त्या अनुषंगिक शोषणाचा पाया रोवला. शोषकव्यवस्थेचा प्रारंभ या ब्राह्मण वर्णापासून झाल्याने ही व्यवस्था व तिची प्रतीके ब्राह्मणी ठरतात. तसेच हा वर्ण शुद्ध राहिला नसल्याने (वर कंसात दिलेल्या कारणामुळे) तो शब्द जातीवाचक ठरत नाही. तर तो परंपरा व व्यवस्थावाचक ठरतो.[६]

चित्रपटात ब्राह्मणी व्यवस्थेच्या काही अंगांवर हल्ला असला, तरी चित्रपटाच्या काही मर्यादाही आहेत–

१. चित्रपटात मस्तानी विरुद्ध राधाबाई असा संघर्ष दृश्यमान होतो. परंतु या संघर्षामागील जात–पितृसत्ता, पुरुषसत्ता, व्यवस्थेने स्त्रियांवर लादलेले सुप्रजनन व त्यासाठीचे संस्कारीकरण यांचे चित्रण चित्रपट करत नाही. तसे केल्यास ब्राह्मणी धर्मसमर्थक संघटनांनी स्वतंत्र 'सेन्सॉरशिप' लादण्याचा धोका होता.

२. बाजीराव–मस्तानीचा पुत्र समशेर बहादूरचा संघर्ष (ब्राह्मणी व्यवस्थेशी) चित्रपटात दाखवायला हवा होता. कारण पुण्यातील भटशाही त्याला अनौरस मानत होती.

३. चित्रपटात मस्तानी महल शनिवारवाड्यात बांधलेला दाखविला आहे. परंतु प्रत्यक्षात तो शनिवारवाड्याशेजारी आहे.[७] कौटुंबिक दबावामुळे बाजीराव मस्तानीला शनिवारवाड्यात आणू शकला नव्हता. तसेच मस्तानीस नर्तकी म्हणणेही योग्य नाही. कृष्णभक्ती मानणाऱ्या प्रणामी पंथातील असल्याने उत्सवप्रसंगी तिने भक्तिमय नृत्य केले असणे शक्य आहे. परंतु चित्रपट तिच्या शृंगारमय नृत्यावर भर देऊन तिचे महत्त्व कमी करतो.

४. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीपासून पेशवाईने दलितांवर केलेले अत्याचार याचे चित्रण चित्रपटात हवे होते. कारण त्याविना पेशवाईचा शूद्रातिशूद्र, अस्पृश्य व स्त्रियांप्रतीचा दृष्टिकोन स्पष्ट होत नाही. बाजीरावांच्या अकाली निधनानंतर पेशवाई अधिकच कर्मठ झाली. ब्राह्मणशाहीचे राजसत्तेवर वर्चस्व वाढले. मस्तानीच्या वारसांना कशी वागणूक मिळाली याचे चित्रण देणे गरजेचे होते. बाजीरावाच्या निधनानंतर अकस्मात मस्तानीचाही मृत्यू झाला. तेव्हा त्यांचा सात–आठ वर्षीय पुत्र समशेर (मुस्लीम धर्मीय–आईचा धर्म लागू असलेला) कसा वाढला, ब्राह्मणशाहीशी स्वतःच्या हक्कासाठी तो कसा लढला याचे चित्रण, छत्रपती शाहूंचा मस्तानीस पाठिंबा (बाजीरावच्या मर्जीखातर) याचे अधिक चित्रण चित्रपटात हवे होते. सामंतशाहीत राजकीय सत्तासंवर्धनाचा हेतू प्रबळ ठरू शकतो व धर्मांधतेवर मात करू शकतो, हे शाहूंचे धोरण होते.

**चित्रपटातील प्रभावी बाजू–**

बाजीराव व कृष्णाजी भट यांचा वाद व त्यातून बाजीरावाने समशेरला त्याची माता मस्तानीचा धर्म देणे, बाजीरावाने समशेर व कृष्णा (बाजीरावाचा काशीबाईपासून झालेला पुत्र) यांची सोबत देखभाल करणे, त्यांच्यावर हिंदू–मुस्लीम दोन्ही धर्मांतील संस्कार करणे, बाजीरावाने ईद मनविणे या गोष्टी प्रेक्षकांवर जबरदस्त प्रभाव टाकतात.

**या चित्रपटाच्या निमित्ताने काही प्रश्न पुढे येतात–**

१. मस्तानीबाबत पेशवे दप्तरात एवढी कमी कागदपत्रे का उपलब्ध आहेत? तत्कालीन दरबारी घडामोडी, अखबारात लिहिणाऱ्यांचा उद्देश मस्तानीला अनुल्लेखाने संपविणे हा होता काय?

२. मस्तानीचा खरा इतिहास मांडला तर जातिव्यवस्था, जमातवाद, पुरुषसत्ता, स्वसमूह श्रेष्ठत्व यांचे घाणेरडे मिश्रण पुढे येते. म्हणून इतिहासकारांनी मस्तानीचा असत्य इतिहास रंगविला काय?

३. मस्तानीचा इतिहास नकारात्मकरीत्या रंगविण्यात आल्याने इतिहासकारांनाही त्यांच्या ब्राह्मणी जाणीव–नेणिवेपुढे गुडघे टेकावे लागले काय?

**'बाजीराव–मस्तानी' व माध्यमे**

पु. ना. गाडगीळ या दागिने बनविणाऱ्या कंपनीच्या जाहिरातीत फक्त प्रियांका चोप्रालाच काशीबाईच्या भूमिकेत दाखविण्यात आले. या जाहिरातीत मस्तानीला जागा नव्हती. कारण मस्तानीस आजही समाजमान्यता खोट्या इतिहासलेखनामुळे मिळालेली नाही. तसेच मुस्लीम हा मोठा ग्राहकवर्ग नसल्याने इस्लामी कलाकुसर, दागिने हे चलनात नाहीत. म्हणजे जात–पुरुषसत्ता–जमातवाद हे कला, सौंदर्यशास्त्र, साहित्य यांवर जागतिकीकरणात वरील पद्धतीने प्रभाव गाजवितात. मस्तानीस इतिहासात असत्यरीत्या रक्षा/रखेल/नाटकशाळा संबोधल्याने तिला

समाजमान्यता नाही. (मस्तानीप्रमाणे दागिने वापरणे, म्हणजे मस्तानीसारखी बनणे (रक्षा/नाटकशाळा इ.) असा भयगंड व्यवस्था आजही विशेषत: उच्च जातवर्गीय स्त्रियांमध्ये पोसते. मस्तानीचे दागिने भारतीय स्त्रियांत अशी कोणती प्रतिमाने उभी करतात? बाजीरावाच्या रक्षेचे दागिने, बिनलग्नाच्या रखेल बाईचे दागिने, ब्राह्मणी पितृसत्तेने व कुटुंबसंस्थेने तुच्छ लेखलेले दागिने असे समीकरण 'घरंदाज' स्त्रियांच्या मनात येते. म्हणून पु. ना. गाडगीळच्या जाहिरातीत काशीबाई व तिचे दागिनेच प्रदर्शित होतात. काशीबाईचे दागिने म्हणजे काय? ब्राह्मणी उच्च जातीच्या स्त्रीचे दागिने, वैधविवाहित स्त्रीचे-पतिव्रता स्त्रीचे दागिने, तसेच राजसत्तेचे सर्वश्रेष्ठत्व संपादन करणाऱ्या पुरुषाच्या पत्नीचे दागिने अशा प्रतिमा आजच्या उच्चजातवर्गीय स्त्रियांच्या मनात असतात. म्हणून अलंकारविभूषित काशीबाई विरुद्ध अलंकारविभूषित मस्तानी अशा द्वंद्वात जाहिरात एजन्सी काशीबाईच्या अलंकारांना निवडते. पातिव्रत्य दागिन्यांनाही रूप देते. काशीबाईचे दागिने हे हिंदू कलापरंपरेतील असून मस्तानीचे दागिने मुस्लीम आहेत. कलेवरील धार्मिक प्रभाव लक्षात घेता, ह्या स्पर्धेत माध्यमे भांडवलदार ब्राह्मणी- भांडवली प्रतीके पुढे आणू पाहतात.

**मस्तानी व इतर योद्धा स्त्रिया यांत मस्तानीचे वेगळेपण**

मस्तानीपूर्वी मध्ययुगीन भारताच्या इतिहासात काही योद्धा, कारभारी स्त्रिया होऊन गेल्या. परंतु या स्त्रियांना राजमान्यता व समाजमान्यता होती. रझिया सुलतानला पित्याच्या इच्छेचे पाठबळ होते. परंतु मस्तानीस समाजमान्यता व राजकुटुंबीयांची मान्यता नव्हती. माहेरहून पाठिंबा असूनही पेशवे कुटुंबीय व चिमाजीआप्पाच्या जमातवादापुढे बाजीराव-मस्तानीस नमते घ्यावे लागते. मात्र त्यांचा संघर्ष मोठा व कडवा ठरलास याचे चित्रण चित्रपट करतो.

चित्रपटात मस्तानीला नानासाहेबाने कैद केले म्हणून बाजीरावाने झुरत मृत्यू पत्करला, असे धाडसी चित्रण आहे. एकूणच एका स्त्रीसाठी योद्धा पुरुषाने झुरत जाणे हे पुरुषसत्ता, मर्दानगीच्या तत्कालीन कल्पना, पितृसत्ता यांच्याविरुद्ध आहे. परंतु हे दाखविण्याचे धाडस दिग्दर्शक भन्साळीने केले आहे. मात्र बाजीराव-मस्तानीचे लग्न झाले नाही (धर्मविधिसंमत) असे चित्रपटात दाखवले आहे. परंतु द. ग. गोडसे यांच्या लेखनाद्वारे हे स्पष्ट होते की, बाजीराव व मस्तानीचा छत्रसालाने विवाह लावून दिला होता आणि बाजीरावाने निधर्मी दृष्टिकोनाने प्रेरित होत व राजकीय मैत्रीचे प्रतीक म्हणून या विवाहास मान्यता दिली होती.[८]

सध्या कला, चित्रपट क्षेत्रात मध्ययुगीन प्रतीके, व्यक्ती यांचे फिल्मीकरण व त्यांचे राजकारण यांचा ट्रेंड आहे. याला काही करणे आहेत. यात काही प्रतीकांचे नूतनीकरणही घडते आहे. 'बाजीराव जातीने ब्राह्मण होता. परंतु आसपास कर्मठ ब्राह्मणशाही असूनही तो पुरोगामी होता' असा संदेश हा चित्रपट देतो. म्हणजे नव्या समाजातील सांस्कृतिक अभिजनांच्या वर्गीय आकांक्षांनुसार कथानक व व्यक्तिरेखा यांचे नवे रूपांतरण घडते आहे. हे आताच घडण्याचे कारण म्हणजे धर्मबंदिस्तता, एकपत्नीत्व, एकपतीव्रत यांना उचलून धरणारी मूल्यव्यवस्था होती. मात्र त्या मूल्यव्यवस्थेला छेद देणाऱ्या शक्ती आता उभ्या राहत आहेत. म्हणून आधुनिक सांस्कृतिक व्यवस्थेत व्यक्तीची प्रेमभावना, स्त्री-पुरुष संबंधातील सुखासीनता यांना मान्यता देणाऱ्या शक्ती उभ्या राहतात. भांडवली व्यवस्थेने मनोरंजनासाठी प्रेमसंबंधांना रंगबेरंगी अनेक रूपे दिली. तिचे पुरोगामीत्वाशी, जमातवादविरोधाशी मिश्रण करून दिग्दर्शकाने 'बाजीराव-मस्तानी'स न्याय दिला आहे.

●

**संदर्भ :**


१. सरदेसाई, गोविंद सखाराम; *मराठी रियासत : खंड ३,* नवीन संदर्भांसह संपादित आवृत्त, १९८९, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ५८४.

२. कदम, तानाजी बाबासो; *मस्तानी व मस्तानीचा धर्म,* लेख, ज्योती नियतकालिक व शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषदेचे १४ वे अधिवेशन, कुरुंदवाड ८ व ९ फेब्रुवारी, २००९, पृ. १३, १४.

३. गोडसे, दत्तात्रय, गणेश, *'मस्तानी',* पॉप्युलर प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९८९, मुंबई, पृ. ९.

४. सरदेसाई; *पूर्वोक्त,* पृ. ५८९.

५. जहिरूद्दिन महंमद बाबर, *बाबरनामा,* हिंदी अनुवाद - युगजीत नवलपुरी, साहित्य अकादमी, प्रथम संस्करण, पुनर्मुद्रण २००४, नई दिल्ली, पृ. ३५३.

६. परदेशी, इनायत; *'ब्राह्मणी' म्हणजे...,* परिवर्तनाचा वाटसरू, १ ते १५ मार्च २०१०, पृ. ३३.

७. गोडसे, *पूर्वोक्त,* पृ. ६.

८. गोडसे; *पूर्वोक्त,* पृ. १०. (या लेखनासाठी गायकवाड मॅडम, सचिन गरुड, रणजीत परदेशी यांच्याशी केलेली चर्चा उपयुक्त ठरली.)

# कोलमडून गेलेल्या सामान्य माणसाच्या 'जगण्याची गाथा'

**रफीक सूरज**

'जगण्याची गाथा' हा कवी मोहन कुंभार यांचा चंद्रकांत पाटील यांनी संपादित केलेला, मुंबईच्या लोकवाङ्मयगृह प्रकाशित, आरंभाच्या मालिकेतील ९० कवितांचा संग्रह. आपल्या अवतीभोवतीच्या, विशेषत: कोकणच्या सांस्कृतिक पर्यावरणातील बदलांचा विचार मांडणारी ही कविता. जागतिकीकरणामुळे सर्वसामान्य माणसांचं जीवन धोक्यात येऊन आणि पराकोटीचा संघर्ष करूनही शेवटी खूप हार ज्याच्या वाट्याला आली अशा या सर्वसामान्य माणसाच्या कोलमडून गेलेल्या 'जगण्याची गाथा' या कवितासंग्रहाच्या केंद्रस्थानी आहे.

या संग्रहाच्या सुरुवातीलाच कवीने 'शहरातल्या कोणत्याच रस्त्यावर उमटत नाहीत माझी पावलं' अशी भावना मांडली आहे. गावापासून दुरावलेली आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेत न रमणारी ही कैफियत संग्रहातील पुढच्या सर्व कवितांतून ठळक होत जाते. कवी वारंवार भूतकाळात रमण्याचा प्रयत्न करतो. गावाकडचा निसर्ग, जित्राब, घर, नातेसंबंध, रीतिरिवाज, झाडे अशा अनेक गोष्टी आठवत राहतो. त्याला या सर्व गोष्टींचे खूप अप्रूप वाटत राहते. पण हा सर्व गोतावळा त्याच्यापासून तुटत गेला आणि आपण खूप मोठे वैभव गमावल्याची खंत त्याला वाटत जाते–

*'सर्व घरभर काळाच्या स्वच्छ खुणा उमटलेल्या*
*आणि मी या सगळ्याला पोरका'* (पृ.१३)

बालपणात भोगलेल्या दारिद्र्यमय जीवनात आणि काबाडकष्टांतही एक प्रकारचा भरलेपणा जाणवत होता. पण उपजीविकेच्या शोधार्थ, नोकरीसाठी कवीला गाव सोडावे लागले. मग त्याच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे येत जातात. जागतिकीकरणाच्या रेट्यात सर्वत्र खूप मोठी उलथापालथ घडून येते आहे. गाव आणि शहर, दोन्हीकडे खूप मोठे


ईमेल : rafiksuraj@yahoo.com

बदल होत आहेत. नोकरीचे ठिकाण असलेल्या शहरात कवीचे मन रमत नाही. त्याला शहरी जीवनाचा उबग येत चाललाय. तर त्याच्या बालपणीचे गावही आता झपाट्याने बदललेय. बदलांमुळे शहर आणि गाव दोन्ही ठिकाणी कवीची बेचैनी वाढतेय. अधांतरी लोंबकळणाऱ्या शंकूगत त्याची अवस्था झालीय. गावाला अवकळा आल्याने भविष्यकाळाच्या चिंतेने गावातली शहाणी व्यावहारिक माणसे आता गाव सोडण्याच्या तयारीत आहेत, या विदारक सत्याची तीव्रता कवीला अधिकच अस्वस्थ करून टाकते. गाव सोडून शहरात आलेली माणसे गावाच्या ओढीने शहरात स्थिर होण्याचा विचार करीत नाहीत आणि गावात जगण्याचे वांदे झाल्याने गावाकडचे लोक गाव सोडण्याच्या मन:स्थितीत. अशा या दोन टोकांमधील ताण हे या कवितेतील मुख्य सूत्र आहे. अशा प्रकारचे द्वंद्व मराठी कवितेत खूपच कमी प्रमाणात आलेले आहे. दोन भिन्न काठावरची माणसे जोडण्याचे काम पूर्वी कोकणातील 'साकव' करीत असत.

*'साकवानं जोडली होती*
*दोन्ही तीरावरची माणसं*
*हीच माणसं जपायची*
*दोन्ही तीरावरची माणुसकी'* ( साकव/पृ.५९)

पण आता 'साकव' जाऊन नद्यांवर मोठमोठाले पूल बांधण्यात आले. दळणवळण खूप प्रमाणात वाढले. पण माणसे माणसंपासून तुटत गेली.

'जगण्याची गाथा'मध्ये काही व्यक्तिचित्रणे बघायला मिळतात. विशेषतः घरातल्या आई, बाप, आजी आणि आजोबा या माणसांविषयी कवी खूप भरभरून बोलतो. आईविषयी तो 'आईची ओवी अजून गुंजतेय, जगणं होऊन आयुष्यभर', तर आजीविषयी 'आजी अख्खं घर धाकात ठेवायची आणि गावालाही अलगद जोडून घ्यायची, घर आणि गाव यांची गफलत न करता' अशी भावना व्यक्त करतो. तर पाय ठेचाळू नयेत म्हणून वाटेतले दगडधोंडे उचलणारा बाप किंवा गावातल्या कुण्याही आजारी माणसांवर औषधोपचार करण्यासाठी तत्पर असणारे आजोबा यांच्याविषयी कवी कृतज्ञता व्यक्त करतो. आईच्या जात्यावर दळण्यातून, तो ताक घुसळण्यातून जणू आपल्या आयुष्याची नीट घुसळण झाली असे कवीला वाटते. एकंदरीत घरातली ही मोठी कर्तीकरवती माणसे कवीला संस्काराची विद्यापीठे वाटतात. या सर्वांच्या उत्तम संस्कारांमुळे आपले बालपण समृद्ध झाले आणि जीवनाला दिशा मिळाली. कवी म्हणतो–'हे बालपण डाऊनलोड करता आलं पाहिजे!'

पूर्वीच्या गावात दारिद्र्य, कष्ट या गोष्टी होत्याच. पण एकोपा आणि प्रेम बघायला मिळायचे. आयुष्याची मळणी होतानाही प्रेमाचा ओलावा टिकून होता. साध्या पेजेच्या आशेने लोक राबायचे. कनकांच्या बेटांना काटा आला की दुष्काळ पडतो हा कोकणातील संकेत. पण लोक खचायचे नाहीत. वाट्याला आलेला जमिनीचा तुकडा कसून घर उभे केले, संसार केला, मुलांची शिक्षणे केली. मुले नोकरीच्या निमित्ताने शहरात स्थिरावत गेली. मात्र या सर्व गदारोळात गावाकडची शेती कसायला माणसे कमी पडू लागल्याने हळूहळू पडीक पडत चाललीय. हवापालट करायला यावे तशी शहरातनं मुले, नातवंडे गावाकडे येतात. त्यांना शेतीकाम जमत नाही किंवा जमवून घ्यावे असे वाटत नाही. त्यात जिल्हा 'पर्यटन जिल्हा' म्हणून घोषित झाल्याने अनेकांच्या नजरा इकडे वळल्यात. व्यापारी दृष्टिकोन डोक्यात ठेऊन परप्रांतीय लोकांनी जमिनी विकत घेण्याचा सपाटा लावलाय. जमिनी विकून गावाकडच्या लोकांच्या हातात पैसा येतोय. पण त्या पैशांनं बेचैनी वाढवलीय. जातीजातीतली तेढ वाढू लागलीय. रक्तपात होऊ लागलाय. सर्वत्र नात्यागोत्यांचा, व्यवहाराचा, पैशांचा बाजार मांडला जातोय. आर्थिक सुबत्ता दिसतेय. पण ती तात्पुरती सूज आहे हे कुणी लक्षात घेताना दिसत नाहीये. या सर्व पार्श्वभूमीवर निसर्गही बदलून गेलाय. मायनिंग प्रकल्प, औष्णिक ऊर्जा प्रकल्प, रस्ते रुंदीकरण, मल्टीनॅशनल कंपन्यांचे गॅस पाईप अशा अनेक कारणांनी पर्यावरणाचा तोल बिघडत गेला. निसर्गही आता पिसाळल्यासारखा करू लागलाय. तर भुईतून उगवलेली झाडे कवीला दहशत माजवताहेत असा भास होऊ लागलाय. तर रानात (शेतात) हर्त्तीनी आणि वांदरांनी उच्छाद मांडलाय. एकंदरीत सर्व पातळ्यांवर सामान्य माणूस हतबल होत चाललाय. गाव सोडून शहरात जावे म्हटले तर तिथली अवस्थाही काही वेगळी नाही आहे. शहरात माणुसकी बघायला मिळणे दुरापास्त होते आहे.

**(पान ६१ वर)**

# कडी-वरकडी

**बलभीमराज गोरे**

तथाकथित कवितेच्या एकूण-एक स्वरूपांचे खंडन तथा उल्लंघन करीत 'सकाळ'च्या संपादकीय पानावरील 'वरकडी' या मथळ्याखालील संजय वरकड लिखित अनौपचारिक अभिव्यक्तीने अशात सर्वदूर मराठी वाचकांच्या मनावर कळत-नकळत आपले चांगलेच बस्तान बसविले आहे, हे सर्वज्ञात सत्य आहे. नुकतेच 'सकाळ पेपर्स प्रा.लि., पुणे-२'च्या वतीने 'कडी वरकडी' या शीर्षकाअंतर्गत वरकडांच्या काही निवडक 'वरकडी'चे संकलन प्रकाशित करण्यात आले आहे. ही बाब निश्चितच अत्यंत भूषणावह म्हटली पाहिजे. सन्मान-पुरस्कारयोग्य म्हटली पाहिजे.

मराठीतील ख्यातनाम कवी फ.मुं. शिंदे यांनी ढोबळमानाने वरकडांच्या 'वरकडी'स विडंबन काव्य म्हटले आहे, तर रवींद्र किंबहुने यांनी उल्लेखित काव्यप्रकारास काहीसं गंभीरतापूर्वक घेत, 'नर्मविनोदी; पण बोचरी, श्लेषसिद्ध; परंतु अकृत्रिम' असे म्हटले आहे. याचबरोबर 'घटना विशिष्ट; परंतु वृत्तीदर्शक शब्दकळा' अशी व्याख्या करण्यातही त्यांनी कुठे कसर ठेवलेली नाही. 'वरकडी'स एक उत्तम फॉर्म देण्याच्या भूमिकेतून डॉ. सुहास जेवळीकर यांनी फ. मुं. आणि किंबहुने सरांच्या तुलनेत काहीसे निराळे तथापि, खात्रीपूर्वक सार्थक म्हणता येईल, असे वक्तव्य केलेले आहे. ते म्हणतात, 'वरकडी' म्हणजे सभोवती घडणाऱ्या घटनांची नुसती टिंगलटवाळी नसून विधायक कृतीचे ऊबदार स्वागत आणि विघातक कृतींवर मार्मिक प्रहार आहे.

'कडी वरकडी' साद्यंत वाचून झाल्यानंतर वस्तुतः मीदेखील सदर अभिजात (Aristocratic) नि अप्रूप (Unusual) स्वरूपातील काव्यकोटीस नेमकं काय म्हणायचं, यासंबंधीचा बेशक निर्णय करू शकलो नाही. कारण कोणी काही म्हटलं तरी कथित अर्थाने 'वरकडी' कोणत्याही काव्यप्रकारात मोडत नाही. कारण एकंदरीत तिचा 'बाज'च मुळी निराळा


ईमेल : pwatsaru@yahoo.com

आहे. 'वरकडी' व्यंगात्म आहे; पण ती सरसकट व्यंगात्म नाही. 'ती'मधील आधुनिक भावबोध मान्य आहे; पण कथित अर्थाने ती, दीर्घ किंवा लघू आदी कोणत्याच काव्यप्रकारात मोडत नाही. बिंबात्मकता, प्रतीकात्मकता, सामायिकता आणि सूचकता आदी सर्व काही मान्य असले तरी तरी प्रत्येक 'वरकडी'चे शिल्पगत सौंदर्य, अंतरंग सौंदर्य नि विषय तथा एकूणच स्वभावधर्म निराळे आहेत. 'वरकडी'त कुठे तरी यमक साधले जाते म्हणून ती धड छंदबद्ध कविता नाही, की गद्य कविता नाही. ती सप्ताक्षरी नाही. त्यामुळे अर्थातच हायकू नाही. अथपासून इथपर्यंत ती चारोळीही नाही. नवी कविता, ताजी कविता, प्रयोगवादी कविता किंवा अकविता असे काही तरी म्हणणेही न्याय्य ठरणारे नाही. 'वात्रटिका' तर ती मुळीच नाही. कारण 'नपुंसक टीका' या जातकुळीत ती मोडत नाही. कारण 'वरकडी'तून व्यक्त होणारे विचार निखालस सरळमार्गी नि पारदर्शी आहेत. यामुळेच कदाचित 'वरकडी'च्या संबंधाने भाष्य करीत असताना सुहास जेवळीकर यांनी 'वरकडी'तून व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रियांना, 'विधायक कृतीचे ऊबदार स्वागत' असे म्हटले आहे.

वस्तुतः प्रत्येक 'वरकडी' म्हणजे कवीच्या दैनंदिन मनःस्थितीचे शब्दचित्र असते. कवीच्या मनमौजी चित्तवृत्तीचे दर्शन असते. 'मनःस्थिती' असो, की 'चित्तवृत्ती' ही सदासर्वदा सारखी नसते. म्हणजेच ती लहरी, अनभ्यस्त किंवा व्हीमझिकल असते. आपाततः कवीला एखाद्या व्यक्ती वा घटनेशी संबंधित भाष्य करीत असताना दैनंदिन 'वरकडी'त कुठे वर्ण, मात्रा, यमक आदी व्याकरणिक बाबींचा ताठा वा ताण घ्यावासा वाटत नाही. असे काही असले तरी अर्थवत्तेच्या पातळीवर 'वरकडी' निर्विवाद यशस्वी होत असल्याचे प्रत्ययास येते. कारण कवीला जे सांगायचे किंवा जो विचार संप्रेषित करायचा असतो त्याचा तो हेतू अगदी नेमकेपणाने साध्य होताना दिसतो.

उल्लेखित पार्श्वभूमीवर वरकडांच्या 'वरकडी'स 'अभिजात भाष्य' (ॲरिस्टोक्रॅटिक कॉमेंट) किंवा 'अप्रूप टिपण' (अनयुज्वल रिमार्क) असे म्हणणेच मी अधिक पसंत करीन. एक 'भेदक वक्तव्य' (पेनेट्रेटिव्ह स्टेटमेंट) असेही म्हणेन. हिंदीतील महान कवी सुदामा पांडे ऊर्फ 'धुमिल' (संसद से सडक तक, कल सुनना मुझे' आदी काव्यसंग्रहाचे कवी) यांच्या बहुतेक कविता माझ्या दृष्टीने सपाट बयानी (हॉरिझॉंटल स्टेटमेंट) आहेत. 'धुमिल'च्या कवितेतही अधूनमधून कुठे तरी यमक साधले जाते. मात्र, त्यासाठी तो आग्रही नसतो. त्याच्या कवितेतील खरी लयात्मकता अर्थवत्तेच्या पातळीवरच प्रत्ययास येते. वानगीदाखल एक उदाहरण पाहा–

*''सौंदर्य में स्वाद*
*जब मेल नहीं खाता, कुत्ते*
*महुए के फुलपर*
*मुतते है!''*

उल्लेखित काव्यात्म टिप्पणी खूप काही सांगून जाते. यादृष्टीने वरकडांच्या 'वरकडी'स मी (हॉरिझॉंटल स्टेटमेंट) म्हणजेच 'सपाट बयानी काव्य' असे म्हणणेच ठीक समजतो. 'कडी'चा शब्दशः अर्थ 'साखळी' असा होतो. ही साखळी आतून किंवा बाहेरून दरवाजा बंद केल्यानंतर दरवाजावरील लोखंडी आकड्यास अडकवायची असते. सुरक्षिततेचाच एक भाग म्हणून वरतून त्या कडीवरच कुलूप लावायचे असते. इतके सारे केले तरी दाराच्या फटीतून कळत-नकळत कुलूपबंद सत्य बाहेर येतेच. काही केल्या ते लपून राहत नाही आणि ते विविधांगी सत्यच तर दैनंदिन 'वरकडी'तून झिरपताना दिसते. विशेष म्हणजे, ते जसे असते तसेच ते बरे दिसते. ते चांगले किंवा वाईट असे काहीच नसते. यामुळे वाचकांनी त्याकडे केवळ साक्षीभावानेच पाहायचे असते. कारण त्यातली कुरुपताही अनेकदा सुंदर असते, तर सुंदरता ही कैकदा कुरूप असते. अखेर जे सत्य ते सत्यच असते. कुलूपबंद असले तरी ते सत्यच असते. या संदभातील एक 'वरकडी' पाहा–

*''पराभवाचे एक कारण*
*गटबाजीचे इन्फेक्शन*
*प्रचाराचा विकनेस, हे*
*झाले दुसरे कारण.*
*तिसरे, चौथे, पाचवे अशी कारणे खूप खूप*
*कडी तुटली तरी म्हणतात,*
*मजबूत आहे*
*आमचेच कुलूप.''*

मानवी जीवनाशी संबंधित काही निवडक विषय वा क्षेत्रांचा वेध घेणाऱ्या आणखी काही मासलेवाईक

'वरकडी' पाहिल्याच पाहिजेत.

---

*ऐक्याचे प्रयोग, परत परत परत,*
*कुणी कुठे बसायचे, तेच नाही ठरत.*

(संदर्भ : बंडखोरी)

---

*झाड असते तेच, फक्त बदलते फांदी,*
*काँग्रेसला हवा असतो, कुणी तरी गांधी*

---

*इतरांचा स्वयंपाक, प्रसादालाही पुरत नाही*
*गांधींचे कुरण सोडून, काँग्रेस कुठे चरत नाही.*

(संदर्भ : घराणेशाही)

---

*उभ्या उसाचा पंचनामा, भरपाई मागत आहे*
*खाऊन पिऊन समितीचा, अहवालच फुगत आहे*
*उसाला लागेल कोल्हा, असेच तो वागत आहे*
*शेतकऱ्यांचे मरणही, वर्षानुवर्षे जगत आहे.*

(संदर्भ : शेती)

---

*नळ म्हणाला धारेला, मला असे टाळू नको,*
*दिवसाआड का होईना; पण भेटीसाठी जाळू नको,*
*तुझ्याचसाठी रोज, रांग असते माझ्याकडे,*
*तुला यायचे नसेल तर दे निरोप टँकरला.*

(संदर्भ : पाणी)

---

*आपापसांत सल्ले आहेत, एकमेकांवर हल्ले आहेत,*
*आपण कितीही लढलो तरी किल्ले अखेर त्यांचेच आहेत.*

---

*ते पुढे होत नाहीत, मागे पण सरत नाहीत,*
*लढाई असते त्यांची; पण ते कधी मरत नाहीत.*

(संदर्भ : लोकशाही)

---

*सही आणि शेरा, सारे काही जपून आहे,*
*फाईली फाईलींवर, मार्च एंड टपून आहे.*
*असा येतो, असा जातो, रुपायाला किती पाय,*
*संकल्पाचा अर्थ कळेना, महागाईची चूक काय?*

(संदर्भ : योजना नि महागाई)

---

*जी गोष्ट कडी-कुलपांच्या आत आहे*
*तीच तर खरी दंगलखोरांची जात आहे.*

---

*मुख्यमंत्री असले तरी, त्यांनाही जात असते*
*जोपर्यंत गरज नसते, तोवर ती अज्ञात असते.*

(संदर्भ : जाती, धर्म)

---

*मतपेट्यांच्या पोटात, सरकार घडत असतं,*
*निकाल लागेपर्यंत, निनावी ते वाढत असतं.*

---

*'पंजा' आणि 'घड्याळ म्हणाले,*
*करू नका घात,*
*'धनुष्य' आणि 'कमळ' म्हणाले,*
*देऊ नका हात...*
*रेल्वेचे रूळच आता इंजिनाला छळू लागले,*
*आपले कुणीच का नसते, डब्यांनाही कळू लागले.*

(संदर्भ : निवडणुका आणि विविध पक्ष)

---

*लाच द्या, काम करा हा आता रिवाज आहे,*
*'शेरा'स सव्वाशेर, सहीचा आवाज आहे.*
*काळा पैसा खोटा, असे कधी होत नसते,*
*अंधारातून उजेडात, सारे काही दिसत असते.*

(संदर्भ : भ्रष्टाचार)

---

*कुणाचा भराडा, कुणाची भुकटी,*
*सारेच करतात, वटवट फुकटी,*
*प्रत्येक पार्टी, होतेय नकटी.*

---

*हे बरं की ते बरं, शेवटपर्यंत कळत नाही,*
*सत्ता असो कोणतीही, घोटाळा टळत नाही*
*लाकूड असो की गोवरी, धुराशिवाय जळत नाही.*

(संदर्भ : राजकारण)

**बारामती प्रतिनिधी**

**वसंत घुले**
भ्र. ९४२२५११००६

---

*मुंबईला जाऊन ज्यांनी, एक रात्र काढली,*
*त्यांच्याच तर पोटांत, महाविद्यालये वाढली.*

---

*गुणवत्तेकडे बघून, जाहिराती हसू लागल्या,*
*कॉलेज आणि क्लासच्या मधोमध बसू लागल्या.*

(संदर्भ : शिक्षण)

---

संजय वरकडांच्या 'वरकडी'चे हे पहिलेच पुस्तक आहे. इतरही अनेक पुस्तकांचे ते लेखक आहेत. अनेक मानसन्मान आणि पुरस्कारांचे ते धनी आहेत. एक धाडसी पत्रकार म्हणूनही त्यांचा मगदूर आहेच. साहित्य संमेलनांचे ते अध्यक्ष नि नवोदित साहित्यकांचे आधारवड आहेत. मला त्यांच्याकडून उत्तमोत्तम लेखनाची मनोमन अपेक्षा आहे.

●

कडी वरकडी : संजय वरकड
प्रकाशक : सकाळ पेपर्स प्रा. लि., पुणे
मूल्य १२५ रु., पृ. २२४

---

**(रफीक सूरज / पान ५७ वरून)**

*'या शहरात आईची हाक नाही*
*बापाचा धाक नाही*
*गाईचं हंबरणं नाही*
*काळजातून घातलेला कुकारा नाही*
*या जगण्याला तसं जगणं म्हणण्याला*
*काहीच शास्त्रीय आधार नाही'*

मोहन कुंभारांच्या अनेक कवितांतून जागतिकीकरणाचा संदर्भ येताना दिसतो. जागतिकीकरणाची ही प्रक्रिया अनेक पातळ्यांवर उलथापालथी घडविणारी आणि नवी संवेदनशीलता घडविणारी आहे. या प्रक्रियेमुळे फक्त दोनच वर्ग निर्माण होत आहेत आणि पुन्हा या दोन वर्गात प्रचंड दरी रुंदावते आहे. या बदललेल्या वास्तवाचे आकलन मांडण्याचा पवित्रा खेड्यापाड्यांतून लिहित्या झालेल्या कवींनी घेतलेला आहे. मात्र पुष्कळदा हे कवी वास्तवाच्या तपशिलातच अडकून राहिल्याचे दिसते. अभिव्यक्तीची नवनवी प्रमाणके शोधून काढण्यात या कवींना म्हणावे तितके यश मिळालेले नाही. जबरीने प्रयोगशीलता कवितेत आणण्याच्या आग्रहामुळे अनेक चांगले कवी वाहत गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे मोहन कुंभार हा संभाव्य धोका लक्षात ठेवून या पुढील कवितेची वाटचाल करतील असा भरवसा वाटतो. कुंभारांच्या कवितेत प्रतिभांचा सोस, चित्रविचित्र शब्दांची मांडामांड, इंग्रजी वळणाने शब्दांचा वापर असले प्रकार नाहीत. 'जगण्याची गाथा' या संग्रहातील एकूण नव्वद कवितांत एकही कविता पारंपरिक प्रेमकवितेच्या अंगाने जाणारी किंवा व्यासपीठीय टाळीसाठी लिहिली जाणारी कविता असू नये ही बाब कवीविषयी अपेक्षा उंचावणारी आहे.

या कवितेबाबत आणखीन एक विशेष नोंदविण्याजोगा आहे तो म्हणजे जमीन-भूमी आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या प्रतिभांचा असणारा सोस. खळं, समुद्रतळ, जमिनीत रोवून असलेलं बुजगावणं, पिसाळलेली भूमी, सरकणारी वाळू, आयुष्याचं गवत, झाडांची मुळे, भुईचा गर्भ, रुजून आलेलं वाळवीचं झाड, चिखल, पायांची चाळण करणारी वाट, भरले शेत, जंगल, माळ, वाफ्याच्या खुणा, सारवण, अंगण, जित्राब, व्हाळ अशा या भूमिनिष्ठ प्रतिभा कुंभारांच्या एकंदर अनुभवविश्वाचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. या प्रतिभा जीवन आणि सृजन यासंबंधीची जाणीव जास्त ठळक करणाऱ्या आहेत. विशेष म्हणजे या कवितेत क्षोभ, घृणा, कडवटपणा, यासारख्या तीव्र भावना उमटत नाहीत हे लक्षात घेण्याजोगे आहे. याचे मुख्य कारण मोहन कुंभारांच्या कवितेची मुळे इथल्या संस्कृती आणि लोकजीवनात खोलवर रुजलेली आहेत. एक माणूस म्हणून आणि एक कवी म्हणून, अशा दोन्ही प्रकारची ओळख या कवितेतून विस्तारत जाताना दिसते.

●

**जगण्याची गाथा : मोहन कुंभार**
लोकवाङ्मयगृह, मुंबई (एप्रिल २०१५)
पृष्ठे ९६ / किंमत रु. १४०

# डॉ. आंबेडकरांची क्रांती विरुद्ध संघाची प्रतिक्रांती

**एकनाथ ढोकळे**

मोदी शासन सत्तेवर आल्यापासून देशात एका बाजूला असहिष्णुता वाढल्याचे बोलले जात आहे. दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी ते आता हैद्राबाद विद्यापीठातील रोहित वेमुला हे सर्व या असहिष्णुतेचे बळी आहेत असे समजले जात आहे. म्हणजे एका अर्थाने आंबेडकरी किंवा पुरोगामी विचारधारा तर दुसऱ्या बाजूला संघप्रणीत उच्चजात वर्चस्वाचे राजकारण असा संघर्ष तीव्रतर होताना दिसत आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. दुसऱ्या बाजूला मोदी मात्र उत्तरोत्तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति श्रद्धा दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. संघ परिवार आणि मोदी यांना बाबासाहेबांबद्दल फार आदर, श्रद्धा, प्रेम निर्माण झाले असल्याचे चित्र रंगविले जात आहे. मोदींच्या परदेश दौऱ्यातील भाषणांमध्ये बुद्ध आणि बाबासाहेबांचा उल्लेख असो वा इंदू मिलवरील बाबासाहेबांच्या स्मारकाचे भूमिपूजन, मोदी शासनाला व संघपरिवाराला बाबासाहेबांवर प्रेम दाखविल्याशिवाय पुढे जाता येणार नाही हे कळून चुकलेले आहे. मात्र अशा प्रतीकात्मक कृतींमधून संघ भाजपाचे हे प्रेम किती खरे किती खोटे याचा गंभीरपणे व डोळसपणे विचार करण्याची गरज आहे. रणजीत परदेशी व राम शृंगारे लिखित 'डॉ. आंबेडकरांची क्रांती विरुद्ध संघाची प्रतिक्रांती' ही पुस्तिका संघ परिवार व मोदी शासनाच्या बाबासाहेबांवरील या प्रेमाचा मूलभूत वैचारिक तथ्यांच्या आधारे पर्दाफाश करते. संघ भाजपचं आंबेडकरांविषयीच प्रेम किती बेगडी, संधिसाधू व दिशाभूल करणार आहे याचा लेखाजोखाच मांडते. 'राजकीय लोकशाही, कायद्याचे अधिराज्य, लोकशाही आणि जातीवर्चस्व, राष्ट्रवाद, जातीसमाज आणि स्त्रीदास्य अशा विविध मुद्द्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांची भूमिका व संघ भाजपाची भूमिका यांचा तुलनात्मक अभ्यास सदर पुस्तिका आपल्यासमोर मांडते.


ईमेल : eknath.hrights@gmail.com

**लोकसत्ता विरुद्ध श्रेष्ठीजन सत्ता**

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांचा पाया उदारमतवादी लोकशाहीचा आहे, तर संघ भाजप परिवाराचा विचार आणि व्यवहार 'श्रेष्ठीजनांचे शासन' यावर आधारलेला आहे. श्रेष्ठीजन शासन म्हणजे अर्थातच जन्माने श्रेष्ठ ठरविल्या गेलेल्या उच्च जाती. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेले कायद्याचे अधिराज्य, व्यक्तींची समानता, जनतेचे सार्वभौमत्व व त्यासाठी शासक वर्गावर जनतेचे नियंत्रण या सर्व गोष्टी संघ भाजपला अमान्य आहेत. संघ भाजपला जात वर्गीय श्रेष्ठत्वावर आधारित सत्ता हवी असल्याने लोकशाही संस्थांचे दुर्बलीकरण घडवून आणणे हा त्यांचा राजकीय कार्यक्रम बनलेला आहे.

अलीकडच्या काळातील विविध लोकशाही संस्थांवरील नेमणुका व त्यातील हस्तक्षेप ही त्याचीच उदाहरणे होत. या राजकारणाचीच पुढची अपरिहार्य गरज म्हणून मग 'राष्ट्रीय सुरक्षे'च्या नावाखाली विरोधी पक्ष, वृत्तपत्रे, संसद यांच्या अधिकारांवर व राजकीय वैचारिक विरोधक, जातवर्गविरोधी विद्रोही शक्ती यांच्या स्वातंत्र्यावर बंधन घालणे ओघाने आलेच.

'राजकीय लोकशाही'बद्दल आंबेडकरांचे विचार व संघ भाजपाची भूमिका यांचा तुलनात्मक अभ्यास ही पुस्तिका आपल्यासमोर पुढीलप्रमाणे सादर करते.

संघ भाजपाचा राष्ट्रवाद समाजाला लोकशाहीविरोधी झुंडीकरणाकडे कसा घेऊन जातो याचे विश्लेषण 'वजाबाकीचा राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय समाजाची

**राजकीय लोकशाही**

| आंबेडकरांचे विचार | संघ भाजपाची भूमिका |
|---|---|
| राजकीय लोकशाही पुढील मूलतत्त्वांवर आधारित आहे–<br>१. व्यक्ती ही साध्य आहे. | संघ भाजपाच्या विचार व कृतीतून व्यक्त होणारी सूत्रे<br>१. राष्ट्र हे साध्य आहे, व्यक्ती हे साधन. |
| २. व्यक्तीला अदेय मूलभूत हक्क आहेत आणि ते राज्यघटनेद्वारे रक्षिले गेले पाहिजेत. | २. राष्ट्र–समाज यांच्याव्यतिरिक्त व्यक्तीला वेगळे असे हक्क नसतात. त्यामुळे व्यक्तींना हक्कांऐवजी कर्तव्ये अधिक बंधनकारक असतात. राज्यघटनेद्वारा म्हणूनच हक्क–संरक्षण देण्याची गरज नाही. |
| ३. दुसऱ्यावर राज्यकारभार करण्यासाठी राज्य इतर खाजगी व्यक्तींना सत्ता प्रदान करणार नाही. याचा अर्थ असा की कोणत्याही श्रेष्ठीजनांच्या गटाला जनसामान्यांवर हुकुमशाही लादण्याचा अधिकार नाही. | ३. ईश्वरी वरदान प्राप्त श्रेष्ठीजन वा अलौकिक लष्करी विभूती यांना इतरांवर राज्य करण्याचा निसर्गतःच अधिकार असतो, हे गृहीत संघ भाजपच्या शाखांमधून प्रसारित केले जाते. |
| **राजकीय लोकशाहीच्या स्वीकारामागील उद्दिष्टे**<br>जातीसमाजात व्यक्ती ही साध्य नव्हती. जात, धर्म अथवा सामंतस्वामी यांच्याशी ती बांधलेली होती. व्यक्तीचे जीवनकार्य वरील शक्तींना बळकटी देणे हे होते. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर, कारागीर व विणकर जातींवर शेकडो वर्ष ब्राह्मण व सामंत जाती शासन करू शकल्या. डॉ. आंबेडकरांना या प्रकारच्या सत्तारचनेला सुरुंग लावायचा आहे. त्यामुळे ते व्यक्तीचे स्वातंत्र्य, व्यक्तींची समानता व व्यक्तींचे मूलभूत हक्क यांचे समर्थन करतात. | **राजकीय लोकशाहीच्या अस्विकाराची कारणे**<br>गोळवलकर गुरुजी टीका करतात की लोकशाही–समाजवाद या विचारप्रणालीच्या स्वीकारामुळे व्यक्ती व समाज यांमधील सुसंवाद नष्ट होतो. हेडगेवार व्यक्तीच्या हक्काऐवजी केवळ राष्ट्रधर्माचा आदेश व्यक्तीला देतात. 'निःस्वार्थ भावनेने लोकसंग्रहासाठी आपल्या राष्ट्रात सुव्यवस्था व सुखपूर्ण जीवन निर्माण करण्याच्या हेतूने केले गेलेले कर्म हेच आपले नियतकर्म करत असताना आपल्या स्वार्थाचा राष्ट्रहितार्थ होम करणे हाच एकमेव...' (श्री गुरुजी–समग्रदर्शन, खंड ५, पृ. ३४) |

**कायद्याचे अधिराज्य**

| आंबेडकरांचे विचार | संघ भाजपची भूमिका |
|---|---|
| १. कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना आंबेडकरांच्या राजकीय लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. शासनाने सर्व व्यक्तींना कायद्याचे समान संरक्षण द्यावे, कायदेशीर कारणांखेरीज कोणालाच आपल्या जीवित-वित्ताला व स्वातंत्र्याला वंचित व्हावे लागू नये ही कायद्याच्या अधिराज्याची संकल्पना आहे. | १. श्रेष्ठीजनांचे अधिराज्य ही संकल्पना संघ भाजपादी/ जातीवर्चस्ववादी शक्तींनी उघड व छुप्या पद्धतीने स्वीकारलेली आहे. श्रेष्ठवंशीय आर्य/हिंदू राष्ट्र नेते वा सरसंघचालक यांना सर्वोच्च अधिकार आणि जनसामान्यांना कर्तव्ये अशी विभागणी संघ विचारात गृहीत धरलेली आहे. त्यामुळे शत्रुवंश, शत्रुधर्म वा शत्रुपक्ष यांच्या संरक्षणाची हमी नसते. |
| २. संकल्पनेची दुसरी बाजू म्हणजे कायदा लोकमतावर आधारलेला पाहिजे ही आहे. लोकांद्वारे निर्वाचित प्रतिनिधींनी कायदेनिर्मिती करावी. | २. श्रेष्ठीजन शासनाची दुसरी बाजू म्हणजे कायदा हा शासनकर्त्या वर्गाच्या दंडसामर्थ्यावर आधारलेला पाहिजे, ही आहे. लोकनिर्वाचित प्रतिनिधींऐवजी श्रेष्ठींच्या अल्पजनसत्ता कायदा निर्माण करते. |
| ३. याच संकल्पनेचे तिसरे अंग म्हणजे निरंकुश शासनपद्धतीला विरोध होय. सत्ताधारी वर्गाने लोकांना जबाबदार राहणे आवश्यक असते, त्यामुळे राज्यसंस्था निरंकुश होण्याचा धोका टळतो. | ३. श्रमिकवर्ग, जाती यांच्यावरील उच्च जातीवर्ग यांच्या निरंकुश सत्तेला आव्हान मिळू नये म्हणून जनतेच्या अनेक राजकीय अधिकारांवर कात्री लावण्याचे समर्थन संघपरिवार करतो. जनसामान्यांनी श्रेष्ठी वर्गास शरण जावे म्हणून संस्कृतीचे राजकारण केले जाते. धर्मांधता वाढवून दंगली घडविल्या जातात, जनतेचे झुंडीकरण करण्यात येते. |
| ४. जनसंमतीद्वारे राजसत्तेला अधिमान्यता दिली जाते. शासनाचे काय देव आदेश यांना निवडणुकीच्या माध्यमातून जनता पाठिंबा देत असते. निवडणुका नियतकालिक असतात त्यामुळे शासनाची अधिमान्यता अखंड राखली जाते. भारतासारख्या जातीसमाजात राज्यसंस्था परंपरेने जाती-समर्थित असते. जातीसमाजात राजकीय सभेतील भरती जातीवर आधारित असते, बाबासाहेब तिला छेद देतात. | ४. जातीवर्चस्वाचे कायदे, वर्गीय स्वार्थाची धोरणे यांना जनसामान्यांनी पाठिंबा द्यावा, म्हणून धर्म, संस्कृती आणि शिक्षण या माध्यमातून तिचे बधिरीकरण करण्यात येते. दंगली व रामरथयात्रा सारख्या झुंडीकरणाच्या वातावरणात हिंसाचारी कृती/ शासन यांना 'अधिमान्यता' देण्यात येते. त्यासाठी निवडणुका दंगल-प्रभावित काळात घेण्यात येतात. (उदा. गुजरात) |

लोकशाहीविरोधी झुंडशाही' या प्रकरणात केलेले आहे.

विशिष्ट धर्म, वंश, संस्कृती आदींच्या समान धाग्यांनी बांधला गेलेला विशिष्ट लोकसमूह हाच राष्ट्रीय लोकसमूह असतो आणि या समान धाग्यांमध्ये जे बांधले जात नाहीत ते लोकसमूह 'राष्ट्रीय' नसतात या प्रकारची सिद्धांतरचना अनेक राष्ट्रांमधील वंशवादी, धर्मांधवादी, संकुचित, संस्कृतीवादी उचलून धरतात. संघ भाजपच्या राष्ट्रवादाची संकल्पनादेखील याच विचारावर उभी आहे. अशा स्थितीत देशप्रेमी राष्ट्रीय लोकसमूह विरुद्ध बिगरराष्ट्रीय लोकसमूह अशी फाळणी करुन प्रसंगी 'बिगर-राष्ट्रीय' लोकसमूहाच्या स्त्री-पुरुषांच्या कत्तली, सामूहिक बलात्कार आणि अल्पसंख्य समूहाच्या नागरी अधिकारांचे संकुचीकरण करण्याकडे संघ भाजपाचा राष्ट्रवाद समाजाला घेऊन जातो. त्यातूनच एक लोकशाहीविरोधी तथाकथित

## लोकशाही आणि जातीवर्चस्व

| आंबेडकरांचे विचार | संघ भाजपची भूमिका |
|---|---|
| १. जातीवर्चस्ववादी शक्तींची शासनसंस्थेवरील पकड दूर करणे हा आंबेडकर विचारांचा पहिला हेतू आहे. त्यासाठी दलित, आदिवासी व अन्य मागास जातीयांना राजकीय सत्तेत सहभाग देणारी लोकशाही शासनपद्धती ते आवश्यक मानतात. लोकशाही विचार व पद्धतीचा उदय अनियंत्रित राजेशाहीच्या विरोधात झालेला आहे – ही तिची नकारात्मक बाजू असली तरी लोकांचे कल्याण साधावे हे या शासनपद्धतीचे उद्दिष्ट असल्याचे आंबेडकर प्रतिपादन करतात. | १. जातीवर्चस्ववादी शक्ती कमी-अधिक प्रमाणात लोकशाही शासन पद्धतीला विरोध करतात. या शासनपद्धतीमध्ये उच्च जातींच्या एकतंत्री वर्चस्वाला धक्का बसतो हे त्यामागील आंतरिक कारण आहे. लोकशाही पद्धतीला असलेल्या विरोधामागे पुढे करण्यात येणारे बाह्य कारण पुढीलप्रमाणे आहे. |
| २. जातिव्यवस्थेवर आधारलेल्या सत्तारचनेत वरिष्ठ जातींची सत्ता कनिष्ठ जातींवर होती. लोकशाही पद्धतीतील स्पर्धात्मक पक्षपद्धती, कायद्यासमोरील समानता, मूलभूत हक्क यामुळे जातिव्यवस्थेच्या सत्तारचनेला सुरुंग लागतो. आंबेडकर म्हणूनच लोकशाही शासनपद्धतीचे समर्थन करतात. | २. गोळवलकरांच्या मते भारतातील हजारो वर्षे चालत राहिलेल्या (राजेशाही) शासनव्यवस्थेमध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वातंत्र्य होते आणि सर्वत्र शांततेचे आणि समृद्धीचे साम्राज्य नांदत होते. (विचारधन पृ.२१)<br>**अंतस्थ हेतू–** प्राचीन व मध्ययुगीन समाजात शेतकरी-दलित व कारागीर जातींच्या शोषणावर राजेशाहीचे स्वातंत्र्य आणि समृद्धी फुलली होती हे इतिहास वास्तव इथे लपविण्यात आले आहे. |
| ३. विविध सामाजिक, धार्मिक आणि प्रादेशिक हितसंबंधांच्या समावेशातून लोकशाही समृद्ध होते ही बाबासाहेबांची भूमिका आहे. त्यामुळे ते अल्पसंख्याकांचे धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार यांना विशेष संरक्षण असावे असे प्रतिपादन करतात. राज्यघटनेच्या माध्यमातून अन्य मागास जाती-जमातींच्या विशेष हक्कांचे समर्थन करतात. | ३. लोकशाही संघराज्य पद्धतीला विरोध करताना गोळवलकर गुरुजी लिहितात- एक देश-एक राजा, एक विधिमंडळ, एक शासनसंस्था यांच्या महान जयजयकारात एकरूप जीवननिष्ठेवर आघात करणाऱ्या प्रादेशिक, जातीय, भाषिक वा इतर पृथक अभिनिवेशाला यत्किंचितही स्थान राहू न देणे या अनुषंगाने घटनेची पुनर्रचना केली पाहिजे. यातून संघ एकात्मता शासन निर्माण होईल असे स्वरूप तिला दिले पाहिजे. (विचारधन पृ.१९३)<br>**अंतस्थ हेतू–** वरच्या जाती व वर्ग यांच्या हातात कायदेमंडळ, न्यायमंडळ यांची निर्णयप्रक्रिया केंद्रित व्हावी हा संघ भाजपचा अंतस्थ हेतू आहे. त्यासाठी फुटिरतेचा भयगंड ते उभा करीत आले आहेत. |
| ४. स्थिरता आणि बलशाली शासन या मुद्द्यांचा समावेश डॉ. आंबेडकर लोकशाहीच्या व्याख्येत करीत नाहीत. लोकशाहीमध्ये रक्तहीन मार्गाने सामाजिक व आर्थिक समतेसाठी लोक क्रांती करतील असा इशारा ते देतात. | ४. १९९० नंतरच्या भारतीय राजकारणात बहुपक्षपद्धतीमुळे शासनात अस्थिरता निर्माण झाली म्हणून द्विपक्षपद्धत असावी अशी प्रचारयंत्रणा संघ भाजपने सुरू केली. अंतस्थ हेतू-भारतातील कायदेमंडळ आणि कार्यकारी सत्ता यावर प्रभाव गाजवण्याची दलित-आदिवासी यांच्या पक्ष-संघटना, प्रादेशिक पक्ष यांना शासकीय सत्तेपासून निवडणूक माध्यमाद्वारे दूर ठेवणे. |
| ५. अल्पसंख्य समूहांच्या सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक वेगळेपणाच्या (पृथगात्मतेच्या) हक्कांच्या संरक्षणासाठी घटनात्मक कायद्याची तरतूद असावी असे बाबासाहेब प्रतिपादन करतात. 'बहुसंख्य' वंश, धर्म, संस्कृती यावर आधारित समूह आपल्या राजकीय वर्चस्वाचे समर्थन करण्यासाठी 'बहुमतवादा'चा युक्तिवाद पुढे आणतात. बाबासाहेब या बहुसंख्याकवादाचा धि:कार करतात. अल्पसंख्याकांच्या हक्क मागणीला जमातवाद म्हणायचे व बहुसंख्याकांच्या जमातवादाला राष्ट्रवाद म्हणायचे या मिथ्या समर्थनाला नकार देतात. | ५. हिंदू समाज हाच भारतातील 'राष्ट्रीय समाज' आहे, तोच राज्य-राष्ट्रव्यवस्थेचा आधार होऊ शकतो – असा राजकीय सिद्धान्त संघ भाजप मांडतो. त्याआधारे दुसरा उपसिद्धान्त पुढे करण्यात येतो की धार्मिक अल्पसंख्याक जोपर्यंत हिंदूंच्या सांस्कृतिक मूल्यांचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत ते अ-राष्ट्रीयच राहतील. या सिद्धान्ताची कायद्याच्या स्तरावरील अंमलबजावणी म्हणजे हिंसाचार आणि अत्याचार यांचे उघड समर्थन करणाऱ्या हिंदू जमातवादी संघटनांच्या गुन्हेगारीचे समर्थन करण्यात येते. याउलट कायद्याच्या संरक्षणाची पूर्ण तरतूद न वापरताच मुस्लिमांतील काही संघटना-सदस्यांना अटकेत टाकले जाते |
| ६. घटनात्मक नीतिमत्तेचे पालन केल्याशिवाय लोकशाही राजकीय स्तरावर यशस्वी होणार नाही असे आंबेडकर प्रतिपादन करतात. समाजामध्ये संविधानाने गठीत केलेले कायदे आणि स्वातंत्र्य-समतादी मूल्ये ही नैतिक मूल्ये स्वीकारली गेली पाहिजे. अन्यथा लोकशाही संस्था व व्यवहार यांचा उच्छेद केला जातो, असे बाबासाहेब म्हणतात. | ६. संघ भाजप परिवाराचा संविधानिक नीतिमत्तेवर विश्वास नाही. संविधानापेक्षा धर्माची मूल्ये पवित्र आहेत आणि राजकीय संसदेपेक्षा साधूसंतांची संसद श्रेष्ठ आहे असे संघ भाजपचे जाहीर प्रतिपादन राहिलेले आहे. त्यामुळे घटनेचा भंग, संसदीय कायद्याचा उच्छेद, न्यायालयीन निर्णयांचा अवमान हे सर्व प्रकार संघपरिवार करीत असतो. श्रेष्ठीजन शासनासाठी लोकशाहीचा बळी देणे ही त्यांची नीती राहिलेली आहे. |

राष्ट्रीय समूहाची झुंड निर्माण केली जाते. अलीकडच्या काळातील मुस्लीम तरुणांवर होणारे जीवघेणे हल्ले, दादरी प्रकरण ते खैरलांजी, खर्ड्यातील दलितांचे शिरकाण ह्या घटना या झुंडीकरणाचाच परिपाक आहेत.

संघ भाजपच्या या जीवघेण्या राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये ही पुस्तिका पुढीलप्रमाणे देते.

१. मुस्लीम व इतर अल्पसंख्य समूहांची वजाबाकी करणारा हिंदुराष्ट्रवाद.
२. मुस्लीम अल्पसंख्याकांना दुय्यम नागरिक म्हणून अवमानित करणारा धर्माधारित धार्मिक बहुसंख्याकवाद.
३. उच्चजातीवर्ग वर्चस्वास साहाय्यभूत सांस्कृतिक राष्ट्रवाद.
४. या सर्वांच्या आधारावर भारतीय समाजाची सांस्कृतिक आणि राजकीय फाळणी घडवून आणणारा झुंडवाद.
५. 'बहुसंख्याकवादा'च्या आवरणाखाली उच्चवर्गजातीय श्रेष्ठींच्या अल्पजनसत्तेला मान्यता.
६. या राजकीय प्रक्रियांच्या आधारे राजकीय पक्ष, जनआंदोलने, लोकशाही, शासकीय सत्ता, प्रसारमाध्यमे आदी लोकाभिमुख सत्ताकेंद्रांचे श्रेष्ठीजन नियंत्रित (उच्च जातवर्गाचे नियंत्रण) सत्ताकेंद्रांत रूपांतर करणे.

नव्या आर्थिक धोरणाच्या वेगाने बदलणाऱ्या कालखंडात भारतात एका बाजूला सुखलोलुप असा नवा मध्यमवर्ग निर्माण झालेला आहे तर दुसऱ्या बाजूला लढाऊ चळवळींचे अस्तित्व कमजोर होत आहे. अशा पार्श्वभूमीवर युद्ध, राजकारण आणि परधर्मद्वेषाचा जमातवाद यांच्याआधारे समुदायवाद पेटविण्याची व्यूहरचना संघ भाजपाने स्वीकारलेली आहे. परिणामी आंबेडकरांना अपेक्षित असलेल्या राजकीय लोकशाहीसाठीचा लढा अधिकच संकटात सापडलेला आहे असा इशारा ही पुस्तिका देते. यासोबतच जातीसमर्थनाची व्यूहरचना, स्त्रीदास्याची जातीसमाजातील अनन्यता या मुद्यांचे विश्लेषण करीत ही पुस्तिका जातींअंताच्या प्रश्नाला चर्चेच्या केंद्रस्थानी आणते.

शेवटी, संघ भाजपच्या प्रतिक्रांतीचा राजकीय आघाडीवर पराभव करायचा असेल तर दलित, ओबीसी आणि शेतकरी जातींतल्या श्रमिक वर्गांनी जातींअंतक क्रांतीसाठी कटिबद्ध क्रांतिकारी पक्ष-संघटनांची निर्मिती करण्याची आवश्यकता या पुस्तिकेने पुढे आणली आहे. प्रबोधनाच्या स्तरावर जातीस्त्रीदास्यअंतक अब्राह्मणी प्रबोधनाची महाआघाडी उभारणे व जातीअंतक नवप्रबोधन व आर्थिक-राजकीय समतेचा लढा उभारणे या आधारेच संघभाजपाच्या प्रतीक्रांतीचा समूळ बिमोड करता येईल असा आशावाद या पुस्तिकेने दिला आहे.

●

डॉ. आंबेडकरांची क्रांती विरुद्ध संघाची प्रतिक्रांती
लेखक : रणजीत परदेशी, राम शृंगारे
प्रकाशक : क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी

'वाटसरु' मुंबईत

**पीपल्स बुक हाऊस**
१५, मेहेर हाऊस बिल्डिंग,
कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई ४००००१
दू. ०२२-२२८७३७६८

'वाटसरु' सोलापुरात

**प्रोग्रेसिव्ह बुक सेंटर**
शॉप नं. १०, युनायटेड रेसिडेन्सी,
१५९, रेल्वे लाईन, सोनामाता
शाळेसमोर, सोलापूर-४१३००३.
दू. ९४२२६४५०५५